सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ९१ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## भारताच्या विजयाचे शिल्पकार गिल, अय्यर, पटेल, राणा


शुभमन गिल | ९६ चेंडू | १४ चौकार | ८७ धावा


श्रेयस अय्यर | ३६ चेंडू | ९ चौकार | २ षट्कार | ५९ धावा


हर्षित राणा | ७ षटके | ५३ धावा | ३ बळी

◆ **नागपूर, ६ फेब्रुवारी**


विदर्भ क्रिकेट संघटना स्टेडियम, जामठा येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारतीय संघाने बहारदार खेळाचे प्रदर्शन करीत इंग्लंडवर ६८ चेंडू शिल्लक ठेवत ४ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने ४७.४ षटकांत सर्वबाद २४८ धावा केल्या. भारताने ३८.४ षटकांत ६ बाद २५१ धावा काढून विजय साकार केला. भारताला विजय मिळवून देताना शुभमन गिल (८७), श्रेयस अय्यर (५९) व अक्षर पटेलने (५२) अर्धशतकी विजयी खेळी केली. इंग्लंडला २४८ धावांत रोखताना पदार्पण करणाऱ्या हर्षित राणाने ३ बळी टिपले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### विक्रीच्या दबावाखाली बाजारात घसरण

**मुंबई :** दिवसभरातील घसरणीच्या व्यवहारानंतर शेअर बाजार सलग दुसऱ्या दिवशी घसरणीसह बंद झाला. निफ्टी ९२ अंकांच्या घसरणीसह २३,६०३ वर बंद झाला, तर निर्देशांकात २१३ अंकांची घसरण झाली.



दिवसभरातील व्यवहारात फार्मा, आयटी, खाजगी बँक वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरले. ऑटो, एफएमसीजी, रियल्टी, ग्राहकी वस्तू शेअर्सही विक्रीच्या दबावाखाली राहिले. त्यापाठोपाठ धातू, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, ऊर्जा, तेल आणि नैसर्गिक वायू कंपन्यांच्या शेअर्समध्येही घसरण नोंदविण्यात आली.

### 'झोमॅटो'ला मिळाली नवी ओळख

**मुंबई :** फूड डिलिव्हरी ॲप झोमॅटोने आपली ओळख बदलली आहे. झोमॅटोचे नाव बदलण्याच्या निर्णयाला कंपनीच्या संचालक मंडळाने मान्यता दिली. कंपनीचे नाव बदलून इटर्नल लिमिटेड करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन नावावर संचालक मंडळ भागधारकांच्या मंजुरीची वाट पाहत आहे. कंपनीने झोमॅटो ॲपचे नाव बदललेले नाही, फक्त कंपनीचे नाव बदलून इटर्नल लिमिटेड केले आहे. ॲपचे नाव झोमॅटोच राहणार आहे.

### बिर्ला समूहाचे सौंदर्य प्रसाधन क्षेत्रात पदार्पण

**मुंबई :** आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांची मुलगी अनन्या बिर्ला आता सौंदर्य प्रसाधनांच्या व्यवसायात उतरत आहे. याआधी तिने एआय आणि मायक्रोफायनान्सचा व्यवसाय सुरू केला होता. देशातील सौंदर्य प्रसाधनांची बाजारपेठ अब्जावधी डॉलर्सची आहे आणि त्यात सतत वाढ होत असते. या क्षेत्रात अनन्या रिलायन्स इंडस्ट्रीज, टाटा, एचयूएल आणि लॉरियल यासारख्या मोठ्या कंपन्यांना टक्कर देणार आहे. मुकेश अंबानी यांची मुलगी ईशा रिलायन्समधील ब्युटी आणि लाईफस्टाईल सेगमेंट व्यवसाय सांभाळते. अनन्याची कंपनी बिर्ला कॉस्मेटिक्स यावर्षी आपले उत्पादन लाँच करणार आहे. विशेष म्हणजे, ती स्वत: लॉरियलचा ब्रॅण्ड मेबेलाईनची ब्रॅण्ड ॲम्बेसेडरदेखील आहे.

### माओवाद्यांच्या प्रेस कमांडरची पत्नीसह शरणागती

**रायपूर :** माओवाद्याच्या प्रसिद्धी विभागाचा प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या कमांडरने गुरुवारी पत्नीसह छत्तीसगडमध्ये शरणागती पत्करली. पवन तुलावी असे त्याचे नाव असून, त्याच्या अटकेसाठी आवश्यक माहिती देणाऱ्यांवर पोलिसांनी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. पवनने २००८ मध्ये नक्षली चळवळीत प्रवेश केला होता. २०१३ ते २०१९ या काळात तो नव्याने भरती होणाऱ्या नक्षल्यांचा शिक्षक म्हणून काम करीत होता. त्यानंतर त्याला प्रेस कमांडर म्हणून पदोन्नती देण्यात आली होती. त्याची पत्नी पायेम कयामनेही त्याच्यासोबत शरणागती पत्करली. तिची माहिती देणाऱ्यांवरही पोलिसांनी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. या दोघांनीही इंडो-तिबेट सीमा पोलिस आणि छत्तीसगड पोलिसांपुढे शरणागती पत्करली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पवनची पत्नी २०११ पासून इंद्रावती एरिया कमांडर म्हणून सक्रिय होती.

### एटीएसच्या रडारवर १० हजार संशयित

**लखनौ :** ६ फेब्रुवारी प्रयागराजमधील महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरीचा तपास आता कटाच्या बाजूने वळला आहे. उत्तरप्रदेश आणि केंद्र सरकारच्या संस्था याचा तपास अपघाताच्या दिशेने नाही, तर कटाच्या दृष्टिकोनातून करीत आहेत. उत्तरप्रदेशातील १० हजारांहून अधिक लोक राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए), दहशतवादविरोधी पथक (एटीएस), विशेष कार्य दल (एसटीएफ) आणि स्थानिक गुप्तचर युनिटच्या रडारवर आहेत. बहुतेक निदर्शक सीएए आणि एनआरसीच्या विरोधात आहेत. महाकुंभात यापैकी काहींच्या हालचाली दिसून आल्या आहेत. या चौकशीत अशा गैरहिंदूंचा समावेश आहे, ज्यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर कुंभमेळ्याबद्दल नकारात्मक टिप्पण्या पोस्ट केल्या आहेत किंवा ज्यांनी गुगल, यूट्यूबवर कुंभमेळ्याबद्दल खूप शोध घेतला आहे. एटीएस आणि एसटीएफदेखील त्यांच्या भूमिकेची चौकशी करीत आहे.

## अमेरिकेची कारवाई आंतरराष्ट्रीय नियमानुसारच

**याआधीही झाली होती अशी कारवाई, आकडेवारी केली सादर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २००९ - ७३४ | २०१२ - ५३० | २०१५ - ७०८ | २०१८ - १,१९० | २०२२ - ८६२ |
| २०१० - ७९९ | २०१३ - ५१५ | २०१६ - १,३०३ | २०२० - १,८८९ | २०२३ - ६१७ |
| २०११ - ५९७ | २०१४ - ५९१ | २०१७ - १,०२४ | २०२१ - ८०५ | २०२४ - १,३६८ |

◆ **नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

अवैधरीत्या अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांना भारतात परत पाठवण्याची अमेरिकेची कारवाई आंतरराष्ट्रीय नियम आणि संकेतांना धरून असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आज संसदेच्या दोन्ही सभागृहात स्पष्ट केले.

आधी राज्यसभेत आणि नंतर लोकसभेत या संदर्भात निवेदन करताना जयशंकर म्हणाले की, ही नियमित स्वरूपाची कारवाई आहे, यात नवीन असे काही नाही. याआधीही अशी कारवाई अनेकवेळा झाली आहे. बेकायदेशीर पद्धतीने भारतीय नागरिकांना अमेरिकेत पाठवणाऱ्या दलालांविरुद्ध सरकार



कठोर कारवाई करेल.

भारतीयांनी कोणत्याही देशात वैध मार्गानेच गेले पाहिजे. अवैध मार्गाने दुसऱ्या देशात होणाऱ्या घुसखोरीला सरकारचा विरोध आहे. अमेरिका भारतीय नागरिकांना भारतात परत पाठवत असताना आंतरराष्ट्रीय नियम आणि संकेतांचे पालन झाले पाहिजे, ही भारताची भूमिका आहे, असे ते म्हणाले.

२०१२ मध्ये यासंदर्भात दोन देशांत करार झाला होता. त्यानुसारच अमेरिका अवैध मार्गाने अमेरिकेत घुसलेल्या भारतीयांना परत पाठवत आहे. याआधीही अवैध मार्गाने अमेरिका वा अन्य देशांत घुसलेल्या भारतीयांना त्या देशांनी परत पाठवले होते. अशी घरवापसी निर्धारित आंतरराष्ट्रीय नियम आणि मानकांनुसार केली जाते. त्यासाठी नियमित वा लष्करी विमानांचाही वापर केला जातो आणि त्यात गैर असे काही नाही, असे त्यांनी सांगितले. यावेळी जयशंकर यांनी, कोणत्या वर्षी किती भारतीय परत पाठवण्यात आले होते, याची आकडेवारी सादर केली. (तभा वृत्तसेवा)

## काँग्रेस तुष्टीकरण करते, आम्ही संतुष्टीकरण

### राज्यसभेत नरेंद्र मोदी यांचा घणाघाती हल्ला

◆ **नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

२०१४ मध्ये आम्ही देशाला विकासाचे पर्यायी मॉडेल दिले. काँग्रेसचे मॉडेल तुष्टीकरणाचे होते, तर आमचे संतुष्टीकरणाचे आहे आणि जनतेने आमचे मॉडेल स्वीकारले, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर राज्यसभेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना मोदी यांनी पुन्हा एकदा नेहरू, गांधी घराणे आणि



काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल काँग्रेसच्या मनात अतिशय द्वेष आणि सुडाची भावना होती. त्यामुळेच काँग्रेसने त्यांना एकदा नाही, तर दोनदा लोकसभा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी आपला पूर्ण जोर लावला होता.

देशातील सर्व जनतेने बाबासाहेबांचा आदर केला, त्यांना सन्मान दिला. पण, काँग्रेसने त्यांना भारतरत्नही मिळू दिले नाही, त्यासाठी योग्य समजले नाही, असा घणाघात मोदी यांनी केला.

आज काँग्रेस नाईलाजाने जय भीम म्हणत आहे, पण असे म्हणतानाही त्यांचा घसा कोरडा पडतो. काँग्रेस रंग बदलण्यात उस्ताद आहे, किती लवकर त्यांनी आपला चेहरा बदलवला आहे, याकडे मोदी यांनी लक्ष वेधले. (तभा वृत्तसेवा)

#### आपली रेष मोठी करा, मग पहा...

काँग्रेसची भूमिका नेहमीच आपली रेष मोठी करण्यापेक्षा दुसऱ्याची रेष छोटी करण्याची राहिली. त्यामुळेच काँग्रेसने नेहमीच सरकारांना अस्थिर केले. त्यामुळे देशात आज काँग्रेसची दुर्दशा झाली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर मित्रही त्यांना सोडून जाऊ लागले आहे. मी काँग्रेसला न मागता एक सल्ला देतो, तो म्हणजे त्यांनी आपली रेष मोठी करण्याचा प्रयत्न करावा, एक ना एक दिवस दहा मीटरचे अंतर पार करता ते येथे पोहोचू शकतील.

## धनंजय मुंडे घरगुती हिंसाचाराच्या खटल्यात दोषी

### करुणा शर्मा यांना पहिली पत्नी म्हणून कोर्टाची मान्यता

◆ **मुंबई, ६ फेब्रुवारी**

मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. त्यांच्या विरोधात करुणा शर्मा-मुंडे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर कौटुंबिक न्यायालयाने धनंजय मुंडे यांना अंशतः दोषी ठरविताना, करुणा यांना पोटगी देण्याचा आदेश दिला. करुणा शर्मा याच धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असल्याचे या माध्यमातून कोर्टाने मान्य केले आहे.

करुणा मुंडे या कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी ठरल्या असल्याचे कोर्टाने मान्य केले. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी करुणा यांना दरमहा एक लाख २५ हजार, तर त्यांची मुलगी शिवानीला दरमहा ७५ हजार रुपये देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. इतकेच नाही तर, खटला लढण्यासाठी करुणा यांना २५ हजार रुपये खर्च देण्याचा आदेशही न्यायालयाने दिला. ही पोटगीची रक्कम खटला सुरू झाला तेव्हापासून मुंडे यांना द्यावी लागणार आहे. (वृत्तसंस्था)

## भारत २०२७ मध्ये चांद्रयान-४ मोहीम प्रक्षेपित करणार

◆ **नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी**

भारत २०२७ मध्ये चांद्रयान-४ मोहीम सुरू करेल, ज्याचा उद्देश चंद्राच्या पृष्ठभागावरून नमुने गोळा करणे आणि ते पृथ्वीवर परत आणणे हा आहे. चांद्रयान-४ मिशनमध्ये एलव्हीएम-३ रॉकेटच्या किमान दोन स्वतंत्र प्रक्षेपणांचा समावेश असेल, जे मिशनची पाच वेगवेगळी उपकरणे घेऊन जातील आणि कक्षेत एकत्र केले जातील, अशी माहिती केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी दिली.

गगनयान मोहिमेमध्ये भारतीय अंतराळवीरांना खास डिझाईन केलेल्या अंतराळ यानात पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पाठवणे आणि त्यांना सुरक्षितपणे परत आणणे समाविष्ट आहे. पुढील वर्षी हे अभियान हाती घेतले जाईल. २०२६ मध्ये भारत समुद्रयान देखील प्रक्षेपित करेल, जे तीन शास्त्रज्ञांना पाणबुडीत ६००० मीटर खोलीवर घेऊन जाईल. महत्त्वपूर्ण खनिजे, दुर्मिळ धातू आणि कमी अन्वेषण केलेल्या सागरी जैवविविधतेसह अफाट संसाधने उघडण्यासाठी समुद्रयानाच्या क्षमतेवर मंत्र्यांनी भर दिला.

गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळाने चांद्रयान-४ मोहिमेला मंजुरी दिली होती, हे मिशन ३६ महिन्यांत पूर्ण होईल. या अभियानासाठी सरकारने २,१०४.०६ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यात चांद्रयान-४, अंतराळयान, दोन एलव्हीएम-३ रॉकेट आणि स्पेस नेटवर्क आणि चांद्रयान-४ शी सतत संपर्क राखण्यासाठी डिझाईन पडताळणीचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

**क्रिकेट समीक्षणातील मोठी इनिंग संपली!**

## द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन

◆ **मुंबई, ६ फेब्रुवारी**

खुमासदार लिखाण आणि क्रिकेट समालोचनाने मराठी रसिकांना वेड लावणारे लोकप्रिय क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे गुरुवारी निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. संझगिरी यांनी मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाबद्दल क्रीडा जगतासह राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून शोक संवेदना व्यक्त केल्या जात आहे.



संझगिरी मुंबई महापालिकेत उच्च पदावर कार्यरत होते, पण क्रिकेट आणि मराठी साहित्यातील रुचीने त्यांच्यातील क्रिकेट समीक्षक घडवला. मराठी क्रिकेटरसिकांनी त्यांच्या लिखाणाला नेहमीच पसंतीची दाद दिली. संझगिरी यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२ वाजता शिवाजी पार्क स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार होईल.

द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी मुंबईत झाला. त्यांनी किंग जॉर्ज स्कूल (आताचे राजा शिवाजी विद्यालय) आणि रामनारायण रुईया महाविद्यालयात शिक्षण घेतले. पुढे इंजिनिअरिंग केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेत अभियंता म्हणून नोकरी केली आणि २००८ मध्ये पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता म्हणून निवृत्त झाले. स्तंभलेखन, क्रिकेट समीक्षण, समालोचन अशा सर्व क्षेत्रात त्यांनी मुशाफिरी केली.

**एकच षटकार**

संझगिरी यांनी १९७० मध्ये लेखन सुरू केले. 'दिनांक' आणि 'श्री' यासारख्या मासिकांमध्ये त्यांच्या लिखाणाला चांगला प्रतिसाद मिळू लागला. भारताने इंग्लंडमध्ये १९८३ चा विश्वचषक जिंकला. त्यानंतर त्यांनी इतर काही मित्रांसह 'एकच षटकार' हे पाक्षिक क्रीडा मासिक सुरू केले. या मासिकासाठी संझगिरी यांनी कार्यकारी संपादक म्हणून काम केले. संझगिरींनी १९८० च्या दशकात स्तंभलेखन सुरू केले. 'आज दिनांक', 'सांझ लोकसत्ता', 'मिड-डे', 'तरुण भारत', 'पुढारी' आणि इतर दैनिकांमध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध होऊ लागले. (वृत्तसंस्था)

#### उत्तम संकल्पना राबवल्या

संझगिरी यांनी अनेक उत्तम संकल्पना राबवल्या, त्या तडीस नेल्या. सुनील गावसकर आणि गुंडप्पा विश्वनाथ यांचा त्यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त सत्कार, सचिन तेंडुलकरांच्या विक्रमी ३५ व्या कसोटी शतकानिमित्त त्यांचा सत्कार, १९७१ च्या इंग्लिश मालिका विजेत्या भारतीय संघाचा सत्कार आणि सचिन तेंडुलकरचा सर्वांत अलिकडचा त्यांची ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार या कार्यक्रमाची संकल्पना त्यांची होती. त्यांनी ते पारही पाडले.

## उड्डाणपूल शुद्धीपत्रकाला मंजुरी

### सोलापुरातील नियोजित जुना बोरामणी नाका-पत्रकार भवन उड्डाणपूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरात होणाऱ्या दोन उड्डाणपूलांपैकी जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या शुद्धीपत्रकाला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नुकतीच मंजुरी दिली. त्याच्या राजपत्र प्रसिद्धीनंतर पुढील प्रक्रिया करण्याचे काम सुरू होणार आहे.

केंद्र शासनाने सोलापुरात दोन उड्डाणपूल बांधण्याची योजना सन २०१६ मध्ये जाहीर केली होती. याला जवळपास आठ वर्षे लोटूनही अद्याप भूसंपादनाचीच प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पाच्या १०० खासगी मिळकतींपैकी केवळ आठ मिळकतींच्या निवाड्यांचे काम बाकी आहे. दरम्यान दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या शुद्धीपत्रकाला नुकतेच जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळाली असून लवकरच त्याचे राजपत्र प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार आहे. जुना पुना नाका ते पत्रकार भवन तसेच जुना बोरामणी नाका ते पत्रकारभवन असे दोन उड्डाणपूल शहरात होणार आहेत. यामुळे शहराच्या रहदारी व वाहतुकीमध्ये लक्षणीय सुधारणा होण्यास मदत होणार आहे. सन २०१६ मध्ये या प्रकल्पाची घोषणा झाली होती. मात्र अनेक वर्षे यासंदर्भातील कामाला गती मिळाली नव्हती. त्यामुळे हा प्रकल्प रखडला होता. प्रकल्पासाठी भूसंपादन ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. गत दोन वर्षात मात्र भूसंपादनाच्या कामाला गती आली. जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात एकूण १३७ मिळकती बाधित होणार आहेत. त्यापैकी १०० खाजगी तर ३७ या शासकीय निमशासकीय आहेत. यापैकी खासगी मिळकतींच्या भूसंपादनाचे काम राज्य शासन नियुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत होत आहे. विनोद कांबळे हे प्रभारी विशेष भूसंपादन अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. ११ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मनुष्यबळावर भूसंपादनाचे काम करण्याचे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात १०० खासगी मिळकतींपैकी ९२ निवाड्यांचे काम पूर्ण झाले आहे. यापैकी ५९ मिळकतींचा ताबादेखील घेण्यात आला आहे. शिल्लक आठ निवाड्यांपैकी काडादी चाळ येथील तीन मिळकतींचा वाद न्यायालयात आहे.

#### भूसंपादनानंतरच निविदा काढणार

प्रकल्पाच्या डिझाईनमध्ये बदल करण्यात आल्याने त्यासंदर्भातील शुद्धीपत्रक मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले होते. त्याला मंजुरी मिळाली आहे. दरम्यान, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३७ तर दुसऱ्या टप्प्यात १२ असे ४९ शासकीय-निमशासकीय जागा आहेत. या प्रकल्पाच्या कामी शासकीय-निमशासकीय भूसंपादन होणे आवश्यक आहे. या भूसंपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त स्तरावर केली जात आहे. भूसंपादनानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून उड्डाणपूल बांधण्याची निविदा काढण्यात येणार आहे.

## अबब...! भारतीय जातीच्या गायीची ४० कोटींना विक्री!

● ब्राझीलमध्ये लिलाव ● गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

◆ **ब्राझिलिया, ६ फेब्रुवारी**

पशुपालनाच्या जगात एक अभूतपूर्व घटना घडली आहे. ब्राझीलमध्ये झालेल्या पशु मेळ्यात भारतीय नेल्लोर जातीची 'व्हिएटिना-१९' नावाची गाय ४० कोटी रुपयांना विकली गेली. आतापर्यंत विकली जाणारी ती सर्वांत महागडी गाय ठरली असून, तिची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

ब्राझीलमधील मिनास गेराईस येथे गाईचा लिलाव झाला. यात नेल्लोर जातीच्या या गायीची बोली तब्बल ४० कोटी रुपयांना लागली. तिचे वजन १ हजार १०१ किलो आहे. या जातीच्या इतर गायींच्या



तुलनेत जवळजवळ दुप्पट वजन आहे. ४.८ दशलक्ष डॉलर्समध्ये (अंदाजे ४० कोटी रुपये) ही गाय विकण्यात आली. (वृत्तसंस्था)

#### भारतात कोठे आढळते नेल्लोर गाय?

नेल्लोर जातीच्या गायींना भारतात ओंगोल जातीच्या नावाने ओळखले जाते. मूलतः आंध्रप्रदेशच्या ओंगोल प्रदेशातून आलेली ही जात कठीण परिस्थितीत सहन करण्याच्या क्षमतेसाठी प्रसिद्ध आहे. ही जात भारतातील आंध्रप्रदेश, तेलंगणा येथे आढळते.

#### जगभरात का आहे मागणी?

'व्हिएटिना-१९' ही साधी गाय नसून, तिच्या अद्वितीय आनुवंशिक गुणधर्मांमुळे आणि शारीरिक वैशिष्ट्यांमुळे ती जगभर ओळखली जाते. तिने प्रतिष्ठित 'चॅम्पियन्स ऑफ द वर्ल्ड' स्पर्धेत 'मिस साऊथ अमेरिका' हा बहुमान पटकावला आहे. तिची स्नायूंची रचना आणि दुर्मिळ आनुवंशिक वारसा यामुळे ती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. तिचे वासरू जगभर निर्यात केले जातात.

#### या गायींची वैशिष्ट्ये काय?

● अधिक उष्णता सहन करू शकते ● रोगप्रतिकारकशक्ती जास्त ● उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये राहण्याची क्षमता ● पांढरा शुभ्र रंग आणि शारीरिक वैशिष्ट्यांमुळे उठून दिसते ● उच्च पुनरुत्पादन क्षमता

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शिष्यवृत्तीसाठी पाच हजार अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**
अनुसूचित जाती प्रवर्गासह इतर जातींच्या विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी जिल्ह्यातील शाळांनी ऑनलाईन नोंदणी करावी, अशा सूचना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने दिल्या होत्या. त्यानुसार आतापर्यंत ५ हजार ८८ अर्ज ऑनलाईन पद्धतीने दाखल झालेले आहेत. त्यामध्ये

### शिष्यवृत्तीच्या लाभासाठी नोंदणी आवश्यक

शिष्यवृत्तीच्या लाभासाठी शाळांची नोंदणी ऑनलाईन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील तीन ४८४६ शाळांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. उर्वरित 'शाळांकडून लवकरात लवकर ऑनलाईन नोंदणी करुन घेण्यात येईल. त्यानंतर शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात येईल.

**- सचिन कवले,**
समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर

विविध शिष्यवृत्ती योजनेमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीचे अर्ज ९१, सैनिक स्कूल विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज ३१, सावित्रीबाई फुले अनुसूचित जाती विद्यार्थिनी शिष्यवृत्ती योजना ४६५२ अर्ज शालेय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना २४, शासकीय शिष्यवृत्ती योजना इयत्ता नववी दहावी विद्यार्थी १९२ अर्ज, पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती योजना ९८ अर्ज असे ५०८८ अर्ज सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे दाखल झाले आहेत.



एकूण शाळांची संख्या ४८४६ तर लॉगिन केलेल्या शाळांची संख्या ४०३९ इतकी आहे. अनुसूचित जाती प्रवर्गासह इतर पात्र पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 'प्रारंभी शाळांची ऑनलाईन नोंदणी करण्यात येणार आहे.

दरम्यान, संबंधित शाळांकडून ऑनलाईन नोंदणी करण्यात आली नाही. त्यामुळे त्या शाळेतील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. आत्तापर्यंत ज्या शाळांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. अशा शाळेतील शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. त्यासाठी समाजकल्याण विभागाकडून लवकरच पत्र काढण्यात येणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाने दिली आहे.



## राष्ट्रवादी सहकार सेलच्या शहराध्यक्षपदी भास्कर आडकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या शिफारशीवरून सहकार सेल प्रदेशाध्यक्ष मोरे तसेच कार्याध्यक्ष राजेंद्र हजारे यांनी शहर उपाध्यक्ष भास्कर आडकी यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहर सहकार सेलच्या शहर अध्यक्ष पदी नियुक्ती केली.

सहकार सेल महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष राजेंद्र हजारे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, परिवहन सभापती आनंद मुस्तारे, महीला अध्यक्ष संगीता जोगदनकर, सरचिटणीस शामराव गांगर्डे आदी उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त



### संतांचे जगणे समाज उन्नतीसाठीच असते : डॉ. मृगराजेंद्र महास्वामी

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
संतांचे जगणे हे समाज हितासाठीच असते. भक्तांच्या भल्यासाठी सर्वस्व समर्पण करण्याची तयारी सात्विक पुरुष करीत असतात. सोलापुरातील यल्लालिंग मठ, हे कर्नाटक -महाराष्ट्राला आध्यात्मिक सामर्थ्याने जोडणारे सामर्थ्यशाली ठिकाण असल्याचे आशीर्वचन म गळखोड मठाचे अधिपती श्रीश्रीश्री डॉ. मृगराजेंद्र महास्वामीजींनी केले. याप्रसंगी गोविंद तुकाराम धुळे यांनी पूज्य डॉ. मृगराजेंद्र महास्वामींची तुलाभार पूजा केली तर तुकाराम भंडारी यांनी पाद्यपूजा सेवा केली. सुरेश उंबरजे यांनी प्रसाद सेवा केली. प्रास्ताविक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले. यल्लालिंग मठाचे सूत्रेश्वर स्वामींनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. सूत्रसंचालन वेदमूर्ती बसवराज शास्त्री, तीर्थ यांनी केले.कल्याणकुमार गवई, निरंजन रुईकर, गुड्डुसाब नदाफ यांनी भक्तीगीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमास सूत्रेश स्वामी,बसवराज करजगीकर, किरण भंडारी, शावरप्पा धुते, कोळी, सायबण पाटील, श्रीशैल शिळळे, मल्लिनाथ गुरव, राजकुमार माळगे, एकनाथ चिंता, गुरु अचलरे उपस्थित होते. महाप्रसादानंतर महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली



### सिध्देश्वर मंदिरासमोरील शौचालय हटविण्याची मागणी

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर, विष्णू घाट, लक्ष्मी भाजी मार्केट येथील शौचालय व कचराकुंडी हटविण्याची मागणी वीरशैव व्हिजनच्या वतीने महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. मंदिरासमोर शौचालय असणे अयोग्य आहे. ती सोलापूरकरांसाठी शरमेची बाब आहे त्यामुळे ते शौचालय त्वरीत हटविण्यात यावे. तो परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा. तसेच पासपोर्ट कार्यालय ते डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह या रस्त्यावरील बाजूने तलावात सांडपाणी येते. त्याचाही बंदोबस्त करावा. त्यामुळे मंदिराचे, तलावाचे पावित्र्य व सौंदर्य अबाधित राहील. महापालिकेने कार्यवाही न केल्यास आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी निवेदनाद्वारे देण्यात आला.

### डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, डॉ. मुरहरी केळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार





**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
सोलापुरातील गोविंद काळे प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा कै. मातोश्री हौसाबाई ज्ञानोबा काळे स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार ज्येष्ठ लेखिका डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांना तर कै. ज्ञानोबा बापू काळे पुरस्कार डॉ. मुरहरी केळे यांना जाहीर झाला आहे. डॉ. वडगबाळकर यांच्या महायोगीनी अक्कमहादेवी या कादंबरीस व एकंदर साहित्य सेवेस तर डॉ. मुरहरी केळे यांच्या एडका या आत्म कथनास हा पुरस्कार दिला गेला आहे. या पुरस्काराचे वितरण विटा येथील ४३ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात ९ फेब्रुवारी रोजी संमेलन अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस तसेच आमदार डॉ. विश्वजीत कदम, डॉ. ओमप्रकाश शेळके, प्राचार्य डॉ. दिनकर पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व रुपये ५००० असे आहे.

### शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
शाळेसाठी घरातून निघालेल्या मुलीला वाटेत अडवून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरूध्द पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार बुधवार रोजी दुपारी १२.३० वाजता घडला. यातील फिर्यादीची मुलगी शहरातील एका शाळेत शिक्षण घेत आहे. ती नेहमीप्रमाणे बुधवारी दुपारी १२.३० वाजता शाळेसाठी जात होती. त्यादरम्यान वाटेंत आरोपी तिच्याकडे बघून हसण्याचा आणि तिला बोलण्याचा प्रयत्न करत होता. तसेच पाठलाग करून तिला त्रास देत होता.दरम्यान बुधवारी आरोपीने अल्पवयीन मुलीचा रस्त्यातच हात पकडून तु मला आवडते असे म्हणून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले. या गुन्ह्याचा तपास पोलीस करीत आहेत.

### उलट्या, जुलाबाचा त्रास होऊन तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
निलम नगरात राहणाऱ्या तरूणाचा उलट्या व जुलाबाचा त्रास होऊन मृत्यू झाला. संगमेश्वर तमण्णा देसाई (वय २९, रा. निलम नगर, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. ५ फेब्रुवारी रोजी संगमेश्वर देसाई यास राहत्या घरी उलट्या व जुलाबाचा त्रास होऊ लागल्याने संगमेश्वर यास बुधवारी सकाळी ११ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु, उपचार सुरु असताना बुधवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास संगमेश्वर याचा मृत्यू झाल्याचे डॉ. ओंकार तलकोकुळ यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून विनयभंग

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
शाळेच्या पटांगणातून जात असताना पाठलाग करून अश्लिल वर्तन तसेच अपशब्द वापरून अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. हा प्रकार मंगळवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडला. याबाबत पिडीतेच्या आईन दिलेल्या तक्रारीवरून अल्पवयीन मुलाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पिडीतेची अल्पवयीन मुलगी शहरातील एका शाळेच्या पटांगणातून घटनेच्या दिवशी पायी जात होती. त्यावेळी यातील अल्पवयीन मुलाने अपशब्द वापरून तिचा विनयभंग केला. या गुन्ह्याचा पोलीस तपास करत आहेत.

## ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये 'आर्टिफिशियल इंटेलेजिन्स'वर कार्यशाळा

### विविध राज्यांमधून ५७४ प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये, आर्टिफिशियल इंटेलेजिन्स विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात आणि विविध राज्यातील ५७४ प्राध्यापकांच्या उपस्थितीत नुकताच संपन्न झाला. महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स च्या सोलापूर लोकल डिव्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.

इमीनंट इनोवेशन्स फॉर इंटरडिसीप्लीनरी ॲप्लिकेशनस युजिंग ए.आय. अर्थात, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आंतरविद्याशाखीय अनुप्रयोगांसाठी प्रख्यात नवोपक्रम असा कार्यशाळेचा विषय होता. संशोधन क्षेत्रातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट आणि कार्यसिद्ध व्यक्तीमत्वांना एका साखळी पुष्पामध्ये गुंफण्याचा समन्वय सदर कार्यशाळेच्या प्रमुख डॉ. एस. आर. साखरे आणि सहसमन्वयक प्रा. पी.बी.साबळे यांनी साधला.

या कार्यशाळेमध्ये, विविध समि त्यामधील तांत्रिक सल्लागार बुंदेलखंड इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तसेच सर्वोत्कृष्ट शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या डॉ. शहनाज आयुब, छत्रपती संभाजी नगरचे हेड, IIRC, डायरेक्टर आणि CTO प्रा. पंकज ढोबळे, शासकीय अभियांत्रिकी कराड महाविद्यालयाचे डॉ. अरूण पाटोकर, बेंगलोरच्या नागार्जुन अभियांत्रिकीचे डॉ. प्रवीण, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. एस.टी. पाटील तसेच आयआयटी रायपूरचे डॉ. सौरभ गुप्ता, ए.जी.पाटील म हाविद्यालयाचे डॉ. आर.व्ही दरेकर आणि रुबिक्स ए आय सोल्युशनचे डाटा सायंटिस्ट मा. निखिल रेड्डी अशा विविध संशोधन क्षेत्रातील मान्यवरांनी आपला कार्यानुभव देशपातळीवरील अनेक प्राध्यापक मंडळी सोबत या कार्यशाळेद्वारे सादर केला. कार्यशाळेचे प्रमुख संयोजक, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर. व्ही. दरेकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही व्ही पोतदार यांनी केले. डॉ. एम. एस. देशपांडे आणि सचिव डॉ.यु. एस. मुगळे यांनी भविष्यातील अभियांत्रिकी संधी आणि संशोधन यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेतील सर्व मान्यवरांची ओळख प्रा. एस. एस. मेटगार यांनी करून दिली तर प्रश्नमंजुषेचा कार्यभार तसेच अभिप्राय नोंदणी प्रा. एस. जे.लिगाडे आणि प्रा. एस.एन.कांबळे यांनी पार पाडला. सबंध कार्यक्रमाचा तांत्रिक कार्यभार प्रा. पी.सी. ढवळे यांनी साध्य केला माहिती आणि प्रसारणाची जबाबदारी प्रा. एस. जे. लिगाडे, प्रा. एस. एस. मेटगार, प्रा. एम. एस. बिराजदार यांनी पार पाडली. प्रमाणपत्र वितरणाचे कार्य प्रा. एस.पी. कटके यांनी पाहिले तर सूत्रसंचालन प्रा. पी. बी. साबळे यांनी केले. कार्यक्रमासाठी वालीकर आणि नंदिनी अळगी यांनी परिश्रम घेतले. कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी मार्गदर्शन केले. तसेच अखंड प्रेरणारूपी स्रोत म्हणून प्रचलित असणारे संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील आणि ट्रस्टी शिवानंद पाटील यांनी अभिनंदन केले. कार्यशाळेचे प्रमुख संयोजक तसेच ई अँड टीसी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. व्ही. दरेकर यांनी आभार मानले.

## संबंधित वाळू माफियांवर कारवाई करा; अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
मौजे शिराळ टेंभुर्णी येथील धरणपात्रातील अंदाजे एक हजार ब्रास वाळू असलेले दोन खड्डे ताब्यात घ्यावेत. संबंधित वाळू माफियांवर कारवाई करावी आणि दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. दहा दिवसाच्या आत कारवाई न झाल्यास टेंभुर्णी पोलीस ठाण्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अनिल आरडे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. या प्रकरणी कारवाई करण्या च्या मागणीचे निवेदन सोलापूर जिल्हाधिकारी आणि सोलापूर पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले आहे. काही दिवसापूर्वी या ठिकाणी झालेल्या कारवाईत तेथील तलाठी व सर्कल यांनी फक्त ३० ब्रास वाळूचा पंचनामा दाखवला आहे मात्र या धरणपात्रांमध्ये सुमारे एक हजार ब्रास वाळू आहे. त्याचा पंचनामा करण्यात आला नसल्याचा आरोपही यावेळी आरडे यांनी केला आहे. तातडीने तो पंचनामा करण्यात यावा अशी म ागणीही यावेळी करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस महेंद्र सोनवणे उपस्थित होते.

### जात लपवून लग्न ठरविणाऱ्या मध्यस्थी महिलांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
मुलाची जात लपवून तरुणीचा विवाह जमविणा-या दोन मध्यस्थी महिलांसह पाच जणांवर जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिला निलेश भोसले (वय २६, रा. मुकूंद नगर, भवानी पेठ, सोलापूर) यांचा विवाह जमविण्यासाठी मध्यस्थी म्हणून आरोपी भिमाबाई पिरप्पा रणखांबे (रा. कल्याणी नगर, जुळे सोलापूर) व सुनिता अशोक काळे (रा. राजीव नगर, भवानी पेठ, सोलापूर) यांनी जमविले. परंतु या दोघी आरोपींनी वर पक्षाकडील लोकांची जात लपवून हा विवाह पार पाडला. ही बाब माहिती होऊनही विवाहिता सासरी नांदत होती. परंतु पती निलेश, सासू सुशिला व सासरे हणमंत भोसले (सर्व रा. ऐरोली नाका, नवी मुंबई) हे विवाहितेला किरकोळ कारणातून घालून पाडून बोलत होते. तसेच माहेरातून दोन लाख आणण्याची मागणी करून नांदवणार नसल्याची धमकी देत होते. या गुन्ह्याचा तपास हवालदार शेख करत आहेत.

### स्क्रॅप भरताना पहिल्या मजल्यावरून पडून एक जखमी

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
स्क्रॅप भरताना पहिल्या मजल्यावरून पडून एकजण जखमी झाला. प्रकाश मधुकर जगदाळे (वय ३९, रा. मौलाली माळ, ता. करमाळा) असे जखमीचे नाव आहे. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी एकच्या सुमारा देगाव गावात घराचे स्क्रॅप भरताना पहिल्या मजल्यावरून खाली चक्कर येऊन पडल्याने प्रकाश जगदाळे यांच्या डोक्यास जबर मार लागला. त्यामुळे जगदाळे यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## आचार्य विद्यासागरजींना वालचंदमध्ये विनयांजली अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
आचार्यश्री विद्यासागर जी हे वात्सल्यमयी संत होते. त्यांनी वालचंद शिक्षण समूहाला अनेक वेळा संबोधित केले होते. शिरपूर चातुर्मास प्रसंगी शेकडो विद्यार्थी व संस्थेचे विश्वस्त तसेच शिक्षक वर्गांनी त्यांच्या आशीर्वादाचा लाभ घेतला होता.' असे विनयांजली सभेच्या निमि त्ताने वालचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी आचार्यश्रींच्या त्यागपूर्ण जीवन शैलीचा पुनरुच्चार केला. आचार्य श्रींच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विद्यार्थी व प्राध्यापकांनी मौन साधना केली. संतशिरोमणी श्रमण दिगंबर जैन आचार्यश्री विद्यासागर मुनिराज अत्यंत प्रभावक कठोर तपस्वी आचार्य म्हणून प्रसिद्ध झाले. आचार्यश्रींनी आपल्या तपस्वी जीवनात संपूर्ण भारतभर अहिंसेची पताका फडकविली. आचार्यश्री करोडो भारतीयांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जातात. त्यांच्या समाधीच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांनी केलेल्या साधनेचे अनुकरण करणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.' असे बोलून महाविद्यालयाच्या महावीर स्टडी सेंटरचे प्रमुख प्रो. महावीर शास्त्री यांनी आचार्यश्रींच्या पावन स्मृतीला उजाळा दिला.

## पांजरापोळ चौकात दमदाटी करून तरुणाला लुटले

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
तरटी नाक्याकडे का गेला अशी विचारणा करून पांजरापोळ चौकाजवळील हॉटेल सुप्रभात समोर तरुणाला दमदाटी करून बळजबरीने दहा हजार काढून घेतले.

हा प्रकार मंगळवारी रात्री ९.१५ ते १०.३० च्या सुमारास घडला. अशोक राम चंद बावकर (वय ३०, रा. बावकरवाडी ता. अक्कलकोट) हा त्याच्या मित्रासह जेवणाकरीता मंगळवारी रात्री गेला होता. जेवणानंतर तो पांजरापोळ चौकाजवळील हॉटेल सुप्रभातजवळून जात असता, त्यास अनोळखी चार जणांनी अडविले. तरटी नाक्याकडे कशाला गेला होता, इकडे कशाला आला म्हणून दमदाटी केली. त्यानंतर त्याच्याकडे पैशांची मागणी करून ते बळजबरीने काढून घेतले. तसेच घडल्या प्रकाराबाबत कोणाकडे वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या गुन्ह्याचा तपास हवालदार चुंगे करत आहेत.

## नंदिनी जाधव, सोमशेखर भोगडे यांना पुरस्कार

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत रिजन कॉन्फरन्समध्ये लायन्स क्लब ऑफ सोलापूर व्टिन सिटीचे लायन नंदिनी मुकुंद जाधव बेस्ट झोन चेअरमन पुरस्कार तसेच जेष्ठ लायन सदस्य सोमशेखर जगदेवी ईरप्पा भोगडे यांना बेस्ट सचिव म्हणून पुरस्कार मिळाले आहे.





लायन सोमशेखर भोगडे हे लायनीझम २७ वर्ष कार्यकाळात माजी अध्यक्ष, कॅबिनेट इतरही पोस्ट वर कार्यरत होते. आ ज प र्यं त च्या लायन्स क्लबच्या सेवेबद्दल लायन्स क्लब सोलापूर व्टीन सिटी नुसते शहरापुरते काम न करता ग्रामीण भागात वाड्या वस्तीवर सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, असे विविध सेवाकार्यात अग्रेसर आहे.

## पूनम गेट येथील १४ खोकी हटवली

### महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभाग, सदर बझार पोलिसांची संयुक्त कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अखेर जिल्हा परिषद मुख्य प्रवेशद्वारातील (पूनम गेट) १४ अतिक्रमित लोखंडी खोकी पुन्हा हटविण्यात आली. संबंधित १२ जणांनी आपली खोकी स्वत:हून काढून घेतली तर दोन खोकी महापालिका पथकाने जेसीबीच्या साह्याने निष्काशीत केली. या कारवाईमुळे जिल्हा परिषद प्रवेशद्वाराने मोकळा श्वास घेतला.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारात मोठ्या प्रमाणात आंदोलने होत असतात. मात्र याच फुटपाथवर अनधिकृतपणे काही जणांनी खोकी थाटली होती. काही महिन्यापूर्वी महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने ती हटविली होती. दरम्यान, न्यायालयाने जैसे थे स्थितीचा आदेश दिला



होता. तरीही उच्च न्यायालयात धाव घेत येथील संबंधित लोकांनी पुन्हा त्या फुटपाथवर खोकी थाटली होती. दरम्यान, उच्च न्यायालयाने याप्रकरणी निर्णय दिला. त्यानुसार अखेर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभाग आणि सदर बझार पोलीस यांच्या माध्यमातून येथील १४ खोके हटविण्याची संयुक्त कारवाई करण्यात आली. यावेळी कारवाई पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती.

पालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार आज येथे ही कारवाई करण्यात आली. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मनोज पाटोळे उपस्थित होते.

सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



## उमाबाई श्राविका विद्यालयात जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**
रथसप्तमी दिनानिमित्त उमाबाई श्राविका विद्यालयात जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, वरिष्ठ दिप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सुकुम ार वारे, प्रसन्न गाडे,अनुप कस्तुरे, अभिनंदन उपाध्ये, पल्लवी खांडवे यांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून १३ मंत्रासहित सूर्यनमस्कार घालण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जानवी येणेगुरे हिने केले. प्रगती थोरवे यांनी आभार मानले. समृद्धी मोरे हिने सूर्यनमस्कारचे फायदे सांगितले. क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बांगलादेशात पुन्हा उफाळला हिंसाचार

## शेख मुजीबुर रहमान यांचे घर जाळले, स्मारकावर चालविले बुलडोजर

◆ **ढाका, ६ फेब्रुवारी**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा पक्ष अवामी लीगने गुरुवारी दाखल केलेल्या कथित खटल्यांच्या आणि अल्पसंख्यकांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या निषेधार्थ देशव्यापी आंदोलनाची हाक दिली होती. मात्र, त्यापूर्वीच बुधवारी रात्री बांगलादेशातील अनेक शहरांमध्ये हिंसाचार उसळला.

शेख हसीना यांचे वडील आणि बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान यांच्या ढाका येथील निवासस्थानाची जमावाने तोडफोड करीत आग लावली. त्यानंतर गुरुवारी सकाळी रहमान यांच्या स्मारकावर बुलडोजर चालविण्यात आला.

अवामी लीगचे सरचिटणीस महबूब आलम हनीफ यांनी समाज माध्यमावर पोस्ट करीत लिहिले की, जमावाने बुधवारी अनेक शहरात धुडगूस घालत पक्ष नेत्यांच्या घरांची तोडफोड आणि जाळपोळ केली. शेख हसीना यांचे चुलत भाऊ शेख सोहेल, शेख जेवेल यांची घरे बुलडोजरने पाडण्यात आली. हल्ला झाला तेव्हा सुरक्षा दलाचे पथकही उपस्थित होते; मात्र त्यांनी जमावाला रोखले नाही. विद्यार्थी चळवळीच्या नेत्यांनी महानगरपालिकेचे दोन बुलडोझर बोलावून अवामी लीगच्या अनेक नेत्यांची घरे पाडली.



शेख मुजीबुर रहमान यांच्या निवासस्थानावर चढून ते उद्ध्वस्त करताना आंदोलक. सध्या बांगलादेशात मोठ्या प्रमाणात हिंसाचार उसळला आहे

**अवामी लीग नेत्यांची घरे लक्ष्य**

अवामी लीगच्या देशव्यापी आंदोलनापूर्वी बुधवारी रात्री ९ वाजता शेख हसीना त्यांच्या समर्थकांना आभासी संबोधित करणार होत्या. तिथेच, आंदोलनाला प्रत्युत्तर देण्यासाठी बुधवारी सकाळी विद्यार्थी चळवळीच्या नेत्यांनी गुरुवारी 'बुलडोझर मार्च' काढण्याची घोषणा केली. यासाठी समाज माध्यमांवर पोस्ट प्रसारित करण्यात आल्या. त्यात शेख मुजीबुर रहमान यांचे घर पाडणार असल्याचे सांगण्यात आले होते; परंतु निदर्शकांनी बुधवारी रात्रीच धुडगूस घालत रहमान यांच्या निवासस्थानी जाऊन तोडफोड केली व आग लावली. *(वृत्तसंस्था)*

### शेख हसीना यांचा देशवासीयांना संदेश

वडिलांचे घर आणि स्मारकाची तोडफोड केल्याने भाऊक झालेल्या हसीना यांनी संदेशात म्हटले की, 'हा इतका विध्वंस का केला जात आहे, मला देशातील नागरिकांना विचारायचे आहे की, मी असा कुठला गुन्हा केला की, तुम्हाला इतका राग येत आहे. तुम्ही तुमचा इतिहास विसरला, तर कधीही पुढे जाऊ शकत नाही. देशाच्या संविधानावर आणि ध्वजावर हल्ला करणाऱ्यांना कदाचित पाकिस्तानपासून मिळालेले स्वातंत्र्य आवडत नसेल. जर आपण पाकिस्तानात असतो तर आपल्याला भाषेचा किंवा नोकऱ्यांचा अधिकार नसता'.

# म्यानमार सीमेवर काटेरी कुंपण बसविण्यास विरोध

## नागा संघटनेने कामावर जाणाऱ्या स्थानिकांना धमकावले

◆ **इम्फाळ, ६ फेब्रुवारी**

म्यानमारला लागून असलेल्या चार ईशान्य राज्यांच्या १,६४३ किमी लांबीच्या सीमेवर काटेरी तारांचे कुंपण उभारण्याच्या प्रकल्पाला युनायटेड नागा कौन्सिलने (यूएनसी) विरोध केला आहे. कुंपण उभारण्याच्या कामावर जाणाऱ्या स्थानिक नागरिकांना धमकावले जात असून, गंभीर परिणामांचा इशारा देण्यात येत आहे.

बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनच्या (बीआरओ) एका अधिकाऱ्याने सांगितले की, मणिपूरमधील टेंग्नौपोल येथील म्यानमारच्या सीमेवरील फायको आणि थाना गावातील लोक कुंपणाच्या विरोधात होते; परंतु पथकाने सर्वेक्षण थांबवले नाही. आता नागा भागात कुंपणाला विरोध आहे. युनायटेड नागा कौन्सिल कुंपणाच्या कामावर जाणाऱ्या नागरिकांना धमकावत आहे. चार राज्यांच्या १५०० किमी सीमेवर कुंपण आणि रस्ते बांधणीचे काम करायचे आहे. यासाठी ३१ हजार कोटी रुपये लागतील. २० हजार कोटी रुपये कुंपणावर आणि उर्वरित बांधकामावर खर्च होतील.



**राज्यपाल भल्ला यांच्यासोबत अधिकाऱ्यांची चर्चा**

म्यानमरची सर्वांत लांब ५२० किमी सीमा अरुणाचल प्रदेशाला लागून आहे, तर मिझोरम ५१० किमी, मणिपूर ३९८ किमी आणि नागालँडच्या २१५ किमी सीमेवर कुंपण घालण्यात येणार आहे. नागा संघटनेचा कुंपणाला होणारा विरोध पाहता बीआरओचे महासंचालक लेफ्टनंट जनरल रघु श्रीनिवासन आणि इतर अधिकाऱ्यांनी राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची बुधवारी राजभवनात भेट घेतली. *(वृत्तसंस्था)*

### गृहमंत्री शाह यांना पाठविले पत्र

मिझो गटातील सर्वांत मोठी विद्यार्थी संघटना मिझो झिरलाई पालने (एमझेडपी) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र पाठविले आहे. त्यात मुक्त हालचाली करार रद्द करण्याच्या आणि कुंपण उभारण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची विनंती केली.

# अमेरिकेत एकाच वेळी ४० हजार कर्मचारी राजीनामा देणार

### ट्रम्प सत्तेत येताच सर्वांत मोठी घडामोड

◆ **वॉशिंग्टन, ६ फेब्रुवारी**

डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष होताच एवढ्या मोठ्या घडामोडी घडू लागल्या आहेत, ज्या अमेरिकेच्या इतिहासात कधीही घडल्या नाहीत. ट्रम्प यांनी जगभरातील देशांनाही हादरे देण्यास सुरुवात केली आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेची आर्थिक स्थिती चांगली करण्यासाठी संघराज्य सरकारमधील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. याअंतर्गत त्यांनी कर्मचाऱ्यांना बायआऊट पॅकेज ऑफर केले होते. ते एकाचवेळी ४० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी स्वीकारले आहे.

ट्रम्प यांच्या या 'बायआऊट पॅकेज'चा स्वीकार करीत ४० हजार कर्मचाऱ्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प प्रशासनाने या कर्मचाऱ्यांना एकतर हे पॅकेज स्वीकारा किंवा स्वतःहून नोकरीचा राजीनामा द्या, असा इशारा दिला होता. यासाठी त्यांनी ६ फेब्रुवारीपर्यंतची वेळ दिली होती.

सरकारी आकड्यांनुसार, अमेरिकेत संघराज्य कर्मचाऱ्यांची संख्या ३० लाखांपेक्षा जास्त आहे. नोकरीवरून राजीनामा दिल्याच्या बदल्यात संघीय कर्मचाऱ्यांना आठ महिन्यांचा पगार आणि निश्चित भत्ता दिला जाणार आहे. कर्मचाऱ्यांची ही संख्या ट्रम्प यांनी निर्धारित केलेल्या आकड्यापेक्षा कमी आहे. यामुळे आता पुढे आणखी किती दबाव टाकला जातो, यावर सारे अवलंबून असणार आहे. अमेरिकन फेडरेशन गव्हर्नमेंट एम्प्लॉईज युनियनच्या अध्यक्ष एव्हरेट केली यांनी ट्रम्प यांच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त केली होती. *(वृत्तसंस्था)*

## मध्यप्रदेशात दोन ट्रक अपघातात सहा ठार


**उमरिया :** मध्यप्रदेशातील उमरिया आणि भिंड जिल्ह्यात गुरुवारी ट्रकच्या दोन वेगवेगळ्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. उमरियामध्ये सकाळी ७.३० च्या सुमारास दोन ट्रकमध्ये झालेल्या धडकेत तीन महिला आणि एक पुरुष ठार झाला आणि अन्य एक जण जखमी झाला, असे अधिकाऱ्याने सांगितले. हा अपघात पाली भागातील एका भोजनालयाजवळ झाला. त्यातील एक ट्रक शहडोलहून उमरियाकडे जात होता, तर दुसरा ट्रक विरुद्ध दिशेने जात होता. उमरियाकडे जाणाऱ्या ट्रकमधील तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर दुसऱ्या वाहनात प्रवास करणाऱ्या एका व्यक्तीचा जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. एका वेगळ्या अपघातात भिंड जिल्ह्यातील एका महामार्गावर दोन्ही वाहनांची धडक होऊन दोन ट्रकच्या चालकांचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्याने सांगितले.



प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात दररोज लाखो भाविक स्नान करीत आहेत. गुरुवारीही भाविकांनी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या त्रिवेणी संगमात प्रचंड गर्दी केली होती




## कुंभमेळ्यासाठी महत्त्वाची ठिकाणे



**हरिद्वार :** कुंभ राशीत बृहस्पतीचा प्रवेश झाल्यास आणि मेष राशीमध्ये सूर्याचा प्रवेश झाल्यास हरिद्वारमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हरिद्वार व प्रयागराजमध्ये दोन कुंभ पर्वांमध्ये सहा वर्षांच्या यंत्रात अर्धकुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते.

**प्रयागराज :** मेष राशीच्या चक्रात बृहस्पती किंवा सूर्य आणि चंद्राने मकर राशीत प्रवेश केल्यास अमावास्येच्या दिवशी प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

**नाशिक :** सिंह राशीत बृहस्पतीच्या प्रवेशानंतर कुंभमेळ्याचे आयोजन गोदावरीच्या तटावर नाशिकमध्ये केले जाते. अमावास्येच्या दिवशी बृहस्पती, सूर्य व चंद्र या ग्रहांनी कर्क राशीत प्रवेश केल्यानेही नाशिकमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन होते. कुंभमेळ्याला सिंहस्थ म्हणतात; कारण या कार्यकाळात सिंह राशीत बृहस्पतीचा प्रवेश होतो.

**उज्जैन :** सिंह राशीत बृहस्पती आणि मेष राशीत सूर्याच्या प्रवेशानंतर उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. याव्यतिरिक्त कार्तिक अमावास्येच्या दिवशी चंद्र व सूर्य एकत्र असताना आणि बृहस्पतीने तुला राशीत प्रवेश केल्यास उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. सिंह राशीचा समावेश असल्याने याला सिंहस्थ कुंभमेळा असे म्हटले जाते.

# कुंभ आणि महाकुंभ मेळ्यात फरक काय?

**कुंभमेळ्याचे किती प्रकार असतात?**

कुंभमेळ्याचे आयोजन चार शहरात केले जाते; ज्यात हरिद्वार, प्रयागराज, नाशिक व उज्जैनचा समावेश आहे. नाशिक व उज्जैन येथील कुंभमेळ्याला सामान्यतः सिंहस्थ म्हणतात आणि अन्य शहरांत कुंभ, अर्धकुंभ व महाकुंभाचे आयोजन केले जाते. कुंभ मेळा हा दर तीन वर्षांनी असतो, महाकुंभमेळा दर १२ वर्षांनी असतो. यात महाकुंभ सर्वांत पवित्र मानला जातो. कुंभमेळ्याचे चार प्रकार आहेत. पूर्ण कुंभ, अर्ध कुंभ, कुंभ मेळा व महा (महान) कुंभमेळा.



**कुंभ :** कुंभचा अर्थ होतो कलश. प्रत्येक तीन वर्षांनी उज्जैन सोडून हरिद्वार, प्रयागराज व नाशिकमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. या पवित्र स्थानांवरील नद्यांमध्ये डुबकी मारून पापांपासून मुक्ती मिळते आणि मोक्ष प्राप्त होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

**अर्धकुंभ :** अर्धचा अर्थ होतो अर्धा. हरिद्वार व प्रयागराज या दोन पवित्र ठिकाणी दर सहा वर्षांनी अर्ध कुंभमेळ्याचे आयोजन होते.

**पूर्णकुंभ :** प्रत्येक १२ वर्षांनी पूर्णकुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. उदाहरणार्थ- उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन होते. त्याच्या तीन वर्षांनंतर हरिद्वार, त्यानंतर पुन्हा तीन वर्षांनंतर प्रयागराज आणि पुढील तीन वर्षांनंतर नाशिक येथे कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते, हे चक्र पूर्ण झाल्यास याला पूर्णकुंभ असे म्हणतात. याच पद्धतीने जेव्हा हरिद्वार, नाशिक किंवा प्रयागराजमध्ये १२ वर्षांनंतर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाईल, तेव्हा त्याला पूर्ण कुंभ असे म्हटले जाते. हिंदू पंचांगानुसार देवतांचे १२ दिवस म्हणजे माणसांची १२ वर्षे असतात, असे मानले जाते. त्यामुळे पूर्ण महाकुंभमेळ्याचे आयोजनदेखील प्रत्येक १२ वर्षांनी होते.

**महाकुंभ :** मान्यतेनुसार प्रयागराजमध्ये १४४ वर्षांमध्ये एकदा महाकुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. १४४ वर्षेच का? तर १२ गुणिले १२ केले की १४४ होतात. अशी मान्यता आहे की, कुंभमेळेदेखील १२ असतात. त्यातील चार मेळ्यांचे आयोजन पृथ्वीवर, तर उर्वरित मेळ्यांचे आयोजन देवलोकांत केले जाते.

या मान्यतेनुसार, प्रत्येक १४४ वर्षांनंतर प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्याचे आयोजन होते. २०१३ साली प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते; कारण- त्याच वर्षी १४४ वर्षे पूर्ण झाली होती. आता पुढील महाकुंभ मेळा १३८ वर्षांनी आयोजित होणार असल्याचे सांगितले जाते.

**सिंहस्थ :** सिंहस्थचा संबंध सिंह राशीसोबत आहे. सिंह राशीत बृहस्पती आणि मेष राशीत सूर्याचा प्रवेश झाल्यास उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हा योग प्रत्येक १२ वर्षांनंतर येतो. याच प्रकारचा योग घडून आल्यास नाशिकमध्येही सिंहस्थचे आयोजन केले जाते. या कुंभामुळेच ही धारणा प्रचलित झाली की, कुंभ मेळ्याचे आयोजन प्रत्येक १२ वर्षांनी होते; पण हे खरे नाही. कुंभ मेळा उज्जैन सोडल्यास इतर तीन शहरांत तीन-तीन वर्षांनीच आयोजित होतो.

# पाच लाख लाचप्रकरणी दोघे पोलीस कर्मचारी निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ६ फेब्रुवारी-**

अर्ज चौकशीवरुन भविष्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यामधून आरोपींची नावे कमी करण्यासाठी दहा लाखाच्या लाचेची मागणी करुन पहिला हप्ता पाच लाख स्वीकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडलेले मंगळवेढ्याचे पोलीस हवालदार महेश कोळी, पोलीस अंमलदार वैभव घायाळ या दोघांना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सेवेतून निलंबित केले जाहे.

हा आदेश नुकताच मंगळवेढा पोलीस प्रशासनास प्राप्त झाला असल्याची माहिती डीवायएसपी विक्रांत गायकवाड यांनी दिली. दोघा पोलीस कर्मचाऱ्यांनी श्री सिद्धेश्वर माचणूर मंदिर परिसरात पाच लाखाची लाच घेताना २५ जानेवारी रोजी सांगली लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडून दोघाविरुध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल केला होता. तपासिक अंमलदार सोलापूर लाचलुचपत विभागाचे डीवायएसपी गणेश कुंभार यांनी अटक करुन पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात त्यांना उभे केल्यावर पहिल्यांदा दोन दिवसांची व पुन्हा दोन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी मिळाली होती. दोघाविरुद्ध गुन्हा दाखल होऊन २४ तासापेक्षा ते अधिक काळ कारागृहात राहिल्याने त्यांना पोलीस अधीक्षकांनी निलंबित करुन त्यांना सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे अटॅच केले आहे.

# ५५० वर्षांनंतर दिगंबर आखाड्यात निवडणूक

## पहिल्यांदाच निवडली नवी कार्यकारिणी

महाकुंभादरम्यान वैष्णवांच्या सर्वांत मोठ्या दिगंबर अनि आखाड्याने जवळपास ५५० वर्षांनंतर लोकतांत्रिक व्यवस्थेच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले आहे. अनि आखाड्यात आता सर्व पदांसाठी निवडणूक घेण्याचा निर्णय झाला असून, त्यांचा कार्यकाळ १२ वर्षांसाठी निश्चित करण्यात आला आहे.

आतापर्यंत आखाड्यातील पदाधिकाऱ्यांचा कोणताही कार्यकाळ निश्चित नव्हता. आखाड्याचे अध्यक्ष, महामंत्र्यांसह अन्य पदाधिकारी अगदी आजीवन पदावर कायम राहात होते. अखिल भारतीय श्रीपंच दिगंबर अनि आखाड्याला सोडून अनि निर्वाणी आणि निर्मोही आखाड्यात व्यवस्था संचालनासाठी दर १२ वर्षांत पदाधिकाऱ्यांची निवडणूक होते, पण दिगंबर अनि आखाड्यात ही व्यवस्था लागू नव्हती. पदाधिकाऱ्याच्या निधनानंतर नव्या सदस्याला जागा मिळत होती. मागील ५५० वर्षांपासून हीच परंपरा सुरू होती. आता त्यांनी प्रथमच निवडणूक घेतली आहे. यात अध्यक्ष म्हणून अयोध्येचे वैष्णव दास, महामंत्री बलराम दास (उज्जैन), मंत्री जानकी दास (फरिदाबाद), पुजारी सीताराम दास (छत्तीसगड) यांची निवड झाली आहे. सर्वसहमतीने ही निवडणूक झाली. आता पुढील १२ वर्षे हे पदाधिकारी आखाड्याचे कामकाज पाहणार आहेत. पुढील प्रयागराज कुंभादम्यान पुन्हा निवडणूक होईल.

### आखाड्याकडे अब्जावधीची संपत्ती

दिगंबर अनि आखाडा अन्य दोन अनि आखाड्यांच्या तुलनेत सर्वांत मोठा मानला जातो. आखाड्याच्या सहा बैठका अयोध्या, पुरी, नाशिक, चित्रकूट, उज्जैन आणि वृंदावनमध्ये आहेत. आखाड्याकडे अब्जावधींची जमीन, शेत आणि अन्य संपत्ती आहे. आखाड्याच्या नियंत्रणात देशातील बहुताश मठ-मंदिरे आहेत.

# प्रयागराज ट्रेनला मुख्यमंत्री सावंत यांनी दाखवला हिरवा झेंडा



प्रयागराजकडे जाणाऱ्या विशेष ट्रेनला हिरवा झेंडा दाखविताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत

◆ **पणजी, ६ फेब्रुवारी**


गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी गुरुवारी पणजीजवळील करमाळी रेल्वे स्थानक ते उत्तरप्रदेशातील प्रयागराज या विशेष रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. गोवा सरकारने तटीय राज्यातून प्रयागराजपर्यंत भाविकांसाठी तीन विशेष गाड्या सुरू केल्या आहेत. सावंत यांनी करमाळी येथे पहिल्या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. यानंतर लगेच ही गाडी गोव्याच्या विविध भागांतून सुमारे १,००० भाविकांना घेऊन प्रयागराजकडे ३४ तासांच्या प्रवासासाठी निघाली.

अन्य दोन गाड्या १३ आणि २१ फेब्रुवारी रोजी गोव्याहून सुटतील. अधिक मागणी असल्यास राज्य सरकार अतिरिक्त मोफत गाड्या चालवण्याचा विचार करू शकते. महाकुंभाच्या ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सावंत यांनी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे अभिनंदन केले. या भाविकांना महाकुंभात २४ तास घालवायला मिळतील, त्यानंतर त्यांना प्रयागराजहून परतीच्या ट्रेनने जावे लागेल. *(वृत्तसंस्था)*

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती परवाने तातडीने देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे तरी पोलीस प्रशासनाच्या वतीने ऑनलाईन व ऑफलाईन उत्सव परवाना तात्काळ सुरू करावेत, अशा मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांना देण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्तांनी सांगितले की, येत्या दहा तारखेला पोलीस आयुक्त कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे आणि चार दिवसात पोलीस स्टेशन वाईज बैठका होणार असून, उत्सव परवाना बाबत कोणतीच अडचण मंडळाला येणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. महाराष्ट्रात १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी होते. १४ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत विविध मंडळाच्या भव्य मिरवणुकाही निघतात. यामुळे पोलीस आयुक्तालयाच्या वतीने शांतता कमिटीची बैठक लवकर आयोजित करण्यात यावी तसेच ऑनलाईन व ऑफलाईन परवानगी प्रक्रिया सुरू करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, उपाध्यक्ष फिरोज सय्यद, जिल्हा सचिव बबन डिंगणे, मल्लिकार्जुन शेवगार, दिनेश वर्पे, सचिन जाधव आदी उपस्थित होते.

## अग्रलेख...

# ...म्हणून वास्तव स्पष्ट झाले!

संसद असो अथवा कोणत्याही राज्याची विधिमंडळे, या सभागृहांतील सदस्यांना निर्भयपणे बोलण्याचा आणि आपली मते मांडण्याचा निःसंशय अधिकार असतो. सभागृहात काय बोलावे आणि काय बोलू नये याचे तारतम्य बाळगण्याचे कर्तव्य मात्र त्यांना सांभाळावे लागते. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट?पतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरावावरील चर्चेत बोलताना विरोधी पक्षनेत्यासारख्या जबाबदार आणि गंभीर पदावरील व्यक्तीस वारंवार त्याचे स्मरण करून देण्याची वेळ लोकसभा सभापतींवर यावी आणि तरीही आपले तथ्यहीन वक्तव्याचे घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न विरोधी पक्षनेत्याकडून होत राहावा, हे अनाकलनीय होते की देशाची दिशाभूल करण्यासाठी जाणीवपूर्वक सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग होते, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. भारताच्या भूभागावरील चिनी अतिक्रमण, अमेरिकेच्या राष्ट?ाध्यक्षांकडून पंतप्रधानांस आलेले आमंत्रण, गरिबी आणि इतर अनेक विषयांवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे प्रदीर्घ भाषण सुरू होते, तेव्हा विरोधी बाकांवरील सदस्य बाके वाजवत असले, तरी या पदावरील व्यक्तीला आपल्या जबाबदारीचे भान आहे की नाही, याची शंका विरोधकांतील बुजुर्गांच्या मनात नक्कीच आली असेल. कोणत्याही एखाद्या गंभीर विषयावर विशेषतः आंतरराष्ट?ीय संबंधांसारख्या नाजूक मुद्यावर बोलताना सभागृहात त्याचे काही ठोस संदर्भ सादर करावे लागतात, याची आठवण लोकसभा सभापती आणि सत्ताधारी पक्षाचे अनेक नेते वारंवार करून देत असतानाही राहुल गांधी यांच्या अनेक विधानांसाठी कोणतेही ठोस संदर्भ सभागृहात सादर न केल्याने, त्यांच्या हेतूविषयी शंका उपस्थित होणे साहजिक आहे.

महाराष्ट?ातील विधानसभा निवडणुकांच्या निकालाबाबत असो, देशाच्या सीमावर्ती भागातील संवेदनशील बाबींवर बोलणे असो, संरक्षणासारख्या मुद्यावर बोलणे असो किंवा परराष्ट? नीतीसंबंधीच्या मुद्यावर बोलणे असो, त्यासंबंधीचे ठोस पुरावे सोबत असणे व त्यांची मागणी झाल्यास ते सादर करणे ही सभागृहाच्या कामकाजाची रीत असते. राहुल गांधी यांनी त्याची फारशी दखल न घेतल्याने, सभागृहातील कामकाजाच्या संकेताबाबत ते गंभीर आहेत का किंवा किती गंभीर आहेत, याचे स्पष्ट उत्तर त्या दिवशी मिळाले. सभागृहाचे सदस्य नसलेल्या व्यक्तीचा नामोल्लेख व त्याच्यासंबंधीची चर्चा न करणे हादेखील सभागृहातील सभ्यतेचा एक संकेत असतो. राहुल गांधी यांना त्याचीही जाणीव सभापतींनी करून द्यावी, हे विरोधी पक्षनेतेपदाच्या प्रतिष्ठेस साजेसे निश्चितच नाही. असे असले, तरी सभागृहात बोलणाऱ्या प्रत्येक सदस्याने उपस्थित केलेल्या मुद्याची दखल सत्ताधाऱ्यांस उत्तरादरम्यान घ्यावी लागते. यामुळेच राहुल गांधींपासून संजय राऊत यांच्यापर्यंत ज्या सदस्यांनी निश्चित व ठोस दाखले न देता केलेल्या मुद्यांची दखल सरकारकडून घेतली गेली. अन्यथा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या चर्चेवरील उत्तरात देशाच्या भूतकाळातील कारभाराचा पाढा वाचून काँग्रेसच्या एकूण कार्यशैलीचा पंचनामा करण्याची संधी गमवावी लागली असती. राहुल गांधी यांनी केलेल्या विधानांमुळे पंतप्रधानांना १० वर्षांपूर्वीच्या देशाच्या एकूण स्थितीचा तपशीलवार मागोवा घेण्याचे निमित्त साधता आले, ते देशाच्या दृष्टीने उपयुक्त ठरले आहे. देशात गरिबी दूर करण्याच्या केवळ घोषणा होत होत्या. वर्षानुवर्षे 'गरिबी हटाओ'चे नारे दिले जात होते. पण, गेल्या १० वर्षांत देशातील २५ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेतून बाहेर पडली, याचा पुनरुच्चार करण्याची संधी राहुल गांधींच्या त्या भाषणामुळेच पंतप्रधानांना प्राप्त झाली. काँग्रेसच्या मुखवट्याआडचा चेहरा उघड करण्याची संधी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याआधीही अनेकदा पंतप्रधानांना दिली आहे. सभागृहात आणि सभागृहाबाहेरही पंतप्रधानांनी काँग्रेसी नीतीचा वारंवार खरपूस समाचार घेतला आहे. गेल्या १० वर्षांत देशातील चार कोटी गरिबांच्या डोक्यावर घराचे छप्पर लाभले आहे आणि सामान्य महिलांकरिता १२ कोटींहून अधिक शौचालय सुविधांचा आश्वस्त लाभ मिळाला आहे. गरिबांच्या नावाने राजकारण करणारे जे नेते आपल्या जीवनशैलीला आलिशान बनविण्यासाठी सरकारी सुविधांचा गैरवापर करतात, त्यांच्या डोळ्यातही या निमित्ताने पंतप्रधानांनी अंजन घातले; ते योग्य झाले. अशा उपचारामुळे डोळे उघडून आसपासच्या वस्तुस्थितीकडे पाहण्याची व बदल जाणून घेऊन त्याचा मोकळेपणाने स्वीकार करण्याची प्रवृत्ती जेव्हा विरोधकांमध्ये जन्मास येईल, तेव्हा त्या जाणिवा प्रगल्भ झाल्या असे म्हणता येईल. राष्ट?पतींच्या अभिभाषणातील मुद्यांची 'तेच ते' म्हणून खिल्ली उडविणाऱ्या राहुल गांधींमुळे भूतकाळातील ज्या अनेक बाबींच्या आठवणींची उजळणी झाली, त्यात भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित होणे अपरिहार्य होतेच. दिल्लीतून पाठविल्या जाणाऱ्या प्रत्येक रुपयामागील केवळ १५ पैसे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतात, या हातचलाखीचे आश्चर्य माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी उघडपणे व्यक्त केले होते. अलिकडे सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांना थेट हस्तांतरण योजनेतून केवळ योजनेच्या लाभास पात्र असलेल्या व्यक्तींच्याच खात्यात जमा होणाऱ्या मदतीच्या निधीचा अनुभव असल्याने दोन सत्ताकाळांमधील फरकाचा तुलनात्मक आढावा घेणेही यामुळेच देशातील जनतेस शक्य झाले आहे. केवळ या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीतून अयोग्य हातात जाणारी तीन लाख कोटींची बचत झाली आहे, हे राहुल गांधींच्या भाषणामुळे पंतप्रधानांकडून स्पष्ट झाले, याकरिता राहुल गांधींचे आभार मानायलाच हवेत. काँग्रेसी सत्ताकाळात वर्तमानपत्रांचे मथळे लाखो आणि कोट्यवधींच्या घोटाळ्यांच्या बातम्यांनी सजलेले असत. आता असे मथळे तर अदृश्य झालेच; पण घोटाळ्यांना थारादेखील न राहिल्याने देशाची लाखो-कोटी रुपयांची बचत झाली, हा मुद्दाही पंतप्रधानांना अधोरेखित करावा लागला. राहुल गांधी यांनी भाषणात तथ्यहीन वक्तव्ये टाळली असती, तर कदाचित पंतप्रधानांच्या उत्तराची दिशा भूतकाळकेंद्रित न राहता केवळ भविष्यवेधी राहिली असती, यात शंका नाही. म्हणूनच, विरोधी पक्षनेते पदासारख्या जबाबदार पदावरून केलेल्या तथ्यहीन वक्तव्यांची दखल घेऊन सत्ताधाऱ्यांना त्याची उत्तरे द्यावी लागली, तरी त्या निमित्ताने उघड होणाऱ्या बाबींच्या कडवट मात्रा मात्र विरोधकांना निमूटपणे घशाखाली घालून गिळाव्या लागतात, ते कसे, हे या चर्चेदरम्यान अनेकांनी अनुभवले असेल. घोटाळेविरहित कारभार, गरिबांच्या कल्याणाच्या आणि थेट लाभाच्या योजनांची नीती यामुळे सरकारी तिजोरीतून वाचलेला पैसा कल्याणकारी योजनांकरिता वापरण्याच्या मोदी सरकारच्या नीतीचा दाखला देताना पंतप्रधानांनी केलेला 'शिशमहल'चा उल्लेखही बराच बोलका ठरला आहे.

जनऔषधी योजना, स्वच्छता अभियान, नळाद्वारे पाणीपुरवठा यासारख्या योजना केवळ सरकारकडून लोकानुनयासाठी राबविल्या गेलेल्या नाहीत. या योजनांमुळे घरोघरीच्या अर्थसंकल्पातील हजारो-कोटींचा खर्च वाचला आहे. मिळालेल्या आरोग्यदायी लाभामुळे कुटुंबांचा आरोग्यावरील खर्च कमी झाल्याने जनतेची १२ हजार कोटींची बचत झाली, हे लोकसभेच्या मंचावरूनच स्पष्ट केले. नळाद्वारे पाणी योजनेमुळे प्रत्येक लाभार्थी कुटुंबाची सरासरी ४० हजार रुपयांची बचत झाली, तर जनऔषधी केंद्रांमुळे देशातील जनतेच्या औषधांवरील खर्चात ३० हजार कोटींची बचत झाली. मोफत धान्य योजनेमुळे लाभार्थी कुटुंबांच्या होणाऱ्या सुमारे ३० हजार कोटींच्या बचतीमुळे त्यांचे जीवनमान उंचावणे शक्य होते, असा सरकारी खाक्याला याआधी कधीही न शोभलेला विचार देशासमोर स्पष्ट झाला. राहुल गांधी अनेकदा संदर्भहीन बोलतात, त्यांच्या वक्तव्यात तथ्यांचा अभाव असतो आणि 'ठोकुनि देतो' ही त्यांच्या वक्तव्याची शैली असते, असे म्हटले जाते. पण कोणाच्याही अशा अभावपूर्ण वक्तव्यांमुळे वास्तवाचे चित्र अधिक ठळकपणे स्पष्ट होण्यास मदतच होत असते, हे संसदेतील चर्चेच्या निमित्ताने स्पष्ट झाले. १० वर्षांपूर्वीच्या घटनांकडे बारकाईने पाहताना मनाला क्लेश होतात, असे पंतप्रधान मोदी म्हणाले, तेव्हा त्यांचे भाषण ऐकणाऱ्यांपैकी अनेकांनी त्याच्याशी सहमती व्यक्त केली असेल. राहुल गांधी यांच्यासारखा नेता सभागृहात असावयास हवा, असे अनेकांस वाटते, ते बहुधा त्यामुळेच असावे.

## जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

# महाभारत ते भारत (१२)

महाभारतातील शांतिपर्वात, राजधर्माच्या विवेचनात राजधर्माचे नीट पालन होण्यासाठी दंडनीतीचे पालन कसे आवश्यक आहे. त्यामुळे प्रजारक्षण, राष्ट्ररक्षण आणि धर्मरक्षण कसे होते, याचे विस्तृत विवेचन भीष्म पितामहांनी नवनिर्वाचित राजा युधिष्ठिराला केले आहे. ते म्हणतात, ''हे राजन! जो राजा दंडनीतीचे नीट पालन करतो तोच आपली प्रजा, राष्ट्र धर्म याचे संरक्षण करू शकतो. राजदंडाचे भय जर नसले (आजच्या परिभाषेत कायद्याचा धाक जर नसला) तर 'मात्स्यन्याय' म्हणजे 'मोठ्या माशाने लहान माश्याला खाणे' प्रारंभ होतो. जे सबल आहेत ते दुर्बलांचा सहजपणे विनाश करतात, गुराखी नसलेल्या पशूंच्या कळपाप्रमाणे लोकसमूहाची अवस्था होते. बलवान लोक सामान्य लोकांच्या द्रव्यांचा अपहार करू लागतात. (खंडणी वसुली) दुष्ट प्रवृत्तीचे, दांडगट मनोवृत्तीचे लोक इतरांची स्त्री, पुत्र, द्रव्य, परिहार, वाहने, वस्त्र, अलंकार यांचे अपहरण करू लागतात. कोणावरही कुणाचा अधिकार राहत नाही. या प्रकारे सर्वत्र अराजकाची अवस्था निर्माण होते. लक्षात ठेव, अराजकाच्या अवस्थेत असलेला समाज, राष्ट्र हे सहजपणे शत्रूच्या विविध आक्रमणाचे भक्ष्य बनतात.'' (महाभारत - राजधर्म पर्व अ. ६८ वा) महाभारतात वर वर्णन केलेल्या अराजकीय परिस्थितीचा अनुभव कमी-अधिक प्रमाणात, आजचा अपवाद सोडला, तर उत्तर प्रदेश, बिहार, काही अन्य प्रांत म्हणजे काश्मीर, बंगाल या प्रांतातील जनतेने घेतला आहे की नाही? याचे महत्त्वाचे कारण म्हणजे स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी, घराणेशाहीसाठी, स्वार्थासाठी, तो साधण्यासाठी आपल्या सोयीने वापरल्या जाणाऱ्या तुष्टीकरण, सेक्युरिझम या संकल्पनांचा वापर करणाऱ्या राष्ट्रविघातक मनोवृत्ती असलेल्या लोकांच्या हाती सत्तेचे सुकाणू होते. त्याचा परिणाम म्हणून भारताची टोकाशाही अधिष्ठित राज्य नौका भरकटली होती. तिचे अधिष्ठानच बदललेले होते. एका राजकीय विचारवंताने त्याचे बदललेल्या स्वरूपाचे केलेले विदारक वर्णन मागील लेखात आपण पाहिलेच आहे. तसे पुन्हा होऊ नये यासाठी जनशक्तीने अखंड सावधान राहणे ही काळाची गरज आहे.

### शक्तीची उपासना हाच एकमेव मार्ग

महाभारतात राष्ट्र, स्वधर्म, समाज, संस्कृती, स्त्री यांचे रक्षण कसे करावे, याचे कायमस्वरूपी उपयोगात पडेल अशा प्रकारचे मार्गदर्शन केले आहे. भगवद्गीतेचे उदात्त तत्त्वज्ञान लोकांनी ऐकले. कारण गीता सांगणाऱ्या भगवान श्रीकृष्णाच्या हाती, कोणत्याही अधम वृत्तीच्या, दुष्ट मनोवृत्तीच्या पुरुषाचा कंठनाल छेदणारे लखलखीत धारेचे सुदर्शन चक्र होते. समाजातील, कोणत्याही कुटुंबातील गृहलक्ष्मीचे कुलवधूच्या पातिव्रत्याचे संरक्षण कसे करावे आणि त्याच्यावर हात टाकणाऱ्या कामांधाचा हात मुळापासून कसा उखडून फेकावा, याचे प्रात्यक्षिक महाभारताने भीमाच्या रूपाने मांडले आहे. तो आदर्श डोळ्यांसमोर ठेवून शक्तीची उपासना करणारे युवकच 'लव्ह जिहाद' थांबवू शकतात. निषेध, ठराव, मोर्चे, आंदोलनांनी असे अत्याचारी ठिकाणावर येणे कधीही शक्य नसते. शाश्वत जीवन मूल्यांसाठी एक विरुद्ध अनेकांशी बेडरपणाने युद्ध करणारा अभिमन्यू हा महाभारताचा आदर्श युवक आहे. त्याचा वारसा चालविणारे वारसदार ही आजच्या भारताची गरज आहे. भारतीय संस्कृतीत मातृशक्तीला, नारीशक्तीला प्रत्यक्ष शक्तीचा म्हणजे दैवी शक्तीचा अवतार मानले आहे. ती एक प्रेरणास्रोत आहे. तो स्रोत अत्यंत दाहक आणि लाव्हा रसाप्रमाणे तप्त आहे. त्याच्या तडाख्यात जे सापडेल त्याचे अस्तित्वच नष्ट करण्याचे स्फोटक सामर्थ्य त्याच्यात आहे. महर्षी वाल्मीकिंनी रामायणात सीतेच्या रूपाने तो प्रकट केला. त्या ज्वालामुखीच्या लाव्हा रसात 'रावणशाही' नष्ट झाली. महाभारतात महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून द्रौपदीच्या रूपाने तो प्रकटला आणि दुःशासनाच्या रक्ताने माखल्याशिवाय मी वेणी घालणार नाही, या दाहक प्रतिशोधाच्या अखंडपणे तेवत राहणाऱ्या ठिणगीचा वणवा होऊन कुरुक्षेत्र घडले. धृतराष्ट्री मनोवृती अकरा अक्षौणी सैन्यासह पूर्णपणे नष्ट झाली. आजही अंतराळात दाहीर राजाच्या कन्यापासून तो काश्मीर पंडितांच्या कन्यापर्यंतच्या बलात्कारांच्या वेदानामयी किंकाळ्यांचे अस्फुट ध्वनी तरंगत आहेत. त्यांचे आत्मे आजही भीमाचा वारसा चालविणारा कुणीतरी 'भारतात' जन्माला येईल आणि या कामांधांच्या रक्ताने आमच्या आत्म्याच्या मुक्ततेसाठी त्यांच्या रक्ताने आमच्या नावे 'तर्पण' करील. या अभिलाषेने अतृप्त मानाने फिरत असतील; पण लक्षात कोण घेतो?

शक्तीच्या सामर्थ्यावर संघटित समाजजीवन ही आपल्या सनातन वैदिक संस्कृतीची अनादिपरंपरा आहे. 'शापादपि-शरादपि' हे त्याचे व्यावहारिक स्तरावरील घोषवाक्य आहे. वैचारिक, तात्त्विक, बौद्धिक स्तरावर म्हणाल, तर त्याही स्तरावर वादाच्या रूपाने आम्ही संघर्षास तयार आहोत. जो संघर्ष वैदिक संस्कृतीने कुमारील भट्ट, आद्य शंकराचार्यांच्या माध्यमातून केला. शारीरिक बलाच्या रूपाने म्हणाल तर इ. स. सहाव्या शतकापासून तो कारगिल, बांगलादेश मुक्तीपर्यंत आपण संघर्षरतच आहोत. पण, अद्याप हा संघर्ष संपलेला नाही. कारण कोणत्याही अनैसर्गिक फाळणीचा परिणाम हा कुरुक्षेत्रावरच ठरत असतो आणि तो एकतर पांडव राहतील, नाही तर कौरव याच पद्धतीने संपत असतो. यात युधिष्ठिराच्या सदिच्छेला 'हिंदू-मुस्लिम भाई भाई'च्या घोषणांना तसेच 'ईश्वर अल्ला तेरो नाम' या मृगजळी सर्वधर्म समानसारख्या भंपक आणि ठिसूळ तत्त्वज्ञानाला काहीही अर्थ नसतो. हे कटू असले तरी सत्य आहे. महाभारतात अधोरेखित झालेले, प्रत्ययाला आलेले हे 'सत्य' आपण नाकारले. त्याची किंमत आजही आपण देतोच आहोत. या कटू सत्याची जाणीव बौद्धिक स्तरावर, इतिहासाच्या प्रदीर्घ वाटचालीचा, हिंदुत्वाचा, भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यासावर आधारित निष्कर्ष स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी सन १९३८ सालीच पं. जवाहरलाल नेहरूंना लिहिलेल्या एका पत्रात स्पष्टपणे कळविला होता की, हा हिंदू आणि मुस्लिम, हिंदुस्तान आणि पाकिस्तान असा संघर्ष नाही तर 'इट इज द कॉन्फ्लिट बिटवीन टु आयडॉलॉजीज' त्यामुळे त्या एकत्र नांदूच शकत नाही. त्यांच्यात अखंड संघर्ष होतच राहणार. तो संघर्ष मिटविण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे एक तर 'अखंड हिंदुस्तान' किंवा 'अखंड पाकिस्तान.'

वि. दा. सावरकरांचा अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध सल्ला पाकिस्तान, जमात-ए-इस्लामी, बांगलादेशातील, भारतातील मुल्ला-मौलवींना पटला आहे. ते 'त्या' दृष्टीने कामाला लागले आहेत; आणि आम्ही?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

संजय रामगिरवार

# फोर्ट विलियम नव्हे, विजय दुर्ग!

'नावात काय आहे?' असा प्रश्न जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअरला भलेही पडला असेल, पण भारतीयत्व जपणाऱ्या विद्यमान केंद्र सरकारच्या दृष्टीने हा कोट्यवधी भारतीयांच्या मानबिंदूचा, संस्कृतीचा, सद्भावनेचा आणि आपलेपणाचा प्रश्न आहे. बुधवारी, भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडचे मुख्यालय 'फोर्ट विलियम'चे नाव बदलून 'विजय दुर्ग' ठेवण्यात आले आहे. भारतीय परंपरा, लष्करी अभिमान आणि स्वदेशी अस्मितेला प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने हा क्रांतिकारी बदल करण्यात आला, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याचवेळी काँग्रेस पक्षाच्या प्रदीर्घ सत्ताकाळात तो झाला नाही, हेही विशेषत्वाने येथे नमूद केले पाहिजे. ब्रिटिशांचा राजा विलियम तृतीयच्या नावे १७८१ मध्ये उभारलेली ही वास्तू त्यांच्या राजवटीच्या लष्करी संरचनेचा भाग होती. पुढे भारतीय सेनेच्या पूर्वी कमांडचे ते मुख्यालय झाले.

कोलकाता येथील या फोर्ट विलियमचे नाव आता विजय दुर्ग ठेवण्यात झाले आहे. असे करण्यामागचे कारण भारताच्या लष्करी परंपरा आणि संस्कृतीला चालना देणे आणि त्याचा वारसा जपणे असा आहे. ब्रिटिश राजवटीत निर्माण झालेली नावे आणि चिन्हे हटवून भारतीयत्व रुजवणे हे स्वदेशी सरकारचे काम आहे; जे काँग्रेसी सत्ताधाऱ्यांनी कधीच केले नाही. आता मात्र ते आवर्जून केले जात आहे. आपण त्यासाठी आपल्या सरकारचे कौतुक केले पाहिजे. विशेष म्हणजे, महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग किनारपट्टीवरील ऐतिहासिक किल्ल्यावरून हे नाव घेतले आहे, हीसुद्धा एक महाराष्ट्रीय म्हणून आपल्यासाठी गौरवाचीच बाब आहे. विजय दुर्ग हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला एक महत्त्वाचे नौदल तळ आहे; ज्याने मराठा साम्राज्याची सागरी शक्ती प्रबळ केली होती. खरे तर, विजय दुर्ग हे भारताच्या लष्करी आत्मनिर्भरता आणि विजयाचेच प्रतीक म्हणून ओळखले जाते. ते भारतीय लष्कराची गौरवशाली परंपराही दर्शवते.



आता केवळ या किल्ल्याचेच नाव बदलण्यात आले नाही, तर किल्ल्यातील इतरही काही इमारती आणि ठिकाणांची नावे बदलली गेली आहेत. 'किचनर हाऊस'चे नाव बदलून 'मानेक्शा हाऊस' करण्यात आले आहे. 'सेंट जॉर्ज गेट'ला आता 'शिवाजी महाराज द्वार' म्हटले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्याच्या दिशेने पडलेले हे एक मोठे पाऊल आहे, असे म्हटले आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये नौदलाने नवीन ध्वज स्वीकारला तोही छत्रपती शिवाजी महाराजांच्या मानचिन्हाने अंकित आहे. 'बीटिंग रिट्रीट' समारंभात आता भारतीय सूर ऐकता येते. राष्ट्रपती भवनातील प्रसिद्ध मुघल गार्डनचे नाव बदलून 'अमृत उद्यान' करण्यात आले, हाही याच मांदियाळीतील बदल आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून केलेले हे नामकरण स्वधर्म आणि स्वराज्याचेच प्रतीक आहे. खरे तर ही एक सुरुवात मानू या. कारण असे अनेक बदल देशात घडणे आवश्यक आहे आणि ते मोदी सरकारच घडवून आणू शकते, यात तीळमात्र शंका नाही. भारतीयांनी या अपेक्षित बदलांचे स्वागत केले पाहिजे.

स्वातंत्र्यानंतर प्रदीर्घ सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसी सरकारला ही नावं बदलता आली नाहीत, याचेच आश्चर्य वाटते. उलट, गेल्या दशकभरात तब्बल २५ शहरांच्या नामकरणाला विद्यमान केंद्र सरकारने मंजुरी दिली. त्यात सर्वाधिक कर्नाटकातील १७ शहरांचा समावेश आहे. त्याखालोखाल पंजाबमधील ४ आणि ओडिशा आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी दोन शहरांच्या नामकरणावर गृहमंत्रालयाने मंजुरीची मोहर उमटवली. औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामकरण झाले. व्हिटी स्टेशनचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस झाले. तत्पूर्वी, बॉम्बेची मुंबई झाली होती. हे सारे बदल आपल्या संस्कृतीच्या जिवंतपणाचे लक्षण आणि गरज आहे. यापुढे गावागावांतील रस्ते आणि चौकांना तसेच काही वास्तूंना विदेशी संस्कृतीची नावे असतील तर ती तत्काळ स्थानिक प्रशासनाने बदलली पाहिजे. कारण आता या मातीला स्वत्वाचा रंग आला आहे. कोट्यवधी भारतीयांच्या अस्मिता जागृत झाल्या आहेत.

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

मोरेश्वर बडगे

# 'मेरे पास देवेंद्र फडणवीस है...!'

महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक पिढी एकेका नेत्याभोवती फिरत आली. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार यांच्याकडे राज्याचे नेते म्हणून महाराष्ट्राने पाहिले. सध्या ही जागा देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. ते मुख्यमंत्री आहेत म्हणून ते नेते आहेत अशातला भाग नाही. स्वभावात मवाळपणा, कुठेही इगो नाही, पक्षातल्या सगळ्या गटातटांनाच नव्हे, तर मित्रपक्षांनाही सोबत घेऊन काम करण्याची खुबी. या जोरावर देवेंद्र फडणवीस आज जनतेच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. मराठा आरक्षणाच्या आडून फडणवीसांवर दररोज हल्लाबोल करणारे मनोज जरांगे यांचीही थंडावलेली तोफ बरेच बोलून जाते. फडणवीस पुन्हा आल्यावर मराठ्यांचे मोर्चे वाढतील, आंदोलनं भडकतील हा विरोधकांचा अंदाज साफ चुकला; उलट आज कुठल्याही आक्रोशात फडणवीस टार्गेट नाहीत. कुठल्याही मुख्यमंत्र्याला मिळाला नसेल एवढा लोकाश्रय फडणवीस एन्जॉय करीत आहेत.

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृणपणे हत्या झाली. या घटनेला दोन महिने झाले. या हत्येतील आरोपींना फाशी द्या असा गावकऱ्यांचा आक्रोश आहे. पोलिसांनी या प्रकरणी काही आरोपींना अटक केली आहे. खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडला पोलिसांनी मकोकामध्ये अटक केली आहे. हा कराड राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्ती आहे. त्यावरून राजकारण तापले. मुंडे यांच्या विरोधकांना त्यांचा राजीनामा हवा आहे. मुंडे याला तयार नाहीत. 'माझा या हत्या प्रकरणाशी संबंधच नाही तर मी राजीनामा का देऊ?' असा मुंडे यांचा सवाल आहे. पूर्वी साधा आरोप झाला तर राजकारणी राजीनामा देऊन मोकळे व्हायचे. अंतुले, निलंगेकर, आर. आर. पाटील यांची उदाहरणे आहेत. एवढेच काय, सिंचन घोटाळ्यात आरोप झाले तेव्हा खुद्द अजितदादा यांना राजीनामा द्यावा लागला होता. आरोपातून सुटका झाली तेव्हा ते पुन्हा रुजू झाले. पण ते दिवसच वेगळे होते. आरोपींना घरी जा म्हणण्याचा अधिकार नेत्यांनी केव्हाच गमावला आहे. आता या सरपंचाच्या हत्येचा तपास पूर्ण होऊन कोर्टाचा निकाल यायला किती काळ लागेल, हे कोणीच सांगू शकत नाही. तिकडे 'दोषींना सोडले जाणार नाही' असे फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि मुंडे ज्या पक्षाचे मंत्री आहेत, त्या पक्षाचे सुप्रीमो अजित पवार वारंवार सांगताहेत. तरीही बीडची आग विझलेली नाही. भगवानगडाचे बाबा नामदेवशास्त्री यांचा पाठिंबा मिळवून मुंडे यांनी आगीचा भडका अकारण वाढवला. या मामल्याकडे आधीपासून वंजारी विरुद्ध मराठा असे पाहिले जात आहे. त्यामुळे प्रत्येकाने बोलताना काळजी घेणे अपेक्षित आहे. या बाबा लोकांचेही काही खरे नाही. अजितदादा जे बोलू शकत नाहीत ते नामदेवशास्त्री बोलले. त्यांनी मुंडेंना 'मिस्टर क्लीन' सर्टिफिकेट देण्याची घाई का केली, हे कोडे आहे.



'कराडशिवाय धनूभाऊंचं पान हालत नाही' असं पंकजा मुंडे यांनी मागे म्हटले होते. मग आता वाल्मीकिचा 'वाल्या' कोणी केला? कोण जबाबदारी घेणार? दिवंगत भाजपा नेते गोपीनाथ मुंडे यांच्याकडे घरगडी असलेला वाल्मीक कराड एवढा कसा वाढला? पण तुम्हाला एक सांगू का? 'वाल्मीक कराड' केवळ बीडमध्ये नाही. तो नवनव्या रूपात प्रत्येक जिल्ह्यात आहे, प्रत्येक तालुक्यात आहे, प्रत्येक गावात आहे. राजकारण्यांची ती गरज आहे. बीडमध्ये एका कराडला पोलिसांनी मकोका लावला; पण इतर जिल्ह्यातल्या 'कराडांचे' काय?

बीडचे राजकारण तापले असताना देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या दौऱ्यात कुठला कार्यक्रम ठेवला असेल? कल्पना करा. बीडमध्ये राष्ट्रवादी टार्गेटवर आहे. मुंडे संपले तर मराठवाड्याचे सारे राजकारण भाजपाच्या खिशात येते. मात्र फडणवीसांनी असा विचार केला नाही. त्यांनी दौऱ्याचा फोकस दुष्काळमुक्तीवर ठेवला. ८० वर्षांत अनेक मुख्यमंत्री होऊन गेले. तिघे तर चक्क मराठवाड्याचेच होते. काय केले त्यांनी मराठवाड्यासाठी? लोकांना पिण्याचे साधे पाणी आपण देऊ शकले नाही. उसाला मात्र पाणी देतात. कारण ऊसवाल्यांची लॉबी आहे. एका सरपंचाच्या हत्येनंतर तिकडचे बोगस धंदे उजेडात आले. वाळू माफिया, परळीत औष्णिक प्रकल्प आहे. तिकडची राख कुठे जाते? कोणालाही हा हिशोब विचारावासा वाटला नाही? मतदान केंद्रांवर रांगा लावून आपण ज्यांना निवडून देतो ते लोकप्रतिनिधी शेवटी करतात काय? मुंडेंचा लीड तर एक लाखावर मतांचा आहे. बीडमध्ये गुंड टोळ्यांचे राज्य होते, असा साऱ्यांचाच सूर आहे. मग इतकी वर्षे हे लपून कसे राहिले? या घोटाळ्यांचा 'आका' कोण? तिथले लोक ते बोलायला पुढे येणार नसतील तर मग परिवर्तनाची अपेक्षा का करावी आणि कशासाठी? 'दीवार' सिनेमात एक प्रसिद्ध डायलॉग आहे. चुकीच्या मार्गाने श्रीमंत झालेला अमिताभ बच्चन हा शशी कपूरला म्हणतो, 'मेरे पास कार है, बंगला है. तुम्हारे पास क्या है?' त्यावर शशी कपूर म्हणतो, 'मेरे पास माँ है.' हा सिनेमा येऊन कित्येक वर्षे लोटली. शशी कपूर आज आपल्यात नाहीत, पण त्यांचा तो डायलॉग 'मेरे पास माँ है?' आजही आठवला जातो. सारं जाऊ द्या. पण किती मुलं हे म्हणतात, 'मेरे पास माँ है!' आजची आई अडगळीतल्या खोलीत गेली आहे. पण त्या लायनीवर आमदार सुरेश धस यांनी जाहीर सभेत फेकलेला डायलॉग 'दिवार'मधल्या शशीलाही मारणारा आहे. बीडच्या सभेत भाजपा आमदार सुरेश धस म्हणाले, 'मेरे पास देवेंद्र फडणवीस का आशीर्वाद है...!' हे साधे वाक्य नाही. फडणवीस आपल्यासोबत आहेत हा विश्वास आज कोट्यवधी मराठी माणसाचा प्राणवायू बनला आहे. जिल्ह्यातल्या गुंडांच्या टोळ्यांचा बंदोबस्त करा, अशी मागणी या आमदाराने मुख्यमंत्र्यांकडे केली. हे काम पोलिसांचे आहे. पोलिस ते करीत नाहीत. त्यामुळे सरकार टार्गेट बनते. पोलिस गंभीर झाले तर गुन्हा घडूच शकत नाही. पाणी तिथेच मुरते. हा केवळ बीडचाच नव्हे, तर संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. सरपंचाच्या हत्येनंतर दोन महिन्यांनी फडणवीस बीडला आले, तो कार्यक्रमही जलवाहिनी पूजनाचा होता. मराठवाडा दुष्काळमुक्त करू, असे आश्वासन त्यांनी इथल्या जाहीर सभेत दिले. मात्र, त्यांना सर्वाधिक टाळ्या मिळाल्या त्या गुंडामुक्तीवर. लोकांना नेमके काय पाहिजे ते यावरून लक्षात येते. 'गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. कोणी कितीही मोठा असो, कारवाई करू' असे सांगून फडणवीसांनी जनतेला आश्वासित केले. दावोस दौऱ्यानंतर काही लाख कोटी रुपयांचे उद्योग राज्यात येऊ घातले आहेत. खंडणीखोरांना मोकळे रान मिळाले तर कोण इथे पैसे लावेल? कायदा आणि सुव्यवस्था हा आजचा मोठा प्रश्न आहे. 'हा नाराज-तो नाराज' हे राज्याचे प्रश्न होऊ शकत नाहीत. लोकांनी सहकार्य केले तरच शांत आणि प्रगत महाराष्ट्राच्या वाटेवर जाणे शक्य आहे. फडणवीसांनी नेमके दुखणे हेरले. त्यानुसार कामालाही भिडले आहेत. जगन्नाथाचा हा रथ फडणवीस ओढू शकतात. फडणवीस जे करू शकले ते महाविकास आघाडीमधला कुणी नेता करू शकला नाही. फडणवीस काही वेगळे करतात किंवा त्यांच्याकडे अल्लाउद्दीनचा दिवा आहे अशातला भाग नाही. २४ तास राजकारण करणाऱ्या नेत्याने जे करायला हवे तेच फडणवीस करीत आहेत. राजकारण आता 'पार्टटाईम' राहिलेले नाही. तुमचा नेता २४ तास उपलब्ध पाहिजे. नरेंद्र मोदींचे 'वर्क कल्चर' फडणवीस पुढे नेत आहेत. त्यामुळेच त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. फडणवीस 'वर्षा' बंगल्यावर राहायला का जात नाहीत, याची चिंता संजय राऊतांनी करू नये. मुंबई महापालिकेतले उद्धव सेनेचे 'शिल्लक दुकान' गुंडाळल्यानंतर 'वर्षा'चा मुहूर्त फडणवीस काढतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### महिलांना दिलासा देणारा अर्थसंकल्प

निर्मला सीतारमण यांचा अर्थसंकल्प महिलांना दिलासा देणारा व आधार देणारा आहे. कुटुंब अर्थव्यवस्था बहुतेक गृहिणीकडेच असते. मर्यादित पैशात महिना काढावा लागतो. त्यात कर भरणे म्हणजे दुष्काळात तेरावा महिना. खूपदा पगार वाढू नये व करही वाढू नये असे वाटते. केजरीवाल यांनी १० लाखापर्यंत कर मुक्ती मागितली, पण ती १२ लाख झाली आहे. त्याचा खरा फायदा निवृत्त लोकांना झाला. निवृत्तीनंतर पैसा कमी, परंतु गरजा कमी झालेल्या नसतात. टेन्शन त्यात महागाई कर वाढ. मुख्य म्हणजे खेळणी व भारतात तयार झालेले रेडिमेड कपडे स्वस्त झाले. स्वदेशी वस्तूंची मागणी वाढेल. जीवन रक्षक औषधे स्वस्त म्हणजे दुधात साखर. मध्यमवर्गीयांसाठी आनंद देणारा अर्थसंकल्प.



**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### राहुल गांधींना सार्वकालिक माफी का?

'शहरी नक्षलवादी संविधान समजू शकत नाही : नरेंद्र मोदी' ही बातमी वाचली. आजवर राहुल गांधींनी देश-विदेशात अनेकदा भारताचा अपमान करणारी बेलगाम वक्तव्ये जाहीरपणे केली आहेत. भारतात तानाशाही आहे, प्रजातंत्र अस्तित्वात नाही, भारतात अल्पसंख्यक सुरक्षित नाहीत, शीख समाज सुरक्षितपणे गुरुद्वारांमध्ये जाऊ शकत नाही यासारखी अनर्गल आणि कणाहीन वक्तव्ये करून भारताची बदनामी त्यांनी अनेकदा केली आहे. २००८ मध्ये परिवाराने चीनच्या कम्युनिस्ट पक्षाबरोबर काही करार केल्याच्या बातम्याही आल्या होत्या, पण त्याची कोणतीही चौकशी झाली नाही आणि हा करार कशासाठी आणि कोणत्या मुद्यांवर झाला, हे जनतेसमोर कधीच आले नाही. २०१७ मध्ये तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष असलेल्या राहुल गांधींनी दिल्लीमध्ये रात्रीच्या अंधारात कोणालाही न सांगता दिल्लीमधील चिनी राजदूताची त्याच्या घरी जाऊन गुप्त भेट घेतली होती. कोणतीही कारवाई, चौकशी झाली नाही आणि ते प्रकरणही गुलदस्त्यात राहिले. चीनने आपल्या सीमेच्या आत अतिक्रमण केले, आपल्या सैनिकांना मारहाण केली असे आरोप तर ते सातत्याने करीत असतात. राष्ट्रपतींवर त्यांनी आणि सोनिया गांधी यांनी नुकतीच हीन टीका केली. आता तर लोकसभेतील विरोधी पक्षनेता असलेल्या राहुल गांधींनी थेट लोकसभेमध्येच भारताची बदनामी धाडस दाखवले आहे. यावर पंतप्रधान मोदींनी प्रत्युत्तर दिले असले, तरी ते पुरेसे नाही. खरा सवाल आहे, राहुल गांधी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना मोदी सरकारने सार्वकालिक माफी दिली आहे का? की, शिशुपालाप्रमाणेच राहुल गांधींचे शंभर अपराध होण्याची सरकार वाट बघत आहे? सरकारच्या नाकर्तेपणामुळे राहुल गांधींची हिंमत दिवसेंदिवस वाढत आहे. भले त्यांनी केलेले आरोप खोटे असले, तरीही भारताची होणारी बदनामी त्यामुळे थांबत नाही. की, भाजपालाच राहुल गांधी विरोधी पक्षाचा चेहरा म्हणून हवा आहे; जेणेकरून भाजपाला सत्ता मिळविणे सोपे जावे?

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### राजकारणामध्ये युवकांची भूमिका

राजकारणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवा वर्गाचे विचार, ऊर्जा आणि उद्यमशीलता समाजात मोठे बदल घडवू शकतात. युवक नवे विचार, दृष्टिकोन आणि सृजनशीलतेने भरलेले असतात. त्यामुळे ते पारंपरिक राजकारणात नवीन विचार आणून बदल करू शकतात. युवकांचा समावेश राजकारणात झाल्यास सामाजिक न्याय, पर्यावरण, शिक्षण आणि रोजगार यासारख्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढते. युवा वर्ग मोठ्या संख्येने मतदार असतो. त्यामुळे त्यांच्या मतदानाचा प्रभाव राजकारणी व्यक्तींवर आणि पक्षांवर असतो. युवक अनेक सामाजिक चळवळींमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन विविध समस्यांवर आवाज उठवू शकतात. जसे की, भ्रष्टाचार विरोधी, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, बेरोजगारी यासंबंधी चळवळींमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. युवकांनी तंत्रज्ञान सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून आवश्यक माहितीचा प्रसार करणारे काम केले आहे; ज्यामुळे अधिक लोकांपर्यंत पोहोचता येते. युवकांना राजकारणात सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध झाल्यास ते स्वतःला नवा नेता म्हणून सिद्ध करू शकतात. अनेक युवक आता विविध राजकीय पक्षात उमेदवार म्हणून उभे राहत आहेत. त्यामुळे त्यांना अन्य युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यास मदत होते. युवकांनी त्यांच्या हक्कांचा वापर करणे आणि समाजातील चांगले बदल घडवण्यासाठी सक्रिय राहणे आवश्यक आहे. संपूर्ण समाजाचे भवितव्य त्यांच्या हातात आहे, म्हणून युवा वर्गाला राजकारणात सक्रियपणे सहभागी होणे आवश्यक आहे.

**श्रीकांत मगर**/९६८९११७१६९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सिध्देश्वर तलावात येत नाही घाण पाणी

## पालिका अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी श्री सिध्देश्वर मंदिर तलावातील पाण्याची आणि परिसराची पाहणी करून एकंदर तलावातील पाण्याबाबतचा आढावा घेतला. प्राथमिक पाहणीत तरी घाण पाणी तलावात मिसळत नसल्याचे दिसून आले.

तलावातील पाण्याचे पावित्र्य धोक्यात येते, अशा भावना यात्रा काळात भाविकांनी व्यक्त केल्या होत्या. हे पाहत बुधवारी संपूर्ण परिसराची टेल टू एंड पाहणी करण्यात आली. श्री सिध्देश्वर महाराजांनी तलावातील पाण्यात ६८ नद्यांचे पाणी आणून त्यांचा कायमस्वरूपी याठिकाणी राहण्याची सोय केली होती. त्याला एकप्रकारे प्रतिकात्मक कुंभस्नानाची सोय सोलापूरकर भक्तांसाठी केल्याची भावना श्री सिध्देश्वर भक्तांमध्ये आहे. इतक्या पवित्र अशा तलावात घाण पाणी मिसळत असल्याने धार्मिक भावना दुखावण्यासोबतच तलावाचे पावित्र्य धोक्यात आल्याचे मत अनेकांनी व्यक्त करत महापालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत तीव्र नाराजी नागरिकांनी व्यक्त केली होती. त्या पार्श्वभूमीवर महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी सार्वजनिक आरोग्य अभियंता यांना सोबत घेऊन गणपती घाट ते श्री अण्णबोमय्यांची समाधी व पुन्हा अण्णबोमय्या समाधी ते गणपती घाट मार्गाची तपासणी करून तलावात घाण पाणी मिसळते का याची पाहणी केली . त्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना करून तलावात घाण पाणी मिसळणार नाही याबाबत सतर्क राहण्याचेही आदेश दिले.

लक्ष्मी मार्केट येथील मुख्य प्रवेशद्वारतील सार्वजनिक स्वच्छतागृहाचे घाण पाणी काही प्रमाणात तलावात झिरपत असण्याबाबत शंका उपस्थित केल्यानंतर अतिरिक्त आयुक्तांनी सार्वजनिक आरोग्य अभियंता यांच्याशी याबाबत नक्कीच चर्चेतून मार्ग काढू, असे आश्वासन दिले.

### सध्या तरी कोणतीही अडचण नाही : कारंजे

संपूर्ण परिसरात आम्ही बुधवारी दुपारी बारा वाजल्यापासून तपासणी करून तलावात येणाऱ्या पाण्याबाबतचा आढावा घेतला. आम्हाला प्राथमिक पाहणीत तरी घाण पाणी तलावात मिसळत नसल्याचे दिसून आले. दुष्काळात तलावातील पाणी उपसा करता यावे यासाठी याठिकाणी असलेल्या वॉल्वमधून थोडेफार पाणी तलावात मिसळते. पिण्यायोग्य पाणी तलावात मिसळत असल्याने सध्या तरी कोणतीही अडचण नाही, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त वृत्त

### सुलोचना सोनवणे यांच्याकडे समाजकल्याण अधिकारीपदाचा अतिरिक्त पदभार

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी या पदावर सध्या कार्यरत असलेले आणि जात पडताळणी समितीकडील सदस्य सचिन कवले यांना देण्यात आलेला समाज कल्याण अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार अखेर गुरुवारी काढण्यात आला आहे. जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार दिलेले सचिन कवले त्यांचा पदभार रद्द करून त्यांच्या ठिकाणी समाजकल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. दरम्यान, तत्कालीन समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांच्यावर कारवाई झाल्यानंतर कित्येक दिवस हे पद रिक्तच होते. त्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांच्याकडे पदभार देण्यात आला होता. त्यानंतर या पदाचा अतिरिक्त पदभार चार महिन्यापूर्वी जात पडताळणी समितीकडील सचिन कवले यांच्याकडे समाज कल्याणचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.

### अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणासाठी आयोजित हलगी मोर्चा रद्द

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

मातंग, मांग, मोची, मादिगा समाजाचे राष्ट्रीय नेते मंदा कृष्णा मादिगा यांच्या नेतृत्वाखाली दि.७ फेब्रुवारी रोजी अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड वर्गीकरणासाठी हलगी मोर्चा हैदराबाद येथे आयोजित करण्यात होता. मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी तेलंगणा विधानसभेत मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणाबाबत घेतलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे हलगी मोर्चा रद्द करण्यात आला असल्याची माहिती सकल मातंग समाज राज्य समन्वयक सुरेश पाटोळे यांनी दिली.

### दारूला पैसे दे म्हणत आईला मारहाण

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

दारुसाठी पैसे दे म्हणत आईला मारहाण करून जखमी करण्यात आले. शारदा माणिक चव्हाण (वय ४५, रा. २५६ गाळा, मार्केट यार्ड रोड, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊच्या सुमारास घरी मला दारू पिण्यासाठी पैसे दे असे आईला म्हणाल्यानंतर आईन माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणाली. त्यावेळी शारदा बाईंचा मुलगा दिनेश चव्हाण याने झाडे लावायची कुंन्डी शारदाबाई यांच्य ाडिक्यात मारली. त्यामुळे शारदाबाईंन उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अज्ञात कारणावरून जुनी मिल कंपाऊंडमध्ये तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

अज्ञात कारणावरून जुनी मिल कंम्पौडमध्ये तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले. संतोष दत्ता निजामपुरे (वय २५, रा. दमाणी नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ४ फेबुचारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारा संतोष निजामपुरे हा जुनी मिल कंप्पौड येथील मोकळ्या मैदानातूर चालत भैय्या चौकाकडे जात होता. त्यावेळी अज्ञात कारणावरून इम्रान शेख, समीर शेख व इतर दोघांनी संतोष यास लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये संतोष निजामपुरे हा जखमी झाल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या आवृत्तीचे उद्घाटन

**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर त्याच्या सर्वात प्रसिद्ध आवृत्तीचे उद्घाटन करतो, जिथे फॅशन फक्त प्रारंभ आहे आणि 'द वन अँड ओन्ली' अशी एक अनोखी दुनिया तयार केली जाते. २०२५च्या टूरमध्ये अत्याधुनिक रूप उलगडले जाईल जे अत्याधुनिकतेत प्रवेश करेल आणि जागतिक फॅशन, संगीत आणि मनोरंजन यांचे शानदार प्रदर्शन करून शुद्ध आश्चर्य उत्पन्न करेल. पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य विपणन अधिकारी कार्तिक मोहिंद्रा म्हणतात, ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या या वर्षीच्या आवृत्तीने आमच्या दृष्टीकोनात एक आणखी धाडसी पाऊल टाकले आहे.

### सांगोला येथील अपघातात दोन ठार

**सांगोला, दि. ६ फेब्रुवारी-**

सांगोल्यात बुधवारी रात्री मिरज रोड येथील गायत्री मार्ट समोर झालेल्या अपघातात दोन ठार झाल्याची घटना घडली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास एकनाथ सोपन गडदे, वय-५३ वर्षे, बाबुराव महादेव गोडसे वय-४२ वर्षे दोघे रा. गौडवाडी ता.सांगोला जि.सोलापुर हे ४०७ टेम्पो मधुन सांगोला येथुन गौडवाडी कडे जात असताना सांगोल्यातील मिरज रोड येथील गायत्री मार्ट समोर सांगोल्याच्या दिशेने येणाऱ्या पिकअपची व टेम्पोची धडक बसल्याने त्यामध्ये गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय सांगोला येथे दाखल केले असता ते उपचारा पुर्वीच मयत झाले. याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे ग्रामीण रूग्णालय सांगोलाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.असीफ सय्यद यांनी खबर दिली. पुढील तपास पोहेकाँ. कोकरे करीत आहेत.

# वैद्यकीय औषधी इंजेक्शनचा नशेसाठी वापर

## विक्री व साठा करणाऱ्या टोळीतील 13 जणांना अटक

## सोलापूर जिल्ह्यातील पाचजणांचा समावेश

## मुख्य आरोपी उत्तर प्रदेशातील

## सांगली स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

वैद्यकिय औषधी इंजेक्शनचा नशेसाठी वापर करणाऱ्या टोळीचा सांगली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पर्दाफाश केला असून या इंजेक्शनची विक्री व साठा करणाऱ्या १३ जणांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून १४ लाख ४६ हजार ६४१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील पाचजणांना समावेश आहे. म्होरक्यास उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथून अटक केली आहे.

रोहित अशोक कागवाडे (वय ४४, रा. शामराव नगर, सांगली), ओंकार रविंद्र मुळे (वय २४, रा. गव्हर्मेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली), अशपाक बशीर पटवेगार (वय ५०, रा. असूबा हॉटेलसमोर, पत्रकार नगर, सांगली), वैभव उर्फ प्रशांत शिवाजी पाटोळे (वय २७, रा. भारती बझारजवळ, कडेगाव, जि. सांगली), ऋतुराज आबासाहेब भोसले (वय २७, रा. पवार कॉलनी, सांगलीवाडी, जि. सांगली), अमोल सर्जेराव मगर (वय २८), साईनाथ सचिन वाघमारे (वय १९, दोघे रा. निमगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर), अविनाश पोपट काळे (वय २२, रा. विझोरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर), देवीदास शिवाजी घोडके (वय ३३, रा. माळशिरस, जि. सोलापूर), आकाश अंकुश भोसले (वय २३, रा. बिजवडी, ता. माण, जि. सातारा), हणुमंत पांडुरंग शिंदे (वय २४, रा. दसूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर), ललीत सुभाष पाटील (वय २३, रा. आरूळ, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर), इंतजार अली जहीरूद्दीन (वय २५, रा. खलीलपूर, ता. कांठ, जि. मुरादाबाद, उत्तर प्रदेश) यांना अटक केली आहे. या इंजेक्शनच्या विक्रिसाठी व साठा करून ठेवण्यासाठी एक टोळी कार्यरत असल्याची माहिती सांगली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून नशेसाठी वापरण्यात येणारी १५०७ नग इंजेक्शन व एक चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. या तिघांकडून मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी हे इंजेक्शन वितरण, विक्रि व साठा व्यवस्थेतील साखळी उघड करीत सांगली, सोलापूर, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यामधील वरील सर्व आरोपींना अटक केली. यामध्ये आणखी काही आरोपींना अटक होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक संदीप घुगे, अप्पर अधिक्षक श्रीमती रितू खोखर, उपविभागीय अधिकारी प्रणिल गिल्डा, सहायक पोलिस निरीक्षक संदीप शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संदीप गुरव, उदय कुलकर्णी, धनंजय चव्हाण, हवालदार सचिन कुंभार, अभिजित धनगर, अभिजित पाटील, सर्जेराव पवार, सूरज पाटील, राहुल क्षिरसागर, नानासाहेब चंदनशिवे, अमोल तोडकर, विनोद चव्हाण, विकास कांबळे, राजेंद्र हारगे, जावेद शेख, मोहसिन टिनमेकर, संदीप घोडे, देवानंद नागरगोजे, हणमंत कोळेकर यांच्या पथकाने करुन मुसक्या आवळल्या आहेत.

### मुरादाबाद येथून महाराष्ट्रात इंजेक्शनचे वितरण

नशेसाठी वापर होत असलेले इंजेक्शन हे उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथून इंतजार अली जहीरूद्दीन हा काळ्या बाजारातून अवैध मार्गाने मुरादाबाद येथून मागवून महाराष्ट्रात वितरण करीत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. हे इंजेक्शन डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय मेडीकल दुकानातून घेता येत नाही. परंतु, सांगलीमध्ये हे बिगर प्रिस्क्रिप्शनशिवाय मिळत होते. काही पैलवान लोकदेखील हे इंजेक्शन नशेसाठी घेत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

### फळ व्यापाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**



येथील एका खासगी लॉजमध्ये ६ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊच्या पूर्वी इसाक हुसेन इंडीकर या ४५ वर्षीय फळे व्यापाऱ्याने अज्ञात कारणावरुन पंख्याला नॉयलान दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत उत्तर पोलीस ठाण्यामध्ये घटनेची नोंद झाली. ५ फेब्रुवारी रोजी इसाक हुसेन इंडीकर (रा. इंदिरानगर, झोपडपट्टी, अक्कलकोट) हे सायंकाळी पाचच्या सुमारास केळी गाड्यावर गेले. रात्री ७.२० वा. पत्नीने घरी कधी येणार आहात याबाबत फोन करुन विचारले तेव्हा त्यांनी फोन कॉल घेतला नाही. वारंवार कॉल केले. परंतु त्यांनी कॉल घेतला नाही. एस.टी. स्टॅण्डवरील खासगी लॉजमधील रुम नंबर १०५ मध्ये पंख्याला नॉयलानच्या दोरीने गळफास घेतल्याचे ६ फेब्रुवारी रोजी सकाळी माहिती मिळाली. पोलिसांच्या मदतीने त्यांची बॉडी खाली उतरवून ग्रामीण रुगणालयात घेऊन गेले असता तेथील डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले. पत्नी रुबीना इसाक इंडीकर (वय ३३) यांनी फिर्याद दिली आहे.

मनोरमा परिवार अंतर्गत

**सोलापूर जिल्हा मनोरमा सखी महिला नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

सौ. येरगुंटे स्वाती सिद्राम, चेअरमन (मो.७९७२६४९८७१)

सौ. जयश्री भोरे, व्यवस्थापिका (मो. ९९२१९११०१०)

# 'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धा रविवारी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शंभूराजे बहुउद्देशीय संस्था, श्री. रामराव शिंदे मित्र परिवार व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने रविवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता टाकळीकर मंगल कार्यालय, जुळे सोलापुर येथे खुल्या तसेच १२, १०, ८ व ६ वर्षाखालील बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे.

सदर स्पर्धा फिडेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ८ फेऱ्यात संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १० मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. खुल्या गटातील प्रथम क्रमांकासाठी रु. २०००, रु. १५००, रु. १०००, रु. ८००, रु. ६००, रु. ५००, रु. ४००, रु. ३००, रु. २५० तसेच १५, १२, १०, ८ व ६ वर्षाखालील प्रत्येक गटात गटात देखील रोख पारितोषिकांसह ६५ बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत. विजेत्या खेळाडूंना एकूण रु. २५ हजार पर्यंतची रोख बक्षिसे, 'शिवछत्रपती चषक' व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश फी रु. २०० असून इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ व प्रशांत पिसे मो. क्र. ९१५६८१५९६३ यांच्याकडे संपर्क साधावा असे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनाचे जिल्हाध्यक्ष रामराव शिंदे व संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील व सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर आदींनी केले आहे.

### जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. १५/२०२५ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख ०४/०३/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **श्री. गणेश अभिमन्यू ऊर्फ अभिमान बदे,** वय ४४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. संगमनेर, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सौ. सुवर्णा बालाजी हाके,** वय ४२ वर्षे, धंदा- घरकाम, रा. भोसरी, ता. जि. पुणे
३) **सौ. पल्लवी दादासाहेब पुटे,** वय ३५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. बोरगांव, ता. कळंब, जि. धाराशिव
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचा रहिवासी असून यातील अर्जदार नं. १ ते ३ हे एकमेकाचे सख्खे बहीण भाऊ असून अजरदार नं. १ ते ३ यांचे वडील अभिमान ऊर्फ अभिमन्यू लक्ष्मण बदे हे दि. ११/०९/१९८९ रोजी मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांची आई छाया ही दि. १३/०१/२०२० रोजी मयत झालेली आहे. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांचे चुलते यशवंत हे दि. १०/०९/२०१२ रोजी अविवाहित मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांचे चुलते भागवत हे दि. ११/१२/२०१९ रोजी अविवाहित मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांची आज्जी सुजाता ऊर्फ सुजाना ऊर्फ सुजानाबाई ही दि. ०८/०८/२००१ रोजी मयत झालेली आहे. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांचे आजोबा लक्ष्मण हे देखील बरेच दिवसांपूर्वी मयत झालेले आहेत. यातील अर्ज'रांनीच वर नमूद सर्वांची अखेरपर्यंत सेवा शुश्रुषा केलेली असून मृत्यूनंतरचे विधीही अर्जदार यांनीच केलेले आहेत. मयत सुजाता ऊर्फ सुजाना ऊर्फ सुजानाबाई ऊर्फ सुजाताबाई, यशवंत, भागवत, अभिमन्यू ऊर्फ अभिमान व छाया यांना यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. यातील मयत सुजाता ऊर्फ सुजाना ऊर्फ सुजानाबाई ऊर्फ सुजाताबाई, यशवंत, भागत, अभिमन्यू ऊर्फ अभिमान व छाया यांचे नावे मयतासमयी मौजे संगमनेर, ता. बार्शी येथील ग्रामपंचायत मिळकत नं. २५१, १९, २९ या मिळकती होत्या. त्याकामी अर्जदार नं. १ ते ३ हेच मयत यांचे वारस आहेत असे जाहीर होऊन मिळणेकामी अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस संबंधितानी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख ०४/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : ०५/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहा. अधीक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### जाहीर समन्स

रे. मु. नं. १६४/२०२३ नि.नं.१०
पुढील नेमलेली तारीख २५/०३/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. साहेब यांचे कोर्टात (मा. जी.एस. पाटील सो.)**

**श्री गुरुसिद्ध मणिकंठ शिवाचार्य दहिवडकर महाराज ----- वादी**

**- विरुद्ध -**

**रेखा अनिल जिकरे ----- प्रतिवादी**

**प्रति,**
**रेखा अनिल जिकरे,** वय ४४ वर्षे, धंदा- घरकाम
रा. व्हनकळस प्लॉट, अलिपूर रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी यातील वादीने तुमचे विरुद्ध दाव्यात नमूद मिळकतीचा कबजा व थकीत नुकसानी भाडे मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. परंतु तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर समन्स/नोटीसची बजावणी होऊ देत नाहीत. तुमचा अचूक पत्ताही आढळून येत नाही, तुम्ही जाणीवपूर्वक समन्स/नोटीसीची बजावणी करुन घेत नाहीत. सदर दाव्याकामी तुम्ही प्रतिवादी म्हणून सामील असून तुमचेविरुद्ध वादीने दाद मागणी केलेली आहे.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते कील आपण सदर दाव्याकामी हे जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमली तारीख २५/०३/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे/कैफियत दिली नाही तर आपणास सदर समन्सची बजावणी होवूनही आपण काहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर नोटीस/समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : ३०/०१/२०२५

सही/- **वरिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहाय्यक अधीक्षक** जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

विजापूर रोडवरील सैफुल येथील रेणुका नगरात तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अनिल संजय सोनवणे (वय २०, रा. रेवणसिध्देश्वर, विजापूर रोड, सोलापूर सध्या रा. रेणुका नगर, सैफुल) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. अनिल सोनवणे याने ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घरी अज्ञात कारणाने ओढणीच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यास नातेवाईकांनी सोडवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. १७/२०२५ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख २०/०३/२०२५

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनि. स्तर साहेब यांचे कोर्टात**

**सौ. सविता संतोष कुलकर्णी,** वय ५५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. ४५०, कसबा पेठ, तानाजी चौक, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

१) **श्री. भास्कर देविदास कुलकर्णी,** वय ८६ वर्षे, धंदा- निवृत्त रा. सोलापूर ह.मु. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **श्री. सुधीर भास्कर कुलकर्णी,** वय -- वर्षे, धंदा- नोकरी, रा. सोलापूर ह.मु. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार व सामनेवाला क्र. २ यांच्या आई व सामनेवाला क्र. १ यांची पत्नी सुमती भास्कर कुलकर्णी (विवाहापूर्वीचे नांव - कुसुम नारायण येळंगांवकर) या दिनांक २८/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. तद्पश्चात कै. सुमती भास्कर कुलकर्णी यांचे अर्जदार व सामनेवाला क्र. १ व २ हेच कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी कै. सुमती भास्कर कुलकर्मी यांचे अर्जदार व सामनेवाला क्र. १ व २ हे कायदेशीर वारस असलेबाबत मे. दिवाणी न्यायाधीश कनि. स्तर साहेब, बार्शी यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिद्धीपासून ३० दिवसांच्या आत किंवा पुढील नेमलेल्या ता. २०/०३/२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहून कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजून सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे. तारीख : ०४/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहा. अधीक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः शहर अक्कलकोट व सोलापूर जिल्ह्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः-

अ) जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका अक्कलकोट मौजे सापळे (मोट्याळ) येथील शेतजमीन यांसी गट नंबर ८५/३ यांसी एकूण क्षेत्र १ हेक्टर ४२ आर यांसी चतुःसिमाः पूर्वेस गट नंबर ८६, पश्चिमेस गट नंबर १०३, दक्षिणेस गट नंबर ८५/२, उत्तरेस गट नं.८५/१.

ब) जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका अक्कलकोट मौजे सापळे (मोट्याळ) येथील शेतजमीन यांसी गट नंबर १०३ यांसी एकूण क्षेत्र १ हेक्टर ६० आर यांसी चतुःसिमा :- पूर्वेस गट नंबर ८५/३, पश्चिमेस गट नंबर १०८, दक्षिणेस गट नंबर १०२, उत्तरेस -गट नं. १०३ व १०४.

सदरचे वर नमूद दोन्ही शेतजमीनी ह्या आमचे अशिल श्री. नारायण लक्ष्मण घाटगे यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदर दोन्ही शेतजमीनी हे आमचे अशिल मेहनत व मशागत करुन आपल्या व आपल्या कुटूंबियांची उपजीवीका भागवीतात.

आमचे अशिल हे वर नमूद दोन्ही शेतजमीनी कोणासही कोणत्याही प्रकारे गहाणखत किंवा कुलमुखत्यार पत्राने दिलेली नाही. तसेच सदर शेतजमीनी आमचे अशिल हे कोणालाही सावकारी देणे/घेणेबाबत कोणताही अधिकार दिलेला नाही. आमच्या अशिलांच्या वाढत्या वयाचा गैरफायदा घेऊन जर कोणीही आमच्या अशिलांच्या सहीचा वापर एखाद्या व्यवहारात करत असेल तर ते पुर्णपणे बेकायदेशीर राहील. आमचे अशिल हे अशा प्रकारच्या कोणत्याही व्यवहारास जबाबदार अथवा बांधील नाही. सबब कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता. ०५/०२/२०२५.

**सही/-**
**अशिल - श्री. नारायण लक्ष्मण घाटगे**
**मो.नं.८८३०४४५०८०**

**सही/-**
**ॲड. सोपान ज्ञानेश्वर शिंदे,**
**पत्ताः ६५, सुपर मार्केट, मुरारजी पेठ, सोलापूर.मो.नं. ९४२२०६७२२९.**

### विदर्भ कोकण ग्रामीण बँक
VIDHARBHA KONKAN GRAMIN BANK
Govt. of India, Bank of India & Govt. of Maharashtra Undertaking

**सोलापूर क्षेत्रिय कार्यालय :** प्लॉट नं.२३, सर्व्हे नं.१३७-१४१, गुरुकृपा संकुल, नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर - ४१३००४ फोन : ०२१७-२३०५७२१, २२, फॅक्स - ०२१७- २३०५६२२, ई-मेल vkgb.rosol@gmail.com

**सांकेतिक ताबा सुचना (अचलमालमत्ता करीता)**

ज्याअर्थी, वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षितिकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी अध्यादेश २००२ अन्वये हस्ताक्षरकर्ता **विदर्भ कोकण ग्रामीण बँकेचा प्राधिकृत अधिकारी** आहे आणि सुरक्षा अधिकार (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ८ च्या सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(२) अन्वये बहाल केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील रकान्यात उल्लेख केलेल्या तारखेला दिलेल्या नोटीसमध्ये उल्लेख केलेल्या रक्कमेची त्यावरील संपुर्ण व्याजासह व इतर सर्व प्रभारासह नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्याची मागणी सुचना खालील कर्जदारांना जारी करण्यात आली होती. त्याअर्थी, कर्जदारांनी रक्कमेची फेड न केल्याने खालील रकान्यात दिलेल्या तारखांना सदर नियमाच्या ८ सह वाचल्या जाणाऱ्या सदर अध्यादेश कलम, १३(४) अन्वये अधिकाराचा वापर करुन हस्ताक्षरकर्त्याने खालील नमूद केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** खालील रकान्यात नमूद केल्या नुसार घेतला आहे. कर्जदार/जामीनदार आणि साधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खालील रकान्यात नमूद केलेल्या मालमत्तेचा व्यवहार त्यांनी करु नये. या मालमत्तेबरोबरचा व्यवहार मुद्दल रक्कम, त्यावरील थकीत व पुढील व्याज व इतर सर्व प्रभारांसह **विदर्भ कोकण ग्रामीण बँकेला** अदा केल्यानंतरच होऊ शकेल. संरक्षित मालमत्तेच्या पुन:पुर्ततेसाठी, याद्वारे कर्जदार व जामीनदार यांचे या कायद्याअंतर्गतचे कलम १३, उपकलम (८) याकडे लक्ष वेधत आहेत.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार/ जामीनदाराचे नाव | अचल संपत्तीचे विवरण | मागणी सुचना तारीख आणि बकाया राशी (रु.) | सांकेतिक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | **गादेगाव शाखा**<br>**कर्जदार :**<br>श्री. बापुराव लक्ष्मण भोसले<br>मु. पो. गादेगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर<br>**जामिनदार :**<br>१. श्री. गणेश शिवाजी बागल<br>२. श्री. प्रताप मच्छिंद्र बागल<br>मु. पो. गादेगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | मु. पो. गादेगाव, ता. पंढरपुर, जि. सोलापूर येथील गट नं. ९२४/२/२ (क्षेत्रफळ १.२० हे.) मधील बांधलेले घर (क्षेत्रफळ ९८९.६२ चौ. फुट) | दि. २१/११/२०२४<br>रु. ५,०१,६८४/- | ३०/०१/२०२५ |

दिनांक : ०७/०२/२०२५
स्थळ : सोलापूर

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

**प्राधिकृत अधिकारी**
**विदर्भ कोकण ग्रामीण बँक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### कबड्डी महासंघाचा कार्यभार निर्वाचित मंडळाकडे सोपवा

**नवी दिल्ली :** भारतीय ॲमेच्युअर कबड्डी महासंघ अर्थात् एकेएफआयचे प्रशासक माजी न्यायाधीश एस.पी. गर्ग यांना ११ फेब्रुवारीपर्यंत एकेएफआयच्या निर्वाचित मंडळाकडे कार्यभार सोपविण्याचे आदेश गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. वरिष्ठ महिलांची आशियाई कबड्डी चॅम्पियनशिप स्पर्धा इराणमध्ये २० ते २५ फेब्रुवारीदरम्यान होणार असून यात भारतीय खेळाडूंना सहभागी होता यावे यासाठी हा आदेश देण्यात असल्याचे यावेळी न्या. सूर्यकांत आणि न्या. एन. कोटिश्वर यांच्या न्यायासनाने स्पष्ट केले. सुनावणीवेळी एकेएफआयमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी गर्ग यांनी केलेल्या कामाचे न्यायासनाने कौतुक केले, तसेच माजी न्यायाधीश किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे अधिक काळ संघटनांच्या प्रशासकीय जबाबदारी देण्याची प्रथा योग्य नसल्याचे स्पष्ट केले. यावेळी केंद्र सरकारची बाजू मांडणारे महान्यायाभिकर्ता तुषार मेहता म्हणाले, निर्वाचित मंडळाकडे महासंघाचा कार्यभार सोपविल्यास एकेएफआयचे निलंबन मागे घेणार असल्याचे आंतरराष्ट्रीय कबड्डी महासंघाने सांगितले. इराणमध्ये होणाऱ्या स्पर्धेत भारताच्या खेळाडूंना सहभागी होता यावे यासाठी प्रशासकाकडे असलेला कार्यभार निर्वाचित मंडळाकडे देण्याची विनंती त्यांनी केली. मेहता यांची विनंती मान्य करीत न्यायासनाने म्हटले की, निर्वाचित मंडळाकडे पदभार सोपविण्याचा अर्थ असा नाही की, २०२३ मध्ये निवडून आलेल्या प्रशासकीय मंडळाला आम्ही मान्यता दिली आहे. इराण येथील स्पर्धेत भारतीय खेळाडूंना सहभागी होता यावे यासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून आदेश देण्यात येत आहे.

### मार्कस स्टोइनिस निवृत्त

**सिडनी :** ऑस्ट्रेलियन अष्टपैलू खेळाडू मार्कस स्टोइनिसने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पूर्वसंध्येला आपल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून संन्यास घेतला आहे. विश्वचषक विजेत्या संघातील सदस्य मार्कस स्टोइनिसने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून तात्काळ निवृत्ती घेण्याचा धक्कादायक निर्णय घेतला, परंतु तो टी-२० स्वरूपात उपलब्ध राहील. या महिन्याच्या अखेरीस पाकिस्तान आणि युएई सुरू होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स चषक एकदिवसीय स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाच्या प्राथमिक १५ सदस्यीय संघात स्टोइनिसची निवड झाली होती.

# भारताचा इंग्लंडवर ४ गड्यांनी विजय

## सामनावीर गिल, अय्यर, पटेलची अर्धशतकी खेळी ● जोस बटलर, जेकब बेथेलची अर्धशतके व्यर्थ

### पदार्पणात हर्षित राणाचे ३ बळी

◆ **नागपूर, ६ फेब्रुवारी**

विदर्भ क्रिकेट संघटना स्टेडियम, जामठा येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारताने भेदक गोलंदाजी तसेच बहारदार फलंदाजीचे जोरदार प्रदर्शन करत इंग्लंडवर ६८ चेंडू शिल्लक ठेवत ४ गड्यांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

जोस बटलर व जेकब बेथेलच्या अर्धशतकांच्या बळावर ऑस्ट्रेलियाने ४७.४ षटकांत सर्वबाद २४८ धावा केल्या आणि भारतासमोर विजयासाठी २४९ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. भारताने ३८.४ षटकांत ६ बाद २५१ धावा काढून आपला विजय साकार केला. भारताला विजय मिळवून देताना शुभमन गिल (८७), श्रेयस अय्यर (५९) व अक्षर पटेलने (५२) अर्धशतकी विजयी खेळी केली. इंग्लंडला २४८ धावांत रोखताना पदार्पण करणाऱ्या हर्षित राणाने ३ बळी टिपले.

इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी नंदनवन असलेल्या व्हीसीए स्टेडियम जामठ्याच्या खेळपट्टीवर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत इंग्लंडचे सलामीवीर फिल सॉल्ट व बेन डकेटने पहिल्या गड्यासाठी ७५ धावांची दमदार सुरुवात केली, परंतु त्यानंतर इंग्लंडची घसरगुंडी उडाली. श्रेयस अय्यर व केएल राहुलने सुरेख समन्वय साधत फिल सॉल्टला धावबाद केले. फिल सॉल्टने २६ चेंडूंत ६ षट्कार व ३ चौकारांच्या मदतीने ४३ धावांची खेळी केली. सामन्याच्या दहाव्या षटकांत पदार्पण करणाऱ्या वेगवान गोलंदाज हर्षित राणाने इंग्लंडला दोन जबरदस्त हादरे दिले. राणाने बेन डकेटला (३२) जयस्वालकडे, तर हॅरी ब्रुकला (०) केएल राहुलकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. त्यामुळे इंग्लंडची स्थिती १० षटकांत ३ बाद ७७ अशी झाली. त्यानंतर जो रूट व जोस बटलरने (१९) संघाची पडझड थांबवत चौथ्या गड्यासाठी ३४ धावांची भागीदारी केली व संघाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. अशातच रवींद्र जडेजाने जो रूटला (१९) पायचित केले. पुढे बटलर व जेकब बेथेलने पाचव्या गड्यासाठी ५९ धावांची भागीदारी करत इंग्लंडची धावसंख्या वाढवली. डावखुरा फिरकीपटू अक्षर पटेलने बटलरला शॉर्ट फाईन लेगवर हार्दिक पांड्याकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. बटलरने कर्णधारपदाला साजेशी खेळी करत ६७ चेंडूंत ५२ धावांचे योगदान दिले, यात त्याने ४ चौकार हाणलेत. पुढे बेथेलने लियाम लिव्हिंगस्टोन (५) व ब्रायडन कारसेच्या (१०) साथीने संघाला दोनशे धावांचा टप्पा ओलांडून दिला. अष्टपैलू रवींद्र जडेजाने बेथेलला पायचित करून त्याची घोडदौड थांबविली. जेकब बेथेलने ६४ चेंडूंत ३ चौकार व एका षट्कारसह ५१ धावांची खेळी केली. जोफ्रा आर्चरने एकाकी झुंज दिली व इंग्लंडचा संपूर्ण डाव ४७.४ षटकांत सर्वबाद २४८ धावांत आटोपला. आर्चरने १८ चेंडूंत नाबाद २१ धावांची खेळी केली.

भारताकडून पदार्पण करणारा हर्षित राणा व अष्टपैलू रवींद्र जडेजाने प्रत्येकी ३ बळी, तर मोहम्मद शमी, अक्षर पटेल व कुलदीप यादवने प्रत्येकी १ बळी टिपला. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना भारताची सुरुवात निराशाजनक झाली. पदार्पण करणारा यशस्वी जयस्वाल (१५) व कर्णधार रोहित शर्मा (२) ही सलामीची जोडी लवकरच तंबूत परतली. वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने यशस्वीला, तर साकिब महमूदने रोहितला सहकाऱ्यांकडून झेलबाद केले. त्यावेळी भारताची स्थिती ५.२ षटकांत २ बाद १९ धावा अशी झाली होती, मात्र त्यानंतर शुभमन गिल, श्रेयस अय्यर व अक्षर पटेलने तडाखेबंद फलंदाजी करत भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत केल्या.





विजयाचा आनंद साजरा करताना हार्दिक पांड्या व रवींद्र जडेजा

शुभमन व श्रेयसने तिसऱ्या गड्यासाठी ९४ धावांची भागीदारी केली व संघाला १६ षटकांत ११३ धावांचा टप्पा गाठून दिला. याचवेळी डावखुरा फिरकीपटू जेकब बेथेलने श्रेयसला पायचित केले. श्रेयस अय्यरने अवघ्या ३६ चेंडूंत ९ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ५९ धावा केल्या.

**शुभमन-अक्षरची शतकी भागिदारी**

पुढे शुभमन व अक्षर पटेलने इंग्लंडच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत भारताला विजयाच्या समीप आणले. अक्षरने शुभमनसोबत चौथ्या गड्यासाठी १०८ धावांची भागीदारी केली व भारताला २२१ धावांवर पोहोचवले. अक्षर आदिल रशीदच्या फिरकीला बळी पडला. अक्षरने ४७ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कारसह ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली. अक्षरचे हे तिसरे अर्धशतक ठरले. त्यावेळी भारताला उर्वरित ९८ चेंडूंत २८ धावा काढण्याची गरज होती, मात्र रशिदने शुभमनच्या मदतीला आलेल्या केएल राहुल (२) याला झेलबाद केले. नंतर साकिब महमूदने शुभमन गिलची घोडदौड रोखली व त्याला बटलरकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. शुभमन गिलने ९६ चेंडूंत १४ चौकारांसह ८७ धावांची उपयुक्त खेळी केली. गिलचे हे १४ वे वन-डे अर्धशतक ठरले. हार्दिक पांड्या व रवींद्र जडेजाने नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने ३८.४ षटकांत ६ बाद २५१ धावा काढून ४ गड्यांनी विजय नोंदविला. पांड्या ९ धावांवर, तर जडेजा १२ धावांवर नाबाद राहिला. इंग्लंडकडून साकिब मेहमूद व आदिल रशीदने प्रत्येकी २ बळी, तर जोफ्रा आर्चर व जेकब बेथेलने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले. दुसरा वन-ढे सामना रविवारी कटक येथे होणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# कोहली इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यातून बाहेर

### प्रेक्षकांची घोर निराशा



◆ **नागपूर, ६ फेब्रुवारी**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यातून बाहेर पडला. उजव्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे विराट कोहली पहिल्या एकदिवसीय सामन्यासाठी निवडीसाठी उपलब्ध नव्हता, असे बीसीसीआयने एक्सवरील एका निवेदनात म्हटले आहे.

**शमीचे पुनरागमन**

दरम्यान, दुखापतीतून बरा झालेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी एकदिवसीय संघात परतला आहे आणि सुमारे १५ महिन्यांनंतर आपला पहिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे. यशस्वी जयस्वाल व हर्षित राणा हे दोन पदार्पण करणारे खेळाडू आहेत. अनेक क्रिकेटप्रेमी विराट कोहलीची फलंदाजी बघण्यासाठी आलेले होते, परंतु हा धडाकेबाज फलंदाज इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या वन-डे सामन्यात खेळणार नसल्याचे जाहीर झाल्यामुळे व्हीसीए जामठा स्टेडियमवर उपस्थित नागपूरच्या क्रिकेटप्रेमींची घोर निराशा झाली. ◀(तभा वृत्तसेवा)

# जयस्वाल, राणाचे ‘वन-डे’त पदार्पण


वन-डे पदार्पणाची कॅप परिधान केलेलेः यशस्वी जयस्वाल व हर्षित राणा

◆ **नागपूर, ६ फेब्रुवारी**

गुरुवारी नागपूर येथील विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर इंग्लंडविरुद्धच्या वन-डे मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि वेगवान गोलंदाज हर्षित राणाला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी दिली.

रोहित शर्मा व के. एल. राहुल यांच्यासोबत कसोटी सलामीवीर म्हणून प्रभावी कामगिरी केल्यानंतर जयस्वाल एकदिवसीय स्वरूपात प्रवेश करतो. त्याच्या पदार्पणामुळे २०२५ च्या चॅम्पियन्स चषकापूर्वी त्याच्या क्षमतेचे मूल्यांकन करण्याचा भारतीय संघ व्यवस्थापनाचा हेतू दिसून येतो.

दुसरीकडे, हर्षित राणा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले संक्रमण सुरूच ठेवत आहे. गत वर्षी ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी पदार्पण केल्यानंतर, जानेवारीच्या सुरुवातीला इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मध्ये तो पर्यायी खेळाडू म्हणून खेळला. त्याच्या समावेशामुळे वरिष्ठ पर्यायांच्या अनुपस्थितीत भारताच्या वेगवान गोलंदाजीला बळकटी मिळते. ◀(तभा वृत्तसेवा)

# गद्दाफी स्टेडियमचे काम विक्रमी वेळेत पूर्ण : पीसीबी

### चॅम्पियन्स चषकासाठी सज्ज

◆ **लाहोर, ६ फेब्रुवारी**

लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममधील नूतनीकरण व अद्ययावतीकरणाचे काम ११७ दिवसांच्या विक्रमी वेळेत पूर्ण झाले आहे आणि ते आता आयसीसी चॅम्पियन्स चषकासह आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने आयोजित करण्यासाठी सज्ज आहे, असे पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) गुरुवारी जाहीर केले.

नवीन स्वरूपाच्या स्टेडियममध्ये आता चांगल्या सुविधा, नवीन प्रकाश झोताची व्यवस्था, सर्व सुविधायुक्त बॉक्स, वाढलेली बसण्याची क्षमता, इलेक्ट्रॉनिक स्कोअरबोर्ड आणि टॉप ऑफ द लाईन एलईडी टॉवर्स आहेत, असे पीसीबीने म्हटले आहे.

भीती आणि टीकेला न जुमानता स्टेडियम वेळेवर तयार करण्यासाठी दिवसरात्र काम करणाऱ्या सर्वांचा मी आभारी आहे, असे पीसीबीचे प्रमुख मोहसिन नक्वी म्हणाले.



काम पूर्ण करण्यात पीसीबीला किमान ५ आठवडे उशीर झाल्याचे वृत्त अलिकडेच आले होते. एका आठवड्यानंतर स्पर्धा सुरू होत असल्याने पीसीबीला १२ फेब्रुवारीपर्यंत स्टेडियम आयसीसीकडे सोपवावे लागतील.

शुक्रवारी एका समारंभात पंतप्रधान शाहबाज शरीफ स्टेडियमचे अधिकृत उद्घाटन करतील. यावेळी अली जफर, आयमा बेग व आरिफ लोहार सारखे प्रसिद्ध कलावंत थेट सादरीकरण करणार आहे.

हे स्वप्न साकार करणाऱ्या जवळजवळ १००० कामगारांबद्दल मी विशेष आभारी आहे, असे नक्वी म्हणाले आणि प्रेक्षकांना उंच बसण्याची जागा आणि मैदानाभोवती उंच कुंपण काढून टाकून खेळ अधिक चांगला पाहण्याचा अनुभव देण्याचे आश्वासन दिले.

८ फेब्रुवारी रोजी पाकिस्तान व न्यूझीलंड त्रिकोणी मालिकेचा उद्घाटनीय सामना खेळतील, तेव्हा नवीन स्टेडियमची चाचणी घेतली जाईल. या तिरंगी मालिकेत दक्षिण आफ्रिका संघ सुद्धा सहभागी होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

### ऑस्ट्रेलियाचा कसोटी संघ दशकात पहिल्यांदाच वेस्ट इंडीज दौऱ्यावर

◆ **सेंट जॉन्स, ६ फेब्रुवारी**

ऑस्ट्रेलिया जून व जुलैमध्ये ३ कसोटी व ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळण्यासाठी वेस्ट इंडीजचा दौरा करणार आहे, अशी घोषणा वेस्ट इंडीज क्रिकेट मंडळाने बुधवारी केली. २०१५ नंतर ऑस्ट्रेलियाचा हा पहिलाच वेस्ट इंडीज दौरा असेल. २०१५-१६ मध्ये वेस्ट इंडीजच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर दोन्ही देशांमधील पहिली तीन कसोटी मालिका असेल.

फ्रॅन्क वॉरेल चषक मालिकेतील पहिला कसोटी सामना २५ जूनपासून ब्रिजटाऊन, बार्बाडोस येथे खेळवला जाणार आहे. दुसरा कसोटी सामना ३ जुलैपासून सेंट जॉर्ज, ग्रेनाडा येथे आणि तिसरा कसोटी सामना १२ जुलै रोजी किंग्स्टन, जमैका येथे सुरू होणार आहे. २० २२ जुलै रोजी किंग्स्टनमधील सबिना पार्क येथे पहिले दोन टी-२० सामने खेळले जातील, तर उर्वरित तीन टी-२० सामने २५, २६ आणि २८ जुलै रोजी सेंट किट्सच्या बासेटेरे येथे खेळले जातील. ११ जूनपासून लॉर्ड्स येथे होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्यानंतर दोन आठवड्यांनी वेस्ट इंडीज मालिका होईल. ◀(वृत्तसंस्था)

# नौदलाच्या नीरज कुमारचे ‘सुवर्णलक्ष्य’

## ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ● ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या स्वप्निल, ऐश्वर्यला मागे टाकले

◆ **डेहराडून, ६ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत गुरुवारी पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेत भारतीय नौदलाच्या नीरज कुमारने पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता स्वप्निल कुसळे व ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर यांच्यावर धक्कादायकरित्या मात करून सुवर्णपदक जिंकले.




सेवा क्रीडा नियंत्रण मंडळाचे (एसएससीबी) प्रतिनिधित्व करणाऱ्या २५ वर्षीय नीरज कुमारने ४६४.१ गुणांसह अव्वल स्थान मिळवले. मध्य प्रदेशच्या ऐश्वर्य प्रताप सिंह तोमरने ४६२.४ गुणांसह रौप्यपदक मिळवले, तर गत वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक महाराष्ट्राच्या स्वप्निल कुसळेला तिसऱ्या स्थानावर (४४७.७) समाधान मानावे लागले. स्वप्निलने पॅरिसमध्ये ऑलिम्पिक पदक जिंकणारा पहिला भारतीय नेमबाज म्हणून इतिहास घडवला होता. नीरजने बंगळुरूतील येलहंका येथील पदुकोण द्रविड सेंटर फॉर स्पोर्ट्स एक्सलन्स (सीएसई) येथील एलिट शूटिंग अकादमीमध्ये प्रशिक्षण घेतो.

दरम्यान, १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत हरयाणाच्या सुरुची सिंग आणि प्रमोदने राजस्थानच्या अंजली शेखावत व उमेश चौधरी या जोडीचा १७-७ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.

महाराष्ट्राच्या राही सरनोबत व प्रणव अरविंद पाटील या जोडीने उत्तराखंडच्या अभिनव देशवाल व यशस्वी जोशी या जोडीला १७-३ असे हरवले. ◀(वृत्तसंस्था)

### मुष्टियुद्धात अकोल्याच्या हरिवंशला कांस्यपदक



**पितोडगड :** ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मुष्टियुद्धात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अकोल्याच्या हरिवंश तिवारीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या इतर खेळाडूंचा उपांत्य फेरीपूर्वीच पराभव झाल्यामुळे मुष्टियुद्धातील महाराष्ट्राचे हे एकमेव पदक ठरले आहे.

६० ते ६३.५ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत ऑलिम्पिकमध्ये तीन वेळा भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शिवा थापाकडून हरिवंश तिवारीला पराभव पत्करावा लागल्यामुळे त्याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. अकोला येथील हरिवंश याचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील हे पहिलेच पदक आहे. त्याने यापूर्वी वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत तीन वेळा कांस्यपदक, तर अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत एक कांस्यपदक जिंकले होते २०१९ खेलो इंडिया स्पर्धेत त्याने सुवर्णपदक जिंकले होते. २०२१-२२ चा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला आहे.

### टेनिस : महाराष्ट्राच्या पुरुषांना कांस्य, महिलांची अंतिम फेरीत धडक

**डेहराडून :** ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महिलांच्या टेनिस स्पर्धेत आत्मविश्वासाने खेळणाऱ्या महाराष्ट्राने बलाढ्य तामिळनाडूला नमवून अंतिम फेरी गाठली. उपांत्य फेरीतच पराभव झाल्यामुळे महाराष्ट्राच्या पुरूष संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. पुरुष गटातील हॉकीच्या स्पर्धेत अर्ध्या डझनहून अधिक आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश असलेल्या उत्तर प्रदेश संघाला महाराष्ट्राने गोलशून्य बरोबरीत रोखले. या बरोबरीमुळे पुरुष गटातील हॉकीच्या स्पर्धेत बाद फेरीच्या आशा कायम ठेवल्या. परेड मैदानाजवळील टेनिस संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेमध्ये तामिळनाडूचा २-० असा पराभवाचा करीत महाराष्ट्राच्या महिला संघाने अंतिम फेरी गाठली. संघाच्या विजयात आकांक्षा निठुरे व वैष्णवी आडकरने उत्कृष्ट कामगिरी केली. एकेरीच्या सामन्यात आकांक्षाने दिया रमेशचा ७-५, ६-४ असा पराभव केला. दुसऱ्या लढतीत वैष्णवीने लक्ष्मीप्रभा अरूणकुमारवर ७-६ (८-६) ६-३ अशी मात केली. पुरुष गटात मात्र, महाराष्ट्राला उपांत्य फेरीत तामिळनाडू विरुद्ध १-२ असा पराभव पत्करावा लागला.

# कमिन्स, हेझलवूड चॅम्पियन्स चषकातून बाहेर

◆ **गॅले, ६ फेब्रुवारी**

ऑस्ट्रेलियाला गुरुवारी आणखी एक धक्का बसला. कर्णधार पॅट कमिन्स व वरिष्ठ वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड दुखापतींमुळे आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेतून बाहेर झाले आहेत.





भारताविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेच्या अखेरीस झालेल्या घोट्याच्या दुखापतीतून कमिन्स अद्याप सावरलेला नाही, तर हेझलवूड अजूनही पायाच्या दुखापतीतून बरा होत आहे.

हेझलवूडचा शेवटचा स्पर्धात्मक सामना ब्रिस्बेन येथे झालेल्या तिसऱ्या अनिर्णीत कसोटीत भारताविरुद्ध खेळला होता.

अष्टपैलू मार्कस स्टोइनिसने वन-डे सामन्यांमधून धक्कादायकरित्या निवृत्ती जाहीर केली आणि पाठीच्या दुखापतीतून बरे न झाल्यामुळे मिचेल मार्शने जागतिक स्पर्धेतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. आदल्या दिवशी, देशाच्या चॅम्पियन्स चषक संघात स्थान मिळवलेल्या स्टोइनिसने अचानक एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली जेणेकरून त्याच्या कारकिर्दीच्या पुढील अध्यायावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करता येईल, ज्यामुळे प्रमुख खेळाडूंच्या दुखापतींशी झुंजणाऱ्या संघासाठी निवड समितीची डोकेदुखी वाढली.



दुर्दैवाने, पॅट कमिन्स, जोश हेझलवूड व मिचेल मार्श हे काही दुखापतींमुळे त्रस्त आहेत आणि चॅम्पियन्स चषकासाठी वेळेच्या आत बरे झाले नाहीत, असे राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांनी गुरुवारी सांगितले. ही बाब निराशाजनक असली तरी, इतर खेळाडूंना जागतिक स्पर्धेत ऑस्ट्रेलियासाठी कामगिरी करण्याची एक उत्तम संधी मिळणार आहे, असे बेली म्हणाले.

कमिन्सच्या अनुपस्थितीत स्टीव्ह स्मिथ किंवा ट्रॅव्हिस हेड हे १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तानमध्ये सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स चषकात वन-डे विश्वचषक विजेत्या संघाचे नेतृत्व करू शकतात.

संघ २२ फेब्रुवारी रोजी लाहोर येथे पारंपरिक प्रतिस्पर्धी इंग्लंडविरुद्ध चॅम्पियन्स चषकात आपल्या अभियानाची सुरुवात करणार आहे, त्यानंतर दक्षिण आफ्रिका (२५ फेब्रुवारी, रावळपिंडी) आणि अफगाणिस्तान (२८ फेब्रुवारी, लाहोर) विरुद्ध सामने खेळणार आहे. कमिन्स आणि हेझलवूड हे दोघेही जागतिक दर्जाचे वेगवान गोलंदाज आहेत, त्यांना खेळण्यासाठी हिरवा कंदील मिळण्यापूर्वी त्यांना पुनर्वसन कालावधी वाढवावा लागेल, ज्यामुळे आयसीसीच्या मेगा स्पर्धेनंतर होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये त्यांचा सहभागही संशयास्पद आहे. ◀(वृत्तसंस्था)

# ऑलिम्पिकपटू, विश्वविजेत्यांना नमवत महाराष्ट्राचा दुहेरी सुवर्णवेध!

## सुखमणी-गाथाने मिश्र दुहेरीत बाजी मारली ● गाथा, वैष्णवी, शर्वरी, मुक्ताने पटकाविले सुवर्ण

◆ **डेहराडून, ६ फेब्रुवारी**

महाराष्ट्राच्या तिरंदाजांनी ऑलिम्पियन व विश्वविजेत्या खेळाडूंचा समावेश असलेल्या झारखंडला नमवित ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रिकर्व्ह प्रकारात गुरुवारी दोन सुवर्णपदके जिंकून धमाका केला.

गाथा खडके व सुखमणी बाबरेकर जोडीने शूट-ऑफपर्यंत रंगतदार ठरलेल्या रिकर्व्ह मिश्र दुहेरीच्या अंतिम लढतीत बाजी मारत सुवर्णभेद साधला. तसेच गाथा खडके, वैष्णवी पवार व शर्वरी शेंडे या त्रिकुटाने रिकर्व्ह महिलांच्या सांघिक प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली.

राजीव गांधी क्रिकेट स्टेडियममध्ये गाथा व सुखमणीने हरयाणाच्या पारस हुडा व भजन कौर या जोडीला तोडीस तोड लढत दिली. शेवटी ही लढत ४-४ अशी बरोबरीत सुटल्याने शूट ऑफमध्ये गेली. शूट ऑफमध्ये वन ॲरो शूटमध्ये गाथा व सुखमणीने विजय नोंदवत सुवर्णपदक पटकाविले.



सुखमणी बाबरेकर व गाथा खडके

गाथा खडके, वैष्णवी पवार, शर्वरी शेंडे व मुक्ता मोडगी यांनी सांघिक महिला गटातून झारखंडच्या दीपिका कुमारी, अंकिता भगत व कोमालिका बारी या स्टार खेळाडूंनी सजलेल्या संघाचा ६-१ फरकाने पराभव करून महाराष्ट्राच्या झोळीत सुवर्णपदक टाकले.

या संघास समीर म्हस्के यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. महाराष्ट्राने ही दोन सुवर्णपदके जिंकल्यानंतर खेळाडू व चाहत्यांनी जय शिवाजी, जय भवानी', 'जय महाराष्ट्र टीम महाराष्ट्र' अशा घोषणा देत मैदान दणाणून सोडले. झारखंडच्या संघात दोन ऑलिम्पिकपटू व एक विश्वविजेत्या तिरंदाजाचा समावेश होता. त्यामुळे आमच्याकडे गमावण्यासारखे काहीच नव्हते. उलट झारखंडच्या संघावरच दडपण होते. आम्ही कुठलेही दडपण न ठेवता केवळ नैसर्गिक खेळ करावा, असा कानमंत्र प्रशिक्षकांनी दिला होता. योजनेनुसार खेळ झाला अन् आम्ही दोन सुवर्णपदके जिंकण्यात यशस्वी ठरलो, असे गाथा खडके म्हणाली. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेचे १४ फेब्रुवारीला भूमिपूजन

### माजी आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती; 300 कोटी रुपयांची तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.६ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यातील शेतीच्या पाण्यापासून वंचित असणाऱ्या सुमारे २२ गावांसाठी वरदायिनी असणारी व गेली २५ वर्षे मंजुरीच्या प्रतिक्षेत असणारी स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना म्हणजे पूर्वीची उजनी उपसा सिंचन योजना या योजनेच्या पहिल्या टप्प्यातील तीनशे कोटी रुपयांच्या कामाचा भूमि पूजन व शुभारंभ राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी चिकमहूद येथे होणार असून या कार्यक्रम ासोबत कार्यक्रम स्थळी शेतकरी मेळावा आयोजित केल्याची माहिती माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली.



सन २००० साली ७८.५९ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता या योजनेला मिळाली होती. परंतु पुढील पाच वर्षे या योजनेवर कोणताही खर्च झाला नसल्याने २००५ साली प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली होती. सन २०१९ साली आमदार झाल्यानंतर शहाजीबापू पाटील यांना या योजनेच्या मंजुरीसाठी प्रयत्न सुरू केला. त्यांनी या योजनेचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला असे नामकरण शासनाकडून मंजूर करून घेतले व नव्याने १० गावांचा या योजनेमध्ये समावेश करून एकूण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष २२ गावांना या योजनेच्या दोन टीएमसी पाण्याचा फायदा शेतकऱ्यांना होण्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करून २७ फेब्रुवारी २०२४ रोजी ८८३.७४ कोटी रुपयांच्या कामाला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडून मंत्रिमंडळ बैठकीम ध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर करण्यास आ.शहाजीबापू पाटील यांनी यश मिळवले.

एकूण ८८४ कोटी रुपये खर्चाच्या या योजनेतील पहिल्या टप्प्यातील कामांची निविदा विधानसभा निवडणुकीपूर्वीच प्रसिद्ध होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाचे आदेश देण्यात आले होते. परंतु निवडणूक आचारसंहिता व मंत्रिमंडळ निवड यामुळे या कामाचे भूमिपूजन लांबले होते. माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी दोन दिवसांपूर्वी राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन या योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्याची विनंती मुंबई येथे केली होती. यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी या योजनेचा भूमि पूजन व शुभारंभ कार्यक्रमाला वेळ दिली असून हेलिकॉप्टरने महूद येथे येणार असल्याचे शहाजीबापू पाटील यांना कळविले आहे.

#### उर्वरित कामांनाही लवकरच सुरुवात

स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना या योजनेचे काम सुरू होणार असल्याने २२ गावांमधील सुमारे १३०५५ हेक्टर शेतजमिनींना बंदिस्त नलिकेद्वारे शेतीला लवकरच कायमस्वरूपी पाणी मिळणार असल्याने सांगोला तालुक्यातील दुष्काळ कायमस्वरूपी संपणार असून पुढील टप्प्यातील उर्वरित कामानाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती शहाजीबापू पाटील यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त

### हिमाचल दर्शनाने भारावले सांगोला विद्यामंदिरचे विद्यार्थी

**सांगोला, दि. ६ फेब्रुवारी-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजमधील नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल पंजाब, हरियाणा व हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये आयोजित करण्यात आली होती. या सहलीमध्ये एकूण १०७ विद्यार्थी व १३ शिक्षक यांनी सहभाग नोंदवला. सदर सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी अमृतसर येथे सुवर्ण-मंदिर, जालियनवाला बाग, वाघा बॉर्डर, मनालीमध्ये तिबेटियन बुद्धविहार, वशिष्ठ मंदिर, गरम पाण्याचे कुंड, हिडिंबा देवी मंदिर, घटोत्कच मंदिर, उंच पाईन वृक्षांमधील जंगल सफर, कुलू येथे रिव्हर राफ्टिंग, वैष्णौदेवी मातेचे दर्शन, चंदीगडमधील रॉक गार्डन, सुकना लेक, रोज गार्डन या प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊन आनंद घेतला. सदर सहल यशस्वी करण्यासाठी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य अमोल गायकवाड, सहल विभागप्रमुख प्रा.डी.के.पाटील, सचिन बुंजकर, प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.सुहास काळेल, प्रा.जालिंदर मिसाळ, प्रा.तानसिंग माळी, अन्सार इनामदार, वसंत गुळमिरे, शैलजा झपके, प्रा.माधुरी पैलवान, प्रा.आश्विनी जालगिरे, प्रा.सुप्रिया गायकवाड या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. सहलीचे सर्व नियोजन मधुरिया टूर्स, सोलापूरचे दत्तात्रय काळे यांनी केले.




### सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये बक्षिस वितरण समारंभ

**सांगोला, दि. ६ फेब्रुवारी-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी ग्रामीण साहित्यिक आप्पासाहेब खोत, संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, विश्वस्त जयमालाताई गायकवाड, डॉ. यशोदीप गायकवाड, पालक प्रतिनिधी तानाजी पाटील, प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख, प्रा. एस. डी. बावचे उपस्थित होते. आप्पासाहेब खोत यांनी तीन वर्ष जीव ओतून प्रामाणिक कष्ट केल्यास त्यांची उर्वरित आयुष्य सुखकर होईल असे मत व्यक्त केले. गॅदरिंगचा पाहुणा ही भन्नाट विनोदी कथा सांगून निखळ मनोरंजन केले. यावेळी जयम ालाताई गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. बाबुराव गायकवाड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



### अक्कलकोटमधील अनाधिकृत बांधकामाबाबत नगरपालिकेला तक्रार

**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदिराजवळील श्रीमंत विजयसिंहराजे भोसले व्यापारी संकुल साईट नं. ४२ या नगरपालिकेच्या शॉपींग सेंटरमध्ये अनाधिकृत बांधकाम तसेच सार्वजनिक संडास व मुतारी याचे पाडकाम करून सदरचे शॉपिंग सेंटरमधील मोकळ्या जागा व खुले टेरेसचा अनाधिकृतरित्या गैरवापर होत आहे. याबाबत वंचित बहुजन विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाने मुख्याधिकारी रमाकांत डाके यांना निवेदन दिले. सखोल चौकशीची मागणी करून अनधिकृत बांधकाम पाडकाम पाडा आणि गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याप्रसंगी सिद्धार्थ बनसोडे, रवी पोटे, विशाल ठोंबरे, संतोष घाडगे, सुनील शिंगे, संजय शिंदे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### अंगणात खेळणाऱ्या दोन वर्षांच्या बालिकेस दंश

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

घराच्या अंगणात खेळणा-या बालिकेला दंश झाला. तिला उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा प्रकार बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आला. आरोही दत्तात्रय माळी (वय २, रा. कौठाळी ता. उ. सोलापूर) असे बालिकेचे नाव आहे. कौठाळी परिसरात आरोहीच्या वडीलांचे शेत आहे. शेतातील घरासमोर बुधवारी सायंकाळी आरोही खेळत होती. त्यावेळी तिच्या हातास काहीतरी चावल्याने तिला त्रास होऊ लागला. यामुळें वडाळा येथे उपचार करून डॉक्टराच्या सल्लयानुसार रात्री १०.५० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बेशुध्दावस्थेत आढळलेल्या कर्नाटकातील तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

येथील टीएनएस जीमसमोरील फूटपाथवर बेशुध्दावस्थेत आढळलेल्या कर्नाटकातील तरुणाचा मृत्यू झाला. हा प्रकार बुधवारी रात्री ११.३० वाजता उघउकीस आला. चंद्रशेखर लिंगप्पा लंपाटे (वय ३७, रा. आंबेवाडा ता. आळंद राज्य कर्नाटक) असे तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री ११.३० च्या सुमारास चंद्रशेखर हा टीएनएस जिमसमोरील रस्त्यावर बेशुध्द आणि जखमी अवस्थेत आढळून आला. त्यास जेलरोड पोलीस ठाण्यातील हवालदार कांबळे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## पंढरपूर-मंगळवेढ्यासाठी उद्योग द्यावेत

### आ. आवताडेंकडून मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ फेब्रुवारी-**

कुशल नेतृत्वाखाली दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राने ऐतिहासिक गुंतवणूक प्राप्त केली आहे. दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फॉर्म २०२५ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्याने तब्बल १५.७० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यासाठी प्राप्त केली आहे ही ऐतिहासिक गुंतवणूक महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या कर्तुत्वाने देशातील इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक जास्त गुंतवणूक प्राप्त केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करण्याचे पत्र पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाच्या वतीने देऊन काही उद्योग पंढरपूर व मंगळवेढा औद्योगिक वसाहतीमध्ये देण्यात यावेत अशी मागणी करत मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक महाराष्ट्रासाठी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे .



त्यांनी दिलेल्या या पत्रात असे म्हटले आहे की माझ्या मतदारसंघात नुकतेच आपण पंढरपूर एमआयडीसी मंजूर करून दिली आहे सध्या त्या जागेची मोजणी चालू असून लवकरच ती जागा फिक्स होणार आहे त्यामुळे त्या ठिकाणी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार असून आपण त्या ठिकाणी नवीन उद्योगासाठी कंपन्यांशी बोलून पंढरपूर साठी काही उद्योग पाठवले तर येथील तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा एमआयडीसी बाबत ही मी नुकतीच बैठक घेऊन येथे जागा घेऊन उद्योग सुरू करण्यात व्यवसायिकांना नोटीसा काढून तात्काळ उद्योग सुरू करा अन्यथा त्यांच्या जागा काढून घ्या अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहे.

#### मुख्यमंत्र्यांना दिले पत्र

मंगळवेढा येथील औद्योगिक वसाहतीमध्येही उद्योगधंद्यासाठी जागा उपलब्ध आहेत येथेही तात्काळ औद्योगीकरणाच्या दृष्टीने नवीन उद्योगांसाठी काही उद्योगपतींना आपल्या माध्यमातून प्रोत्साहित केले तर अनेक उद्योगधंदे येथे येऊ शकतात. त्यामुळे नवीन गुंतवणूकदारांना आपण पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील असलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये भविष्यात आपल्या माध्यमातून मोठी परकीय गुंतवणूक करून मोठे उद्योग स्थापित करत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याल अशी अशा व्यक्त करतो अशा आशयाचे शुभेच्छा संदेश पत्र आ. समाधान आवताडे यांनी देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून दिले.



## परीक्षेला सामोरे जाताना मन शांत ठेवा : सुहास गुधाटे

### मोडनिंबमध्ये मनशक्ती केंद्रातर्फे प्रशिक्षणपर कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ६ फेब्रुवारी-**

मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा या संस्थेचे साधक सुहास गुधाटे यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेला कसे सामोरे जावे, मनाची एकाग्रता, मेंदू व्यायाम, झोपेतून शिक्षण, सारांश पद्धत, अभ्यासाच्या सोप्या पद्धती, मनशक्ती संशोधित उपाय घरच्या घरी विद्यार्थ्यांनी कसे करावे, परीक्षेला जाताना मनाची स्थिती शांत कशी ठेवावी, टीव्ही व मोबाईलचा वापर योग्य तेवढाच करावा याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

संगनबसवेश्वर कन्या प्रशाला, मोडनिंब व संत सावता माळी विद्यालय, अरण येथे विद्यार्थ्यांसाठी 'परीक्षेला सामोरे जाताना' या प्रशिक्षणपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ म ोडनिंबद्वारे परीक्षेसाठी नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा, या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ३०० विद्यार्थी, ५० पालक व शिक्षक उपस्थित होते. यावेळी भारत शिंदे, उदय माने, पोपटभाई दोभाडा, गटशिक्षणाधिकारी विकास यादव व डॉ. प्रशांत कोल्हे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी रोटरी क्लब ऑफ मोडनिंबतर्फे सर्व विद्यार्थ्यांना मनशक्ती निर्मित उपायात्मक साहित्याची भेट देण्यात आली. प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. संतोष दळवी यांनी केले. सूत्रसंचालन सावता घाडगे व शेखर सुर्वे यांनी केले. कार्यक्रमासाठी राजेंद्र गिड्डे, फरड, सतीश घाडगे, किरण काटकर, सज्जन पाटील, माणिक कणसे, तानाजी इंगळे, अर्जुन बनसोडे तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते. सचिव सुनील रेपाळ यांनी आभार मानले.

## आचरणातून संतांनी धर्माची स्थापना केली

### मौनतपस्वी जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी : स्वामी सथर्मांचे घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**

प्रत्येक व्यक्तीने त्याच्या वाट्याला आलेल्या कर्मानुसार धर्माचे आचरण केले तर समाजात मानव निर्मित प्रश्नच उद्भवणार नाहीत आणि याच्याचसाठी ऋषीमुनींनी व स्वामींनी जनसामान्यांना कर्तव्यपूर्तीचा धर्म सांगितला. त्यामुळे या दैवतरूपी संतांनी आपल्या आचरणातून हिंदू धर्म व संस्कृतीची संस्थापना केल्याचे निंबाळ मठ संस्थानचे मठाधिपतीमौनतपस्वी जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांनी सांगितले.



अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले, यावेळी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, आपल्या भारतीय संस्कृतीच्या इतिहासात ऋषीमुनी व संतांनी आपल्या प्रत्येक आचार व विचारातून अध्यात्म व विज्ञानाचं चिंतन मांडलं. पण आपण फक्त संतांकडे चमत्कार म्हणूनच पाहतो ही दृष्टी बदलली पाहिजे. अत्रीऋषी, नृसिंह सरस्वती, श्रीपाद वल्लभ यांनी जी साधना केली. त्या साधनेची शक्ती म्हणजेच श्री स्वामी समर्थ होय. येथील वटवृक्षाखाली शक्तीरुपाने श्री स्वामी समर्थ वास्तव्यास आहेत ते ठिकाण म्हणजेच तीर्थक्षेत्र अक्कलकोट होय. माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या कर्तव्यातून ठरते. धर्माकडे नितीनियम आणि कर्माच्या दृष्टिकोनातून स्वामींनी पाहिले आणि कर्तव्यातून धर्माचा प्रसार केला. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन म हेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे सेक्रेटरी आत्माराम घाटगे यांनी मौनतपस्वी जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांचा सन्मान केला. यावेळी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्ज्वलाताई सरदेशमुख, उद्योगपती समर्थ मसुती, ऋषिकेश लोणारी, रविराव महिंद्रकर, महेश मस्कले, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, विपुल जाधव, जयप्रकाश तोळणुरे, अविनाश क्षीरसागर उपस्थित होते.

## यंदा गव्हातून चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा

### पोषक वातावरणाचा होणार फायदा; पिलीव परिसरातील शेतकऱ्यांतून आनंद



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ६ फेब्रुवारी-**

अनेक वर्षानंतर कधी नव्हे ते यंदा गव्हाला अतिशय पोषक असे वातावरण आहे. यामुळे गव्हातून यंदा चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

नोव्हेंबर महिन्यात ज्या शेतकऱ्यांनी जमिनीची चांगली मशागत करुन व पेरणीबरोबर १८:४६ या खत घातले आहे. अशा शेतकऱ्यांचा यंदा गहू पीक अतिशय चांगले आहे. आता १५ ते २० दिवसात गहू काढणीला वेग येणार आहे. यंदा शेतकऱ्यांना १६ ते २० क्विंटल एवढे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांनी महिको, श्रीराम १११, किरती गोल्ड, इगल, इकारी ४० अशा वेगवेगळ्या गव्हाच्या जातीची लागवड केली आहे. साधारणत: वीस दिवस झाल्यावर वेस्टा या तणनाशकाची फवारणी केली आहे. त्यानंतर बरोबर दीड महिन्यानंतर डीएपी व १९:१९ ची फवारणी केली आहे. तसेच यासाठी युरिया टाकला आहे. आतापर्यंत पाण्याच्या सात पाळ्या झाल्या आहेत.सध्या गव्हाची लोंबी जर पाहिली दमदार दाणे भरलेले पाहावयास मिळत आहेत. जवळपास लोंबीत ६० ते ७० दाणे दिसत आहेत. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हा गहू काढणीला येईल असा अंदाज आहे. यंदा गव्हाचे विक्रमी व चांगले उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे.

> यंदा सुरुवातीपासून निसर्गाने साथ दिली. नंतर चांगली थंडी पडली. यामुळे यंदा गव्हाच्या पिकाला पोषक वातावरण मिळाले असून जोमदार वाढ झाली आहे. यामुळे यंदा गव्हाचे चांगले उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे. **-संजय पाटील, शेतकरी, कुसमोड**

## भंडारकवठ्यात भांडण, तंट्याला फाटा

### ग्रामदैवत यात्रेनिमित्त सलोख्याचे संबंध; ग्रामस्थांचे सर्वस्तरातून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ६ फेब्रुवारी-**

गावातील ग्रामदैवतांच्या यात्रेनिमि त्त विविध प्रथा व परंपरा पहावयास मिळतात. अनेक रूढी व परंपरा अनुभवयास मिळते. मात्र गावाच्या देवाच्या यात्रेनिमित्त पंधरा दिवस पंचक्रोशीत भांडण व तंटे होत नाहीत, अशी परंपरा दक्षिण तालुक्यातील भंडारकवठे गावात दिसून येते.

भंडारकवठे गाव सुशिक्षित व शासकीय नोकरीत शिक्षकांचे प्रमाण अधिक असणारे गाव. मात्र या गावात श्री महाशिवयोगी महासिद्ध व पीर ख्वाजा खुतुबोद्दीन ग्रामदैवत असल्याने हिंदू-मुस्लीम एकतेचे दर्शन पहावयास मिळते. ही यात्रा माघ म्हणजेच भारत पौर्णिमेला तीन दिवस असते. मात्र या यात्रेच्या सुरुवातीस दर्श अमावस्या झाल्यानंतर पौर्णिमेपर्यंत गावात व पंचक्रोशीत भांडण, तंटे, वादविवाद व चोरी होत नाही.

बाराव्या शतकापासून अशी परंपरा व आख्यायिका आहे. दर्श अमावस्या झाल्यानंतर गावातील नागरिक भांडण व तंटे न करण्याचा निर्णय घेतात. तशा प्रकारची काळजीही घेण्यात येते. त्यामुळे माघ पौर्णिमेपर्यंत या परंपरेचे पालन होत असल्याचे नागरिक सांगत आहेत. विशेष म्हणजे अनेक किरकोळ कारणावरून हिंदू व मुस्लीम अनेक वाद होत असतात. मात्र या काळात दोन्ही समाजाकडून या परंपरेचे पालन केले जाते. शिवाय या काळात शेतशिवारासह गावात चोरी होत नसल्याचे गावकरी सांगतात.

> बाराव्या शतकाहून अधिक वर्षांपासून येथील सिध्दसांप्रदाय आलेली आहे. गावात यात्रेपूर्वी वादविवाद होत नाहीत आणि आजतागायत या गावात एकही मोठी वादग्रस्त घटना घडली नाही. देवावर ग्रामस्थांचा अपार श्रद्धा आहे.
> **-भीमाशंकर बबलेश्वर, सरपंच, भंडारकवठे**



## संक्षिप्त वृत्त




### हरिभाई देवकरण शाळेत शिक्षण प्रसारक मंडळीचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

शिक्षण प्रसारक मंडळी वर्धापन दिन हरिभाई देवकरण शाळेत साजरा करण्यात आला. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. शिक्षण प्रसारक मंडळी संस्था वर्धापन दिन संस्थापक यांच्या प्रतिमेस पुस्पहार अर्पण करून साजरा करण्यात आला. हरिभाई देवकरण प्रशालेत प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक मा. हनुमंत मोतीबने, उप मुख्याध्यापक रवींद्र पानसरे, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, पर्यवेक्षक रणधीर सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. भानुदास बनसोडे, पर्यवेक्षक मारुती शहाणे, पर्यवेक्षक गणेश नेवरे, प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच कार्यालयीन कर्मचारी, सेवक वर्ग उपस्थित होते. यावेळी उपमुख्याध्यापक रवींद्र पानसरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आभार मंजिरी हरहरे यांनी केले.

### संभाजी आरमार शाही पालखी सोहळा प्रमुखपदी प्रा. मल्लिकार्जुन परळकर

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

संभाजी आरमारच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शाही पालखी सोहळा आयोजित केला जातो. या पालखी सोहळ्याच्या नियोजनाची बैठक संभाजी आरमारच्या शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत डॉ. निर्मलकुमार फडकुले पटांगण येथे संपन्न झाली. छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून बैठकीची सुरुवात करण्यात आली. यावेळी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी सुशील बंदपट्टे व सचिवपदी महेश हनमे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. यंदाच्या पालखी सोहळा प्रमुख पदाची जबाबदारी प्रा. मल्लिकार्जुन परळकर यांच्यावर सोपविण्यात आली. या बैठकीस कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, प्रदेश संघटक प्रकाश डांगे, सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा सांघटक अमित कदम, जिल्हा उपप्रमुख सागर संगवे, शहरप्रमुख सागर ढगे, ॲड. महेश जगताप, तुकाराम जाधव, शिक्षक संघटना जिल्हाप्रमुख अजिंक्य पाटील, दक्षिण तालुका प्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, अर्जुन शिवसिंवाले, राजू माने, राजू रजपुत, गिरीश जवळकर,राजू आखाडे,आघाडी शहरप्रमुख उमा रजपूत, विडी कामगार संघटनेच्या रेखा व्हनकडे उपस्थित होते.



### रॅलीतील रिक्षाचे चाक पायावरून गेल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

महावीर चौकापासून आसरा चौकाच्या दिशेने निघालेल्या रॅलीत सहभागी रिक्षाचे चाक पायावरून गेल्याने रॅलीतील एकजण जखमी झाला. हा प्रकार किनारा हॉटेलसमोर गुरूवारी सकाळी आठ वाजता घडला. काशिनाथ लक्ष्मण निकते (वय ५०, रा. धोत्री ता.द. सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. गुरूवारी सकाळी आठच्या सुमारास होटगी मठाच्या वतीने शहरातून आत्मज्योत रॅली काढण्यात आली. या रॅलीत काशिनाथ हे सहभागी झाले होते. रॅली महावीर चौकातून आसरा चौकाच्या दिशेने जात असंताना, किनारा हॉटेल समोर रॅलीतील रिक्षाचे चाक त्यांच्या पायावरून गेल्याने मुकामार लागून ते जखमी झाले. सकाळी ८.४५ वाजता मित्र संजय हिरोळी यांनी उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दिव्यांगांना मिळणार 'शॉप ऑन ई-व्हेईकल'

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबनासाठी हरित उर्जेवर चालणारे पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही योजना दिव्यांग वित्त व विकास महामंडळातर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी दिव्यांग व्यक्तींनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि. १० फेब्रुवारी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. अशी माहिती दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी दिली आहे. दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी- सुविधा उपलब्ध करून रोजगारनिर्मितीस चालना देणे. दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार, कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. गरजू दिव्यांग व्यक्तींना लाभ मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी व अर्ज करण्यासाठी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींना https://register.mshfdc.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येईल. या लिंकद्वारे दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.



### शरबत समजून प्राशन केले फिनेल

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

शरबतची बाटली समजून फिनेल प्राशन केल्याचा प्रकार शहरातील स्लॉटर हाऊस येथे घडला. फिनेल प्राशन केलेल्या तरुणावर उपचार करून त्यास घरी सोडण्यात आले. सुरज चिनप्पा इरवेवल्लु (वय २७) असे तरुणाचे नाव आहे. घरातील लहान मुलांनी शरबतची बाटली समजून घरातील फ्रिजमध्ये फिनेलची बाटली ठेवली. हा प्रकार सुरजला माहिती नसल्याने त्या बाटलीतील द्रव्य प्राशन केले. हा प्रकार बुधवारी दुपारी ३ च्या सुमारास घडला. त्यात त्रास होऊ लागल्याने गुरूवारी सकाळी अकरा वाजता स्वत: उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# रिकाम्या भाजी मंडईने घेतला तिघांचा बळी?

- जुना विडी घरकुलमधील ई ग्रुप येथील प्रकार
- दारुडे, गर्दुले, रिकामटेकड्यांचा असतो वावर
- एकीकडे मंदिरे, दुसरीकडे बिअर व ताडी दुकान
- तरुण पिढी मोबाईल पाहण्यात असते व्यस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

हैद्राबाद रोडवरील जुना विडी घरकुलमधील ई ग्रुप येथील शिवशंभो देवस्थानच्या बाजूला गेल्या काही वर्षापूर्वी भाजी मंडईसाठी ओटे बांधण्यात आले. परंतु याठिकाणी भाजी विकते बसतच नसल्याने येथील भाजी मंडई रिकामेच आहे. या रिकामा भाजी मंडईने आजपर्यंत तिघांचा बळी घेतल्याचे सांगण्यात आले.

रिकामा असलेल्या या भाजी मंडईत दारुडे, गर्दुले, रिकामटेकड्यांचा वावर असतो. येथील विद्युत दिवे बंद अवस्थेत आहेत. मंडईच्या आसपास शिवशंभो मंदिर, पोशम्मा मंदिर, परमेश्वरी मंदिर अशी मंदिरे तर दुसरीकडे बिअर शॉपी, ताडी दुकान आहे. पोशम्मा चौक ते युनिक टाऊनकडे जाणारा रस्ता अर्धवट स्वरुपात करण्यात आले. विक्रेत्यांअभावी रिकामे असलेली



मंडई, अंधाराचे साम्राज्य, परिसरात असलेले बिअर शॉप व ताडी दुकान यांसारख्या गोष्टींचा गैरफायदा घेत येथील ओट्यावर बसून बिनधिककतपणे दारु ढोसणारे आणि गर्द, चरस, गांजा याचा मनसोक्त आस्वाद घेणाऱ्यांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. दुचाकी, रिक्षा, चारचाकी अशा वाहनांतून येवून येथील रिकाम्या ओठ्यावर बसून दारु पित असतात. दारु वा गांजाच्या नशेत तर्र होत कुठेही लघुशंका करतात. या सर्व प्रकाराला कंटाळून या भागातील नागरिक याठिकाणी गोळा होणारे दारुडे, गर्दुले, रिकामटेकड्यांना हटकले असता उलट त्यांनाच दमदाटी कली जाते. एकाने तर नशेत येथील एका झाडाला पाशी घेत आत्महत्या केली होती. इतर दोघे अति मद्यप्राशन वा गांजाचा जादा डोस यामुळे प्राणाला मुकले होते. रविवार आणि बुधवारी तर याठिकाणी दारुडे, गर्दुले व रिकाम टेकड्यांची जणू जत्रा भरत असते. युवा व तरुण वर्ग येथील ओठ्यावर गटागटाने बसत मोबाईल पाहण्यात व्यस्त असतात. या भागातील नागरिक आमदार विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा यांना प्रत्यक्ष भेटून हा सारा प्रकार कथन केले. दारुडे, गर्दुले व रिकामटकड्यांमुळे आम्हाला संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे मुश्किलीचे बनले आहे. पोलिसांनी याठिकाणी गस्त घालून बंदोबस्त करावे, असे या भागातील नागरिकांतून सांगण्यात आले.

#### अन्यथा ओटे जमीनदोस्त करा

ई ग्रुपसह समस्त विडी घरकुल आणि विविध नगरांतील रहिवाशांच्या सोयीसाठी म्हणून माजी महापौर स्व. महेश कोठे यांच्या संकल्पनेनुसार याठिकाणी भाजी मंडई वसविण्याचा निर्णय घेवून त्यादृष्टीने ओटे बांधून व त्यावर पत्रे बसविण्यात आले. मात्र, एकही भाजी विक्रेता येथे बसत नाही. याकडे लक्ष वेधताना येथे कायमस्वरुपो 'भाजी मंडई सुरु करण्यात यावी. अन्यथा ओटे जमोनदोस्त करुन एखादा समाजमंदिर, अभ्यासिका उभारण्यात यावी, अशी आग्रही मागणी येथील नागरिकांतून करण्यात येत आहे.

#### संध्याकाळनंतर सुरु होतो त्यांचा कार्यक्रम

येथील भाजी मंडई दिवसभर निर्मनुष्य असते. परंत संध्याकाळनंतर म्हणजे जसजसे अंधार पडायला लागते तसतसे दारुड, गर्दुले, रिकामटेकडे आणि मोबाईलधारक युवा, तरुण पिढीची पाऊले इकडे वळतात. संध्याकाळनंतर दारुडे दारु पिण्यात, गर्दुले गांजा ओढण्यात तर युवा, तरुण पिढी मोबाईल पाहण्यात गर्क असतात. संध्याकाळनंतर जणू 'ना कोणाचे भय, ना कशाची चिंता' यानुसार त्यांचा कार्यक्रम अगदी मस्तपैकी सुरु असतो, असे या परिसरातील नागरिक नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

## प्रधानमंत्री आवास योजनेसाठी अर्ज सप्ताह सुरु

**● महापालिका प्रशासनाकडे आतापर्यंत ७० अर्ज प्राप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

प्रधानमंत्री आवास योजनेसाठी शासन आदेशानुसार अर्ज सप्ताह सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत महापालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना विभागाकडे आतापर्यंत सुमारे ७० अर्ज प्राप्त झाले आहेत.

केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत दि. ३१ जानेवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान अर्ज सप्ताहाचे आयोजन शासन आदेशानुसार करण्यात आले आहे.

या सप्ताह अंतर्गत आतापर्यंत महापालिकेकडे घटक एक ते चारसाठी सुमारे ७० अर्ज आले आहेत. दरम्यान, अर्जाची भरण्याची प्रक्रिया यापुढेही सुरूच राहणार आहे. घटक एक - स्वत:च्या जागेवर करावयाच्या बांधकामास अनुदान, घटक - दोन भागीदारीमध्ये परवडणारी घरे, घटक - तीन परवडणारी भाड्याने घरे आणि घटक - चार व्याज अनुदान योजना अशा या चार घटकांतर्गत ही अर्ज प्रक्रिया सुरू आहे. या योजनेअंतर्गत मंजूर घरकुल हे दीड ते दोन वर्षाच्या कालावधीत बांधून पूर्ण करायचे आहे. घटक क्रमांक एक या योजनेअंतर्गत बांधकाम परवान्यासाठी विकास शुल्क माफ करण्यात आले आहे.

#### 'या' चार घटकांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

प्रधानमंत्री आवास योजना-शहरी २.० अंतर्गत ऑनलाईन लिंकद्वारे अ) स्वत:च्या जागेवर करावयाचे बांधकामास अनुदान, ब) भागीदारीमध्ये परवडणारी घर, क) परवडणारी भाड्याने घरे ड) व्याज अनुदान योजना या तीन घटकांमध्ये इच्छुक अर्जदारांचे अर्ज स्वीकृती करण्यात येत आहे. सोलापूर शहर हद्दीतील वरील घटकांनी प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत नवीन घरकूल मंजुरीसाठी https://pmay-urban.gov.in या वेबसाइटवर नजीकच्या सेतु केंद्रावर अर्ज करावे.

## फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

पैशाच्या व्यवहारातून मोहोळ येथे एकाने फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. गणेश शरद निंबर्गीकर (वय ४०, रा. मोहोळ) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे.

गणेश निंबर्गीकर यांनी ५ फेब्रुवारी रोजी रात्री राहत्या घरी पैशाच्या व्यवहारातून फिनेल प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने उपचारसाठी बहिण पूजा जंगम यांनी सोलापूरच्या रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## वरिष्ठ सहाय्यकास रंगेहात अटक

- माध्यमिक शिक्षण विभागात लाचलुचपत विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागात असलेल्या वरिष्ठ सहाय्यकाला वीस हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरुवारी सायंकाळी करण्यात आली असून रात्री उशिरा सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

घनश्याम अंकुश मस्के असे अटक करण्यात आलेल्या माध्यमिक शिक्षण विभागातील वरिष्ठ सहाय्यकाचे नाव आहे. यातील तक्रारदार शिक्षकाची आपल्या शाळेमार्फत वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी फाईल शिक्षण विभागात आली होती. या फाईलवर शिक्षण अधिकाऱ्यांची सही करून देण्यासाठी ४० हजाराची लाचेची मागणी मस्के यांनी तक्रारदार यांच्याकडे केली होती. तडजोडीची बत्तीस हजार देण्याचे ठरले. दरम्यान तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावून लाचेच्या रकमेतील पहिला हप्ता म्हणून २० हजार रूपये घेताना दुपारी जिल्हा परिषदेच्या आवारात ही कारवाई करण्यात आली. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विमानसेवा सक्षमीकरणासाठी लक्ष देणार

**केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ; महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या भेटीप्रसंगी माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सध्या कार्यरत असलेले विमानतळ, नवीन प्रस्तावित विमानतळ यांच्या विस्ताराबरोबरच विमानसेवा व विमान मार्गांचा विस्तार करून विमानसेवांचे सक्षमीकरण करण्यावर विशेष लक्ष दिले जाईल, अशी ग्वाही केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री नामदार मुरलीधर मोहोळ यांनी दिली. महाराष्ट्रातील विविध विमानतळांच्या प्रश्नासंबंधी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मंत्री मोहोळ यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

लवकरच यासंबंधी चेंबरच्या पदाधिकाऱ्यां समवेत संयुक्त बैठक घेऊ अशी ग्वाहीही मंत्री महोदयांनी दिली. सोलापूर विमानतळ पूर्णपणे तयार असून या विमानतळावरून तात्काळ विमान सेवा सुरू करण्याची व या विमानतळाला भारतातील विमान निर्मिती उद्योगाचे जनक व सोलापूरचे सुपुत्र शेठ वालचंद हिराचंद यांचे



नाव देण्याची आग्रही मागणी ललित गांधी यांनी यावेळी केली. कोल्हापूर विमानतळावरून नवीन मार्ग सुरू करणे कोल्हापूर-दिल्ली, कोल्हापूर-जोधपुर या नवीन मार्गांची मागणी सुद्धा यावेळी सादर करण्यात आली. त्याचबरोबर धावपट्टी विस्तारीकरणाचे काम गतीने पूर्ण करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सोलापूर विमानतळावरील विमान सेवा लवकरात लवकर सुरू करू अशी ग्वाही नामदार मोहोळ यांनी यावेळी दिली. अमरावती व रत्नागिरी विमानतळ सुद्धा लवकरात लवकर सुरू करावेत असा प्रस्ताव ललित गांधी यांनी सादर केला. तसेच कोल्हापूर विमानतळाला छत्रपती राजाराम महाराज यांचे नाव देण्याच्या निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी अशी आग्रही मागणी ललित गांधी यांनी केली. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कौशल्य विकास समितीचे चेअरमन संदीप भंडारी उपस्थित होते. अशी माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे गवरनिंग कॉन्सिल सदस्य व विमानवाहतुक समिती चे को चेअरमन केतन शहा यांनी दिली.



## भारती, टिळक विद्यापीठ परीक्षेत मेहता शाळेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेचे भारती विद्यापीठ व टिळक विद्यापीठ परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणाऱ्या यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुणी शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

भारती विद्यापीठ गणित परिचय परीक्षेत सुयश फुलारी राज्यात तिसरा तर शाळेतून पहिला व टिळक विद्यापीठ परीक्षेत विद्वान गोरे शाळेतून पहिला क्रमांक पटकाविला. प्रमुख अतिथी पालक श्री.व सौ. फुलारी, श्री व सौ. गोरे तसेच शाळा समिती अध्यक्ष राजेश्री पटवर्धन, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्तविक केले. प्रमुख अतिथींचा परिचय गणेश माने यांनी करुन दिला. शाळेतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. भारती शिंदे, मयुरी दुरुगकर या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले तर आभार भारती शिंदे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### किणी येथे अर्थिंग रॉडची चोरी

**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**

किणी येथे अज्ञात चोरट्याने २० हजार सहाशे रूपयाचे आवेस्टा सोलार प्राव्हेट लि. किणी शाखेच्या दुस-या मोकळ्या जागेवरील ३८ मिमी जाडी ३ मी. लांबीचे ४ अर्थिंगचे रॉड अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना ३१ जानेवारी रोजी साडेबारा वा. पासुन ते ३ फेब्रुवारी सकाळी साडेदहा दरम्यान घडली आहे.

याबाबत उत्तर पोलिस ठाण्यात अर्जुन सिध्दाराम डोंगरे (वय २७) व्यवसाय सोलार साईट इंन्चार्ज किणी यांनी फिर्यादी दिली आहे.

# 'आयुष्मान कार्ड'मध्ये जिल्हा पिछाडीवर




**४० लाखांचे टार्गेट; आतापर्यंत १० लाख ५१ हजारांचीच नोंदणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रातील नागरिकांच्या उपचारासाठी राज्य सरकारकडून महात्मा फुले जनआरोग्य योजनेद्वारे आर्थिक मदत करण्यात येते. केंद्र सरकारनं अशाच प्रकारची योजना देशपातळीवर सुरु केली आहे.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना असं या योजनेचं नाव आहे. या योजने अंतर्गत नागरिकांना मोफत आरोग्य विमा दिला जातो. यासाठी आपल्या जिल्ह्याला ४० लाखाचे टार्गेट होते. मात्र सध्या अवघे १० लाख ५१ हजार लोकच या योजनेसाठी लाभार्थी झाले असून, जिल्हा राज्यात ३१ नंबरवर गेल्याने इतर लोकांनाही आयुष्मान कार्ड योजनेचा फायदा देण्यासाठी गतीने कामकाज सुरू करावे, अशा कडक सुचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्याने आता प्रशासनाची सर्व यंत्रणा कामाला लागली आहे. या योजनेत केंद्राकडून ६० टक्के तर राज्याकडून ४० टक्के मदत दिली जाते. या योजनेअंतर्गत वैद्यकीय उपचारांकरिता प्रति वर्ष/ प्रति कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य विमा मिळेल. आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेल्या नागरिकांनी आधार कार्ड द्वारे केवायसी करून आयुष्मान भारत योजनेचे कार्ड तयार करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने या योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला असून, वयाची ७० वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्ती देखील या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान भारत कार्ड काढणं आवश्यक असतं. शहरी आणि ग्रामीण भागात यासाठी कॅम्प लागणार असून, यामध्ये तलाठी, ग्रामसेवकांसह आपले सरकार महा-ई-सेवा केंद्रचालकांनाही समाविष्ट केले आहे.

#### ▸ लाभार्थ्यांना आरोग्यासाठी ५ लाखांपर्यंतचा मोफत खर्च

आयुष्मान भारतचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे तो लाभार्थ्यांना कॅशलेस उपचार प्रदान करतो. योजनेअंतर्गत, व्यक्ती कोणत्याही खिशातून पैसे न भरता नेटवर्क हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवांचा लाभ घेऊ शकतात. हे वैशिष्ट्य गंभीर वैद्यकीय परिस्थितीत रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांवरील आर्थिक भार लक्षणीयरीत्या कमी करते. आयुष्मान कार्ड आयुष्मान भारत योजनेंतर्गत जारी केले जाते. जे पात्र कुटुंबांना संपूर्ण भारतातील नियुक्त रुग्णालयांमध्ये मोफत आरोग्य सेवा प्राप्त करण्यास अनुमती देते. स्थलांतरित कामगार, भूमिहीन कामगार, अनौपचारिक क्षेत्रातील कामगार, वृद्ध आणि अपंग लोक, विधवा किंवा एकल महिलांच्या नेतृत्वाखालील कुटुंबे यासाठी पात्र आहेत.

#### ▸ ६ लाख कार्ड जनरेट मोडवर

जिल्ह्यातील अजून ६ लाख लोकांची आयुष्मान कार्ड लवकरच मिळण्याची शक्यता आहे. कारण या लोकांनी ऑनलाईन प्रक्रियेद्वारे आपली कार्ड तयार केली आहेत. या योजनेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी काही माहिती पॉम्पलेटही तयार केली आहे. यासाठी सर्व राशन दुकानदार, पुरवठा निरीक्षक अधिकारी, आशा वर्कर, तसेच शासकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारीही जिल्हाधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे काम करणार आहेत.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी**

### सोमवारी शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता आय.टी.आय. उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा होणार असून, सर्व आस्थापना व पात्र प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राद्वारे महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस.आर. भालचिम यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ८०० ज्येष्ठ नागरिक जाणार श्री जगन्नाथांच्या दर्शनाला

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

## ११ ते १६ फेब्रुवारीला मिळाली मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ फेब्रुवारी-**

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील ८०० ज्येष्ठ नागरिक जगन्नाथ पुरी ओरिसा येथे दर्शनासाठी दि. ११ ते १६ फेब्रुवारी रोजी जाणार असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली. दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीमध्ये श्री जगन्नाथ मंदिर, पुरी ओरिसा या ठिकाणासाठी तीर्थदर्शनाकरिता पात्र ८०० लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार सोलापूर ते श्री जगन्नाथ मंदिर, पुरी ओरिसा या ठिकाणी दि. ७ ते दि.१२ फेब्रुवारी २०२५ ऐवजी आता दि. ११ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी रोजी या कालावधीत तीर्थदर्शनास जाणेकरिता सुधारित मान्यता दिलेली आहे.

नियोजित तीर्थदर्शनाच्या यात्रेदरम्यान वैद्यकीय अधिकारी आणि पॅरामेडीकल स्टाफ (नर्स) तसेच सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सोबत असणार असून तीर्थदर्शनास जाणेकरिता रेल्वे आरक्षित करण्यात आले असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### ५० हजारांची खंडणी मागणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

पोलिस कर्मचाऱ्यास ५० हजारांची खंडणी मागणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शहर वाहतूक शाखेचे पोलिस हवालदार सुनिल चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आकाश इंगळे (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ फेब्रुवारी रोजी हवालदार चौधरी कारवाई करतानाचा व्हिडीओ आकाश इंगळे याने काढला होता. तो व्हिडीओ डिलीट करण्यासाठी ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आंबेडकर भवन येथील चहा कॅन्टीनजवळ आकाश इंगळे याने चौधरी यांच्याकडे ५० हजार रुपयांची खंडणी मागितली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.

### साखर पेठेतून दुचाकी चोरीस


**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

शहरातील साखर पेठेतून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत विशाल सुभाष चव्हाण (वय ४०, रा. मधला मारूती, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल चव्हाण यांनी त्यांची एमएच १३ डीए ३३९६ क्रमांकाची दुचाकी ही २ फेब्रुवारी रोजी सकाळी साखर पेठेतील गणेश शॉपींग सेंटर येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

### मंगळवेढा रोडवरील अपघातात एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर ते मंगळवेढा रोडवरील कामती जवळील अपघातात एकचा मृत्यू झाला. धनाजी पांडुरंग भोसले (वय ४५, रा. कामती बु., ता. मोहोळ) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. ५ फेब्रुवारी रोजी रात्री कामती येथील कटरे मंगल कार्यालयासमोर धनाजी भोसले हे चारचाकी वाहनातून येत असतना रस्ते अपघातात जखमी होऊन बेशुध्दावस्थेत मिळून आले. त्यामुळे भोसले यांना उपचारासाठी सोमनाथ भोसले याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉ. विजय सुरवसे यांनी धनाजी भोसले यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबबात सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### बल्करच्या धडकेत दोघे जखमी

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील स्वामी समर्थ सूत मिलजवळ बल्करच्या धडकेने चारचाकी वाहनातील दोघे जखमी झाले. श्रावणकुमार नारायण गायकवाड (वय ३८, रा. अफजलपूर, जि. कलबुर्गी, कर्नाटक) आणि शांतप्पा (वय ८२, रा. अफजलपूर) अशी जखमींची नावे आहेत. ५ फेब्रुवारी रोजी रात्री श्रावणकुमार व शांतप्पा हे दोघे चारचाकी वाहनातून सोलापूर ते अक्कलकोट रस्त्याने जात होते. स्वामी समर्थ सूत गिरणीजवळ समोरून येणाऱ्या बल्कर गाडने चारचाकी वाहनाला धडक दिल्याने दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### आदर्श बँक पुरस्काराचे रविवारी वितरण

**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या सन २०२१ ते २०२४ या कालावधीसाठी आर्थिक व ऑडीट वर्गाच्या आधारे असोसिएशनच्या दृष्टीने यशस्वी ठरलेल्या आदर्श बँक पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हिराचंद नेमचंद ॲम्पी थिएटर येथे दि. महाराष्ट्र अर्बन बँक्स को-ऑप. फेडरेशन लि. मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किरण जिल्हा आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी सोलापूर जिल्हयातील नागरी सहकारी बँकांतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, सेवकांनी व नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले यांनी केले आहे.

# श्री वीरतपस्वी आत्मज्योत यात्रेत भक्तीसागर

## ठिकठिकाणी भक्तीभावात स्वागत

## काशी जगद्‌गुरुंची बाळीवेस ते होटगी पदयात्रा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या ६९ व्या पुण्यतिथी भक्तीभावाने साजरी करण्यात आली. गुरुवार (दि.६) फेब्रुवारी रोजी पहाटे २.१० मि. उत्तर कसबा येथील होटगी मठात चिटगुप्पाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते आत्मज्योत प्रज्वलित करून वीर तपस्वीजींना श्रद्धांजली समर्पण करण्यात आली. यावेळी वडांगळीचे पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी, मागणगिरीचे विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी व चिटगुप्पाचे उत्तराधिकारी शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. तद्‌नंतर पहाटे ५.३० वाजता बृहन्मठाचे अध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांनी आपल्या शिरावर श्री वीरतपस्वी आत्मज्योत धारण केले.

यावेळी उपस्थित भाविकांनी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महाराज की जय, तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महाराज की जय च्या घोषणा दिल्या. त्यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुकीचा सर्वात पुढे ट्रॅक्टरवर श्री वीरतपस्वीजींची प्रतिमा, हलगी, बँड, विविध गावचे पुरवंत श्री वीरतपस्वी यांची पालखी, विद्यार्थ्यांचे पथक, बैलजोडी व रथ यासह ही मिरवणूक मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस, चाटी गल्ली, मंगळवार पेठ, मधला मारुती, विजापूर वेस, गुरुभेट, सात रस्ता, गांधीनगर,होटगी नाका, मजरेवाडी या मार्गाने ही मिरवणूक निघाली. दरम्यान, मिरवणूक मजरेवाडी (विसावा) येथे आल्यानंतर मजरेवाडीतील सुवासिनी डोक्यावर जलकुंभ आणून भक्तीभावाने आत्मज्योतीचे स्वागत केले. मिरवणुकीच्या वाटेवर ठिकठिकाणी भक्तानी रांगोळीच्या व फुलांच्या पायघड्या घालून मिरवणुकीचे स्वागत करीत होते व आत्मज्योत आपल्या शिरावर घेत होते .मिरवणूक होटगी येथे पोहोचल्यानंतर ग्रामस्थांनी ज्योतीचे स्वागत करून गावातून भव्य मिरवणूक काढली. मठात आत्मज्योतीचे आगमन झाल्यानंतर महामंगलारती होऊन श्री वीरतपस्वी आत्मज्योत पदयात्रेची सांगता करण्यात आली. यावेळी शिवाचार्यांच्या उपस्थितीमध्ये धर्मसभा झाली. सायंकाळी ४ वाजता रथोत्सव कार्यक्रम पार पाडला. भक्तानी पदयात्रेत विविध ठिकाणी भाविकांना प्रसादाचे वाटप केले. मिरवणुकीत नागणसूरचे श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, शिखर शिंगणापूरचे सिद्धलिंग शिवाचार्य महास्वामीजी, सिद्धनकेरीचे राचोटेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, होटगी, बोरामणी, धोत्री, दर्गनहळी लिबिचिंचोळी, बोरेगाव, सातनदुधनी, मुस्ती, कुंभारी, खानापूर, सरसंबा येथील भक्त व संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक- मुख्याध्यापिका, शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी या मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. होटगी येथे सर्व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### रांगोळीच्या पायघड्या

बाळीवेस ते मौजे होटगी गावापर्यंत रथोत्सव मार्गावर भाविकांनी आत्मज्योतीचे भक्तीभावाने व उत्साह पूर्ण वातावरणात स्वागत केले. यावेळी श्री सिद्धेश्वर कारखान्याच्या वतीने उसाचा रस देण्यात आला. कला संगम फाउंडेशनच्या वतीने बाळीवेस ते गुरुभेट पर्यंत रांगोळीच्या सुंदर पायघड्या घालण्यात आल्या होत्या. यामध्ये रूपाली कुताटे, रूपाली भोगडे, अश्विनी नागणसूरे, श्रावणी दर्गो-पाटील, संध्या वैद्य, रक्षा रायकर, अविनाश जिंकेरी व त्यांच्या सहकार्यानी सुंदर रांगोळी काढून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संजय भोगडे व दासोह स्वामी यांनी प्रतिवर्षाप्रमाणे मिरवणुकीत भक्तांना गंध लावण्याचे काम केले. वीरतपस्वी स्काऊट पथक एमआयडीसीच्या विद्यार्थ्यांनी मिरवणूक मार्गावरील स्वच्छतेचे काम केले.

# दहावीचे ६५ हजार, ५५ हजार बारावीचे परीक्षार्थी

## कॉपीमुक्त अभियानासाठी राबवणार विशेष अभियान

## संवेदनशील केंद्रांवर कलम १४४ करणार लागू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेचा कालावधी लवकरच सुरू होणार आहे. फेब्रुवारी शेवटचा आठवडा आणि मार्च पहिला आठवडा हा परीक्षांचा आठवडा मानला जातो. याच आठवड्यात बोर्डाच्या परीक्षा संपन्न होत आहेत. मंगळवार( दि.११) फेब्रुवारी पासून बारावी बोर्ड परीक्षा सुरू होणार आहे. या परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यातून ५५ हजार ८७९ इतक्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. तर इयत्ता दहावीच्या परीक्षेचा शुक्रवार दिनांक ११ फेब्रुवारी पासून प्रारंभ होत आहे. यासाठी सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ६५ हजार ५८५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. दोन्ही बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होण्यासाठी जिल्हा प्रशासन कडक अंमलबजावणी करणार आहे.

दरम्यान, दहावी आणि बारावी परीक्षेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि शिक्षणाधिकारी सचिन जगताप उपस्थित होते. राज्याच्या मुख्य सचिवांनी तीन फेब्रुवारी रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेऊ नको कॉपीमुक्त अभियानाची कडक बजावणी करण्याचे आदेश दिले होते. त्यासाठी आवश्यक यंत्रणांचा वापर करण्याची सूचना केली होती त्यानुसार ११ फेब्रुवारी ते १८ मार्च यादरम्यान बारावी तर २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत दहावी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. बारावी परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यात १२१ व दहावी परीक्षेसाठी १८४ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आली असून या दोन्ही परीक्षांसाठी गटशिक्षणाधिकारी व विस्ताराधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या परीक्षा केंद्रांसाठी केंद्र संचालक नियुक्त करण्यात आले आहेत. बारावीसाठी ३४ व दहावीसाठी ४७ संवेदनशील केंद्रे असल्याची माहिती शिक्षणाधिकारी जगताप यांनी दिली या केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त व बैठे पथक नेमण्यात येणार आहे तसेच परीक्षा केंद्रांच्या परिसरात कलम १४४ लागू करण्यात येणार आहे ज्या ठिकाणी कॉपी चालते त्या संवेदनशील केंद्रांवर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून व्हिडिओ ग्राफीसाठी व्हिडिओग्राफर उपलब्ध करण्यात येणार आहे असेही त्यांनी सांगितले.

**बारावी परीक्षा**

* विद्यार्थी संख्या - ५५,८७९
* परीक्षा केंद्रे - १२१
* संवेदनशील केंद्रे - ३४
* परिरक्षक केंद्रे - ११

**दहावी परीक्षा**

* विद्यार्थी संख्या - ६५,५८५
* परीक्षा केंद्रे - १८४
* संवेदनशील केंद्रे - ४७
* परिरक्षक केंद्रे - १५

# धूम स्टाईलने १२ ग्रॅमचे गंठण चोरले

## मड्डी वस्तीजवळील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी -**

शहरातील मड्डी वस्तीजवळ मोटारसायकलवरून घराकडे जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील १२ ग्रॅमचे गंठण दुचाकीवरून आलेल्या चोरट्याने धूम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेले. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली.

याबाबत रक्षा गोपाळ भूमकर (वय २९, रा. एसबीआय कॉलनी, भवानी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रक्षा भूमकर या ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास त्यांचा मुलगा आयाश यास जाजू क्लास येथून घेऊन दुचाकीवरून घराकडे जात होत्या. त्यावेळी मड्डी वस्ती येथील प्रभाकर झाड यांच्या घरासमोर आल्यानंतर पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोघां चोरट्यांपैकी पाठीमागे बसलेल्या चोरट्याने रक्षा भूमकर यांच्या गळ्यातील ४८ हजार रुपये किंमतीचे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण हिसका मारून जबरदस्तीने चोरून नेले. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक महाडीक पुढील तपास करीत आहेत.



# विनोदवीर प्रणित मोरेला मारहाण करणाऱ्यांवर कारवाई

## ११ जणांविरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी -**

मराठमोळा विनोदवीर प्रणित मोरेला मारहाण करण्यात आली होती. या मारहाणप्रकरणी तन्वीर शेख आणि अन्य १० जणांविरोधात सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रणित मोरेचा सोलापूर पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला आहे.

प्रणित मोरेला मारहाण करणाऱ्या १० जणांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११५, १९१, १८९ आणि १९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करून पुढील कारवाई करण्यात येईल असं आश्वासन पोलिसांकडून देण्यात आले आहे. 'स्काय फोर्स' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या वीर पहारिया या अभिनेत्यावर प्रणित मोरेने विनोद केला होता. त्यावरून त्याला मारहाण करण्यात आली होती.

वीर पहारिया हा माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा नातू आहे. प्रणित मोरेने वीर पहारियावर सोलापूरमधील एका स्टँडअप कॉमेडी शोदरम्यान विनोद केल्यामुळे संतप्त झालेल्या वीरच्या चाहत्यांनी त्याला मारहाण केली होती. वीर पहारियाला ही घटना समजताच त्याने तात्काळ इन्स्टाग्राम पोस्ट लिहून खंत व्यक्त केली होती.

# सद्‌गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराजांचा १३ फेब्रुवारीपासून पुण्यतिथी महोत्सव

## १५ फेब्रुवारी रोजी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव गुरुवार दि.१३ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. त्यानिमित्त सम्राट चौक येथील श्री सद्‌गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री सद्‌गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री सद्‌गुरु प्रभाकर स्वामी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे गुरुगीता पारायण करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ७ ते १३ फेब्रुवारीपर्यंत दररोज सकाळी ८ ते ९ या वेळेत गुरुगीता पारायण होईल. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते २.३० वाजेपर्यंत श्री प्रभाकर अनुसंधान या पोथीचे सामूहिक पारायण व महाप्रसाद वाटप होणार आहे. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ६.३० दरम्यान वारकरी विद्यालयातील बाल वारकऱ्यांचे मृदंग वादन होईल. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता गोपूजन व मंदिरामध्ये पौर्णिमेनिमित्त पालखी प्रदक्षिणा होणार आहे. गुरुवार दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गुरुगीता पारायण समाप्ती व श्री प्रभाकर स्वामी महाराजांच्या पिंडीस रुद्राभिषेक व तर्पण विधी होईल. त्याचदिवशी रात्री १०.४५ वाजता सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त विजय कबाडे उपस्थित राहणार आहेत. शनिवार दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिरापासून मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीचे उद्‌घाटन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते होईल. सम्राट चौक येथून निघालेली ही मिरवणूक पारंपारिक मार्गावरून रात्री ९ वाजता पुन्हा मंदिरात विसर्जित होणार आहे. यावेळी ट्रस्टी उदय वैद्य, वसंत बंडगर, वामन वाघचौरे, सुभाष बद्दूरकर, भजनी मंडळाचे प्रकाश कोथिंबीरे, व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### पंढरपूर आगारात प्रवासी दिन साजरा

**पंढरपूर, दि.६ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे पंढरपूर बस स्थानकावर रथसप्तमी हा दिवस राष्ट्रीय प्रवासी दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी आगार प्रमुख योगेश लिंगायत होते. सहाय्यक वाहतूक अधीक्षक नवनाथ दळवे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक पंढरपूर तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये यांनी केले. ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास मागण्या मांडल्या. या उत्कृष्ट प्रवासी सेवेबद्दल पंढरपूर आगाराचे चालक पांडुरंग साहेबराव पवार ४७१, वाहक ज्ञानेश्वरी भागवत पाटील १२६९२४ यांचा तसेच वरिष्ठ सहाय्यक समाधान नाना मेटकरी यांच्या प्रशासकीय कामाबद्दल शाल, सन्मानचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे गौरव करण्यात आला. यावेळी ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव सुहास निकते, तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, तालुका सदस्य सचिन कोळेकर, शाम तापडिया, राजू ऐनापुरे, पारखे, स्थानक प्रमुख अंकुश सरगर उपस्थित होते. आगार प्रमुख योगेश लिंगायत यांनी नवीन बस मिळविण्यासाठी प्रयत्न चालू असून, प्रवाशांना चांगली सेवा देणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन नवनाथ दळवे यांनी केले तर आभार सागर शिंदे यांनी मानले. यासाठी रा. प. महामंडळाचे सुमित भिंगे, अप्पा अष्टेकर, विजया भूमकर आदींनी परिश्रम घेतले.



### वटवृक्ष मंदिरातील सत्कार जीवनातील मोठा गौरव : आ. हिरे

**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**

सर्वसामान्य स्वामी भक्तांप्रमाणे मीही स्वामी भक्त आहे. याच स्वामी भक्तीच्या माध्यमातून अक्कलकोटला आल्यानंतर समर्थांनी स्वामी दर्शनाची संधी वेळोवेळी देत रहावी. या माध्यमातून स्वामी कृपेचे वरदहस्त माझ्या व माझ्या कुटुंबीयांवर कायम रहावी याकरिता आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामी समर्थांचे दर्शन घेतले आहे. स्वामींच्या दर्शनानंतर लाभलेला तथा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त समितीच्या वतीने पुरोहितांच्या हस्ते झालेला सत्कार म्हणजे जीवनातील मोठा गौरव असल्याचे मनोगत नाशिक पुर्वचे आमदार सरोजिनी हिरे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी आमदार सरोजिनी हिरे बोलत होते.याप्रसंगी मिलन कत्याणशेट्टी, व्यंकटेश पुजारी, बालाजी माने, गिरीश पवार, विपुल जाधव, रवी मलवे, श्रीकांत मलवे उपस्थित होते.

### पंढरीत माघी यात्रेनिमित्त जनावर बाजार, प्रदर्शनाचे आयोजन

**पंढरपूर, दि. ६ फेब्रुवारी-**

माघ यात्रा कालावधीत ६ ते ११ फेब्रुवारीअखेर वाखरी पालखी तळ येथे जनावरांचा बाजार भरणार आहे. या बाजारामध्ये जनावरे प्रदर्शनदेखील बाजार समितीच्या वतीने भरविण्यात येणार आहे. दरम्यान सर्व शेतकरी बंधू, पशुपालक, जनावरांचे व्यापारी व सर्व संबंधित घटकांनी माघ यात्रा जनावराच्या बाजारात आपली निरोगी जनावरे खरेदी-विक्रीसाठी आणावीत. तसेच जातीवंत खिलार जनावंरासाठी जनावरे प्रदर्शन भरविले जाणार असून प्रदर्शनामध्ये भाग घेण्यासाठी ७ ते ८ फेब्रुवारीअखेर नाव नोंदणी करावी. त्याशिवाय प्रदर्शनामध्ये भाग घेता येणार नाही. च रविवारी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वा. निवड होणार असून ९ फेब्रुवारी रोजी सांय. ५ वा. माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या हस्ते निवड झालेल्या जनावरांचे बक्षीस वितरण होणार असल्याचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजूबापू गावडे यांनी सांगितले.



### रविराज उद्योग समुहातर्फे हळदी-कुंकू कार्यक्रम

**अणदूर, दि. ६ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील रविराज उद्योग समुहाकडून आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या साठ महिलांना हळदी-कुंकू कार्यक्रम घेऊन त्यांना दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचे वाण भेट देण्यात आले. यावेळी आशा गटप्रवर्तिका राजश्री चव्हाण व अनुराधा पापडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या अणदूर बीटमधील आशा कार्यकर्ती, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत आरोग्य सेविका, उमेद गटाच्या कार्यकर्त्यांसह शंभर महिला या हळदी-कुंकू कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे पर्यवेक्षक डी. आर. कदम, रविराज उद्योग समुहाचे प्रमुख माणिक निर्मळे, व्यवस्थापक गीरजाप्पा मार्तंडे, संजय काळे, विजयकुमार मार्तंडे, पैंगबर मकानदार, बाळासाहेब चव्हाण, तिप्पाबाई काळे, शुभांगी मार्तंडे, जगदेवी निर्मळे, वैष्णवी काळे, आरती मार्तंडे, मानसी निर्मळे उपस्थित होते.

### अक्कलकोट बसस्थानकात प्रवाशांना तिळगुळ वाटप कार्यक्रम

**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत व बसस्थानकातर्फे रथसप्तमीनिमित्त तिळगुळ वाटप व गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. आगार प्रमुख रणजित साळवे, वाहतूक नियंत्रक श्रीमंत खसकी, अभिजित लोके, प्रशांत केसकर, अभय शेटे, शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, राजू माने, बागवान, अनिल पाटील, गणेश पवार, शिवकुमार हत्तरसंग, महेश गायकवाड उपस्थित होते.

# आठवडा बाजारात वजनासाठी दगडांचा वापर

**ग्राहकांची होतेय फसवणूक**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ६ फेब्रुवारी-**

ग्रामीण भागातील आठवडा बाजारात आजही मोठ्या प्रमाणात वजनासाठी दगड व फरशींचा वापर करण्यात येत आहे. तंत्रज्ञान व संगणकाच्या युगातही बाजारात वजनासाठी दगड वापरण्यात येत असल्यामुळे ग्राहकांची लूट होत आहे. याबाबत वजन मापक विभागाकडे तक्रार केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहे.



दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप, कंदलगाव, भंडारकवठे, निंबर्गी, विंचूर, टाकळी, बरूर या गावांच्या आठवडा बाजारात धान्य, वांगी, दोडका, घेवडा, गाजर अशा भाजीपाला व फळ विक्रीसाठी वजन काट्यांमध्ये दगड व फरशीचा तुकडा वापरण्यात येत आहे. या वजनामुळे ग्राहकांना कमी वजनाचे वस्तू विकत घ्यावे लागत आहे. सध्या संगणकाचे युग असताना विक्रेते मात्र व्यापाऱ्यांकडून वजनासाठी जुन्या काळातील दगड व फरशांचा वापर करण्यात येत असल्यामुळे ग्राहकांची आर्थिक लूट होत आहे.

ग्रामीण भागामध्ये सर्वच बाजारांमध्ये अशा प्रकारचा दगड व फरश्यांचा वजनासाठी वापर होत आहे. शिवाय भुसार गहू, ज्वारी, हरभरा, उडीद, भुईमूग, मूग, मटकी या धान्यांच्या व्यवहारातही शेरमध्ये भेसळ करण्यात येत आहे. विक्री व खरेदीसाठी वेगवेगळे वजनमाप वापरण्यात येत असल्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत आहे. याबाबत अन्न व भेसळ विभागाकडे विचारणा केली असता अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. वरिष्ठ कार्यालयाने आठवडा बाजारात धाड टाकून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच जुन्या काळातील वजनकाटे जप्त करून दगड व फरशी वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**दगड, फरशीमुळे वजन भरते कमी**

संगणकाच्या युगात इलेक्ट्रिक वजन काट्यांमुळे योग्य वजनाचे वस्तू खरेदी व विक्री होते. मात्र मंद्रुपसह इतर आठवडा बाजारात वजन काट्यासाठी दगड व फरश्यांचा वापर होत असल्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत आहे. म्हणून फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात यावे.

**- इरण्णा म्हेत्रे, शेतकरी, मंद्रुप**

# ४२ दुचाकी मूळ मालकांना सुपूर्द

**पंढरपूर तालुका पोलिसांची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ फेब्रुवारी-**



येथील तालुका पोलिसांनी मागील एक महिन्यापासून पोलीस ठाणे येथे जप्त असलेले पुण्यातील व बेवारस मोटरसायकल मालकांचा शोध घेऊन जिल्ह्यातील व जिल्ह्याच्या बाहेरील असलेल्या मोटरसायकल मालकांना पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे बोलावून एकूण ४२ मोटरसायकली संबंधित मोटरसायकल मालकाच्या ताब्यामध्ये सुपूर्तनामवर बॉण्ड घेऊन देण्यात आल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी दिली.

सदरच्या मोटरसायकली मागील अनेक वर्षांपासून पोलीस स्टेशन येथे पडून होत्या. याबाबत पाठपुरावा करून संबंधित मोटरसायकल मालकाचा जिल्ह्यात व जिल्हा बाहेर आरटीओ कार्यालयाकडून शोध घेऊन सविस्तर माहिती तयार करून एकूण ४२ मोटरसायकली संबंधित मोटरसायकल मालकाच्या ताब्यामध्ये सुपूर्द नावे देण्यात आलेले आहेत. विशेष मोहीम पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षण टी. वाय. मुजावर, ए. एस. आय. मनरे, स्वप्निल वाडदेकर, पोलीस कॉन्स्टेबल विजयकुमार आवटी, पोलीस कॉन्स्टेबल खेडकर, पोलीस कॉन्स्टेबल नदाफ आणि चाटे यांच्या पथकाने केली.

# मंगळवेढा तालुक्यात बेकायदा शस्त्र साठ्यावर छापा

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; १ लाख ५३ हजार ८०० रुपये किंमतीची शस्त्रे जप्त, तिघांविरुध्द गुन्हे दाखल**



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ५ फेब्रुवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील जंगलगी येथे सोलापूर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून बेकायदेशीर १ लाख ५३ हजार ८०० रुपये किमतीची शस्त्रे जप्त करून फाईक मुस्ताक कळमबेंकर (वय ४६, रा. मिल्लत नगर, रत्नागिरी), निगोंडा हणमंत बिराजदार (वय ३७), राजकुमार हणमंत बिराजदार (दोघे रा. जंगलगी) या तिघांविरूध्द भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघा आरोपींना गजाआड केले आहे.

सोलापूरच्या स्थानिक गुन्हे शाखेला मंगळवेढ्यातील जंगलगी येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीररित्या शस्त्रे ठेवली असल्याची गोपनीय माहिती उपविभागीय पोलिस कार्यालय, मंगळवेढा यांच्याकडून मिळताच सदर पथक खात्री करण्यासाठी मंगळवेढयात दाखल झाले. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंगळवेढ्याचे डीवायएसपी विक्रांत गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक विशाल वायकर, पोलिस निरिक्षक सुरेश निंबाळकर, मंगळवेढ्याचे पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली या पथकाने सदर ठिकाणी ५ फेब्रुवारी रोजी दुपारी २.४८ वा. छापा टाकून देशी बनावटीचे एक गावठी पिस्टल, ५ जीवंत काडतुसे मिळून आली. तसेच आरोपी फाईक कळमबेंकर व निगोंडा बिराजदार यांची अंगझडती घेतली असता आरोपीच्या कमरेला डाव्या बाजूस पँटीत खोचलेली एक देशी बनावटीची पिस्टल मॅगझीनसह व पँटच्या उजव्या खिशातून ५ जीवंत काडतुसे व मोबाईल हँडसेट मिळून आला. चौकशीत चार देशी बनावटीची पिस्तूल व काडतुसापैकी एक पिस्टल व ५ जीवंत काडतुसे कळंबा जेलमध्ये असताना ओळख झालेला मित्र फाईकला दिले होते. राजकुमार बिराजदार यांच्या शेतात मुक्कामी होता. फिर्याद हवालदार प्रकाश कारटकर यांनी दिली. ही कामगिरी पोलिस उपनिरिक्षक रवीराज कांबळे, हवालदार विरेश कलशेट्टी, हवालदार अश्विनी गोटे, पोलिस अंमलदार अजय वाघमारे, राहुल दोरकर, हरीदास थोरात, चालक सुनिल पवार आदींनी केली आहे.

# सहकार महर्षि अभियांत्रिकीचे हिवाळी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुबई यांनी घेतलेल्या अभियांत्रिकी पदविका हिवाळी परीक्षा २०२४ मध्ये सहकार महर्षि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उतुंग यश संपादन केल्याचे संस्थेचे सचिव राजेंद्र चौगुले व प्राचार्य डॉ. प्रविण ढवळे यांनी सांगितले.

कॉम्प्युटर विभाग- अब्दाल शेख (९३.८९) प्रथम, आदित्य बचुटे (९१.८९) द्वितीय, साक्षी येवले (९०.७८) तृतीय, . कॉम्प्युटर विभागातील द्वितीय वर्ष-श्रद्धा पेटकर (९६.००) प्रथम, स्वरांजली माने-देशमुख (९२.९४) द्वितीय, स्नेहा माने-देशमुख (८७.७७) तृतीय. कॉम्प्युटर विभाग प्रथम वर्ष- महेविश शेख (८५.८८) प्रथम, अप्पासाहेब तलवार (८५.२९) द्वितीय, धनश्री माने (८३.४१) तृतीय. सिव्हिल विभाग अंतिम वर्ष- वर्षाराणी क्षीरसागर (८३.६०) प्रथम, प्रज्वल जगताप (८२.८०) द्वितीय, ऋतुजा डांगे (७७.८०) तृतीय. सिव्हिल विभाग द्वितीय वर्ष- जयराज भिंगारदिवे (८३.७७) प्रथम, रामकृष्ण गायकवाड (७२.९४) द्वितीय, श्रावणी साठे (७२.५९) तृतीय. सिव्हिल विभाग प्रथम-धीरज वीरकर (७८.९४) प्रथम, श्रुष्टी भोंग (७६.५९) द्वितीय, सोनाली करगळ (७६.३५) तृतीय. मेकूनिकल विभाग अंतिम वर्ष-गायत्री माने (८६.१९) प्रथम, प्रणव जाधव (८५.३३) द्वितीय, दर्शन मोरे (८०.००) तृतीय, मकॅनिकल विभाग द्वितीय वर्ष-शंभूराजे क्षीरसागर (८१.२२) प्रथम, क्रांती ऐकतपुरे (८०.७८) द्वितीय, शहीद मुलाणी (७६.००) तृतीय, मेकॅनिकल विभाग प्रथम वर्ष- रितेश वाघ (८१.५३) प्रथम, लक्ष्मी चोपडे (७७.७६) द्वितीय, वेदांत निकम (७६.८२) तृतीय. इलेक्ट्रिकल विभाग अंतिम वर्ष- संभाजी भंडलकर (८९.००) प्रथम, प्रसन्न मुळे (८८.९०) द्वितीय, यश जावळे (८५.१०) तृतीय, इलेक्ट्रिकल विभाग द्वितीय वर्ष- आदित्य सालगुडे-पाटील (८८.८२) प्रथम, वैष्णव बोरडे (८४.४७) द्वितीय, रामहरी निकम (८२.५९) तृतीय. इलेक्ट्रिकल विभाग प्रथम वर्ष- अनिकेत धानोरकर (८३.७६.) प्रथम, गौरी जगताप (८१.४१) द्वितीय, तनिष्का काळे (८०.८२) तृतीय क्रमांक मिळवला आहे. कॉम्प्युटर विभागातील अंतिम वर्षातील अभियांत्रिकीच्या ४७ विद्यार्थ्यांपैकी ४५ विद्यार्थांना विशेष श्रेणी मिळाली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, महाविद्यालय विकास समिती अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे सचिव राजेंद्र चौगुले, प्राचार्य डॉ. प्रविण ढवळे, कार्यालयीन अधीक्षक शब्बीर शेख यांनी अभिनंदन केले.



# सांगली अर्बन बँकेच्या शिबिरात ५७६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ६ फेब्रुवारी-**

सांगली अर्बन को. ऑप. बँकेच्या ९० वा वर्धापन दिनानिमित्त रथसप्तमी दिवशी पानसुपारी, महिलांसाठी हळदी-कुंकू, रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रम घेण्यात आले. रक्तदान शिबिरात ५७६ जणांनी रक्तदान केले. हळदी-कुंकू समारंभात ४,४०० महिला सहभागी झाल्या होत्या.

यावेळी गुरुनाथ कोटणीस महाराज, दीपक महाराज केळकर, गणेशराव गाडगीळ, आ. सुधीर गाडगीळ, श्रीपाद दाते, मंजिरी सुधीर गाडगीळ, स्मिता घेवारे, रा. स्व. संघाचे जिल्हा संघचालक सुधीर चापोरकर, प्रा. सुनीलराव कुलकर्णी, रमेश कोटीभास्कर, राजाभाऊ पडसलगीकर, माजी संचालक प्रकाश बिरजे, अनिल लोकरे, रमेश चव्हाण, ॲड. गद्रे, श्रीकांत तारळेकर, प्रफुल्ल तारळेकर, सचिन पाटील, अमोल शेरीकर, चंद्रकांत जाधव, संजय डोडिया, राजेंद्र देवल, नारायण खाडिलकर, मुकुंद करंदीकर, माजी नगरसेवक हरिदास पाटील, माजी नगरसेविका उर्मिला बेलवलकर, डॉ. प्रसाद केळकर, अजित सूर्यवंशी, नीलिमा तावरे पाटील, बाळासाहेब गायकवाड, शाखा सल्लागार जगदीश कालगांवकर, रामकृष्ण चितळे, गुरुनाथ कुलकर्णी, एलआयसीचे झोनल व्यवस्थापक संजय खत्री, मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शुरन्सचे विनोद कुलकर्णी, लक्ष्मी महिला सहकारी बँकचे जनरल मॅनेजर माळी, श्रीवल्लभ कुलकर्णी, बँकेचे माजी कर्मचारी संजीव पुराणिक, दिगंबर जोशी, अशोक तील्याळकर, बँकेचे उपाध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, संचालक सीए अनंत मानवी, एच. वाय. पाटील, संजय धामणगांवकर, सागर घोंगडे, सीए सागर फडके, संजय पाटील, रणजीत चव्हाण, कालिदास हरिदास, रविंद्र भाकरे, मनोज कोरडे, अश्विनी आठवले, स्वाती करंदीकर, व्यवस्थापन मंडळ सदस्य अशोक सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर, उपसरव्यवस्थापक आनंद एकबोटे आदी उपस्थित होते.

# पिलीव परिसरात आंब्याचा मोहोर बहरला

**यंदा भरपूर फळ; निसर्गाची शेवटपर्यंत साथ आवश्यक**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ६ फेब्रुवारी-**

यंदा पोषक वातावरणामुळे आंब्याला प्रचंड मोहोर बहरला आहे. यामुळे यंदा फळांचा राजा मुबलक प्रमाणात उपलब्ध होईल अशी सध्या तरी अपेक्षा आहे.

शिशिर ऋतुत पानांची गळती होते तर हिवाळ्यात मोहोर निघतो. यंदा कधी नव्हे तो ग्रामीण भागातील आंब्याला प्रचंड



मोहोर आला आहे. झाडे मोहोरांनी अक्षरशः लपटलेली आहेत. यंदा तशी रोगराई नाही. पोषक वातावरणामुळे आंब्याला प्रचंड मोहोर आहे. यामुळे यंदा बाजारात भरपूर आंबे येणार हे जवळपास निश्चित आहे. फक्त शेवटपर्यंत नैसर्गिक आपत्ती येऊ नये एवढीच माफक अपेक्षा आहे. कारण दरवर्षी पावसाळा किंवा अवकाळी पावसामुळे आंब्याचे प्रचंड नुकसान होते. तेवढे न झाल्यास यंदा बाजारात आंबा स्वस्त दरात उपलब्ध होईल हे नक्की आहे. मुलांच्या शाळेला सुट्टी लागण्याचा वेळ आणी मामाच्या गावाला जायचं वेळ ही प्रथा अक्षरशः बंद पडत आली आहे. पण यंदाच्या हंगामात ही प्रथा पुन्हा सुरु होईल.

# श्रीपूरमध्ये गोंदवलेकर महाराज जन्मोत्सवाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ६ फेब्रुवारी-**



श्रीपूर येथे श्रीराम भक्त मंडळाच्या माध्यमातून शुकवारी ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा जन्मोत्सव हनुमान मंदिर येथे साजरा करण्यात येत असल्याची माहिती हरीभाऊ कुलकर्णी यांनी दिली.

याप्रसंगी हरी वसेकर, तुकाराम केसकर, बापूराव मोकाशी उपस्थित होते.

तीन दिवसीय होत असलेल्या या महोत्सवात शुक्रवारी ७ फेब्रुवारी रोजी स्मिता आजेगांवकर (पुणे ) यांचे नारदीय किर्तन, शनिवारी ८ फेब्रुवारी श्रीराम मुळे यांचे प्रवचन होणार आहे. हे दोन्ही कार्यक्रम संध्या ७ ते ९ यावेळेत होणार आहेत. रविवारी ९ फेब्रुवारी सकाळी ९.४० वा. गुलाल व पुष्पवृष्टी होणार आहे. सकाळी १० ते १२ चंदशेखर शंकर ब्रह्मे पुणे यांचे जन्मोत्सवाचे कीर्तन, महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

# अकलूजमध्ये पाहायला मिळणार बैलगाडी शर्यतीचा थरार

**महाराष्ट्रातील सर्वात मोठी स्पर्धा; महिलांनाही पाहायला मिळणार बैलगाडी शर्यत**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ फेब्रुवारी-**

बैलगाडा चालक-मालक संघटना व महाराष्ट्र शासनाच्या नियमांना अनुसरून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विजय गणेशोत्सव ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्रातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यतीचे आयोजन अकलूज येथे शुक्रवारी ७ फेब्रुवारी रोजी करण्यात आले असून या बैलगाडी शर्यतीचा थरार अनुभवयास मिळणार आहे. यासाठी राज्यात पहिल्यांदाच महिलांनादेखील कुस्ती पाहण्यासाठी स्वतंत्र आसन व्यवस्था केल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

शुक्रवारी ७ फेब्रुवारी रोजी अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलाच्या समोर असणाऱ्या भव्य मैदानात या बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून संयोजन समिती या मैदानावर जय्यत तयारी करताना दिसत आहे. भव्य दिव्य व महाराष्ट्रात इतके मोठे मैदान असणाऱ्या ठिकाणी स्पर्धा होत असल्याने संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या शर्यतीमध्ये स्पर्धक सहभागी होणार असून लोकांची उत्सुकता शिगेला पोहोचलेली दिसत आहे. या मैदानाचे वैशिष्ट्ये म्हणजे या मैदानावर पुरुषांना व महिलांना स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून महाराष्ट्रात पहिल्यांदाच महिलांना बैलगाडी शर्यतीचा थरार अनुभवयास मिळणार आहे. यावेळी सहकार महर्षी कारखान्याचे संचालक भीमराव काळे, ॲड. नितीन खराडे, गणेश काळे, बैलगाडा शर्यत हिंद केसरी ड्रायव्हर चिवळा, वसुंधरा देवडीकर, श्रीकांत राऊत, शेख, संतोष माने आदी मान्यवरासह श्री विजय गणेशोत्सव ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



**विजयी स्पर्धकांना मोठी बक्षिसे मिळणार**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी पूर्वीच्या काळी बैलगाडी शर्यतीच्या स्पर्धा भरवल्या होत्या. मात्र तद्नंतर महाराष्ट्र शासनाच्या काही अटी नियमानुसार त्या बंद झाल्या होत्या. मात्र त्या पुन्हा चालू करावयात या माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार या स्पर्धा चालू करण्यात आल्या असून भव्य दिव्य बक्षिसांच्या माध्यमातून या स्पर्धा पार पडणार आहेत, असे मदनसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांचा कामगार सेनेतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि. ६ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा व अक्कलकोट तालुका शिवसेना कामगार सेनेकडून शिवसेनेचे खासदार संसदरत्न डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांचा श्री स्वामी समर्थांची प्रतिमा, शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अक्कलकोट कामगार सेना तालुकाध्यक्ष स्वामीनाथ हेगडे, शिवसेना महिला आघाडी शहर प्रमुख वैशाली हावनूर, कामगार सेना जिल्हाप्रमुख साहेबण्णा तेगेळ्ळी व शिवसैनिक, पदाधिकारी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### महाराष्ट्र आयुर्वेद महोत्सव उत्साहात

**मंगळवेढा, दि. ६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र आयुर्वेदिक रिटेलर्स असोसिएशनतर्फे शुभारंभ लॉन्स, एरंडवणे पुणे येथे तीन दिवसीय आयुर्वेदिक महासंमेलन थाटामाटातपार पडले.यावेळी मंगळवेढ्याचे आयुर्वेदाभ्यासक रत्नाकर वेदपाठक, यांचाही समावेश होता. उद्घाटन आ. भीमराव तापकिर यांनी तर स्टॉल्सचे उद्घाटन बैद्यनाथ कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर सुरेश शर्मा यांनी केले. यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाचे माजी सहाय्यक आयुक्त दिनेश खिंवसरा, डॉ. पराग कालकर, पुणे विदयापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, भारत सरकार आयुष मंत्रालयाचे रिजनल डायरेक्टर डॉ. दिगंबर मोकाट, एमएएमएचे प्रेसिडेंट डॉ. रामदास कुटे, डॉ. मिलिंद भोई, योग थेरपिस्ट प्रांजली फडणवीस, धूतपापेश्वरचे एम. डी. रणजीत पुराणिक, एफडीएचे ज्वाईन कमिशनर हुकरे यांनी मार्गदर्शन केले. सांगता समारंभात आयुष मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रताराव जाधव, वैद्यकिय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी मार्गदर्शन केले. यासाठी एआरए महाराष्ट्रचे अध्यक्ष शेखर खोले, सचिव मुरलीधर कातोरे, अभय देव, जालिंदर देशमुख, मनोज गुगळे, तुषार अक्कलकोटकर, डॉ. श्रीपाद महामुनी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. भाग्यश्री कश्यप यांनी केले.



### मोहोळ येथे समूह वाचन, हळदी-कुंकू कार्यक्रम

**मोहोळ, दि. ६ फेब्रुवारी-**


व्यापारी मोफत वाचनालय मोहोळच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अंतर्गत समूह वाचन व हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न झाला. वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. सुधीर जोशी यांनी मार्गदर्शन केले. रजनी गायकवाड, डॉ. रेश्मा कुर्डे, जोत्सना जोशी, डॉ. स्नेहलता वाले, लक्ष्मी तावसकर, सीमा पाटील, कवियत्री विजया देशपांडे, राजन घाडगे यांनी गीत सादर केले. अंगणवाडी सेविका रजनी गायकवाड यांना सावित्रीबाई फुले व जिजामाता समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सहाय्यक ग्रंथपाल पूनम शिंदे यांनी तर सेवक शहाजहान बागवान यानी मानले. यावेळी प्रीती घाडगे, नंदा देशपांडे, अलकनंदा कुलकर्णी, सुवर्णा शिंदे, एस. एम. देशमुख, सुनंदा भिवरे, सावित्री केवळे, जानकी कुलकर्णी, वसुधा देशपांडे, मीना पाटील, अंजली शिंदे उज्वला क्षीरसागर आदीसह महिला उपस्थित होत्या.



### सुभाष वाघमारे यांना समाजसेवारत्न पुरस्कार

**सांगोला, दि. ६ फेब्रुवारी-**

सांगोल्यातील सीबीएस न्यूज मराठी चॅनलच्या वर्धापन दिनानिमित्त वालचंदनगर येथील कवी सुभाष वाघमारे यांना समाजसेवारत्न जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार वितरण समारंभ आ. डॉ. बाबासाहेब देशमुख, डिजिटल मिडिया संपादक, पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, सुप्रसिध्द ग्रामीण कथाकार आप्पासाहेब खोत, चाँदभाई शेख यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी वालचंदनगरच्या माजी आदर्श सरपंच सुषमा वाघमारे, देविदास वाघमारे, ॲड. नितीन वाघमारे, शेवंता कसबे, विनोद चंदनशिवे उपस्थित होते.



### जिजाऊ ब्रिगेडतर्फे सफाई कामगार, विधवा माता-भगिनींचा स्नेहमेळावा उत्साहात

**टेंभुर्णी, दि. ६ फेब्रुवारी-**

यावर्षी देखील टेंभुर्णीच्या सरपंच सुरजा योगेश बोबडे यांच्या पुढाकाराने महिला सफाई कामगार तसेच विधवा माता-भगिनींसाठी तिळगुळ स्नेहमेळावा घेण्यात आला. यावेळी सरपंच सुरजा बोबडे, अनुराधा काकी, सुनिता अनंतकवळस, स्वरूपाताई बोबडे, सुरालीताई बोबडे, धनश्रीताई ढवळे, पल्लवीताई गायकवाड, मितालीताई शहा, आशा निमसे, रेखाताई ढवळे, ज्योती रेडेकर, उर्मिलाताई बारबोले, सुवर्णा देशमुख, अर्चना कुटे व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# माघी वारीसाठी पाच लाख बुंदी लाडू प्रसाद

**● कॅरीबॅगला फाटा; यंदा कागदी पिशवीत पॅकिंग; अन्न व औषध प्रशासनाच्या नियम, अटीचे पालन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ फेब्रुवारी-**

माघ यात्रा ८ फेब्रुवारी रोजी संपन्न होत असून, या यात्रेत येणाऱ्या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यासाठी पाच लाख बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

माघी, चैत्री, आषाढी व कार्तिकी अशा चार मुख्य यात्रा पंढरपूर येथे साजरा करण्यात येतात. यामध्ये माघी यात्रा सुरू असून भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यात येत आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणारा प्रत्येक



भाविक दर्शन झाल्यानंतर श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद खरेदी करत असतो. मंदिर समितीच्या बुंदी लाडू प्रसादाला भाविकांतून मोठी मागणी होत आहे. येणाऱ्या प्रत्येक भाविकांना लाडू प्रसाद मिळावा यासाठी पाच लाख बुंदी लाडू प्रसाद व पन्नास हजार राजगिरा लाडू प्रसादाची उपलब्धता ठेवण्यात येत आहे. यामध्ये बुंदी लाडू प्रसाद मंदिर समितीमार्फत व राजगिरा लाडू प्रसाद आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे. ७० ग्रॅम वजनाचे दोन बुंदी लाडू कागदी पिशवीत पॅकिंग करून प्रति पाकीट २० रुपये प्रमाणे व २५ ग्रॅम वजनाचे दोन राजगिरा लाडू पॅकिंग करून प्रति पाकीट १० रुपये प्रमाणे भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी पश्चिम द्वार, उत्तर द्वार, श्री संत तुकाराम भवन असे एकूण तीन स्टॉल असून, सर्व स्टॉल स.६.०० ते रा. १२.०० पर्यंत खुले ठेवण्यात येत आहेत.

बुंदी लाडू प्रसाद एमटीडीसी भक्तनिवास येथील लाडू उत्पादन केंद्रामध्ये हरभरा डाळ, साखर, शेंगदाणा डबल रिफाइंड तेल, काजू, बेदाणा, विलायची इत्यादी पदार्था पासून तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियम व अटींचे पालन करून तयार करण्यात येत आहे. या लाडू प्रसादाची शासकीय प्रयोगशाळेतून खाण्यास योग्य असल्याबाबत तपासणी करून घेण्यात आली आहे. भाविकांना दिला जाणारा लाडू प्रसाद स्वादिष्ट करताना आरोग्याच्या दृष्टीनेही सर्व नियम पाळण्यात येत आहेत. बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद व्यवस्थेची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत यांना देण्यात आली आहे. सहअध्यक्ष औसेकर महाराज यांनी बुंदी लाडू प्रसाद उत्पादन केंद्राची पाहणी केली असून, यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, सहाय्यक विभाग प्रमुख दत्तात्रय इंगळे उपस्थित होते.

### १०० क्विंटल हरभरा दाळ, १५० क्विंटल साखरेचा वापर

सदरचा बुंदी लाडू प्रसाद तयार करण्यासाठी १०० क्विंटल हरभरा डाळ, १५० क्विंटल साखर, ८ हजार किलो शेंगदाणा डबल रिफाईंड तेल, १५० किलो काजू, २०० किलो बेदाणा, १० किलो विलायची, ५०० ग्रॅम केसरी रंग इत्यादी मालाची खरेदी करण्यात आली असून, प्रसाद पॅकिंग करण्यासाठी पर्यावरण पूरक कागदी पिशवीचा वापर करण्यात येत आहे. सुमारे ८० कर्मचारी लाडू प्रसाद तयार करण्यासाठी परिश्रम घेत असल्याचे मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.



## बंधाऱ्यातून सोडले चंद्रभागेत पाणी

**▸ वारकरी, भाविकांना चंद्रभागा नदीत करता येणार पवित्र स्नान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ फेब्रुवारी-**

माघ शुद्ध एकादशी ८ फेब्रुवारी रोजी असून, माघ यात्रा कालावधी २ ते १२ फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते. श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापूर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. भाविकांना चंद्रभागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी दगडी पुलाजवळील बंधाऱ्यातून २४० क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे.

चंद्रभागा नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाल्याने व जास्त काळ पाणी साठून राहिल्याने पाण्यावर शेवाळे येऊन पाणी घाण झाले होते. त्या अनुषंगाने गुरसाळे बंधाऱ्यातून व नगर परिषदेच्या बंधाऱ्यामधून भाविकांचे सोयीसाठी बंधाऱ्याचे सहा दरवाजे उघडून चंद्रभागा नदीपात्रामध्ये पाणी सोडण्यात आल्याने व माघी यात्रेमध्ये भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध झाल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. नदीपात्रामध्ये पाण्याची रिसायकलिंग करून पाणी स्वच्छ करण्याची यंत्रणा बसवण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

### उपविभागीय अधिकाऱ्यांनी घेतली दखल

उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी तातडीने कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग व पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करून गुरसाळे व नगर परिषदेच्या बंधारे मधून तातडीने सहा दरवाजे उघडून नदी पत्रामध्ये पाणी सोडण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले.

# आरोग्य, स्वच्छता, सुरक्षेवर अधिक भर

**● पंढरपूर नगपालिकेची तयारी; मूलभूत सोयीसुविधा देण्याकडे लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.६ फेब्रुवारी-**

माघी शुद्ध एकादशी ८ फेब्रुवारी रोजी होणार असून, या यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून भाविक मोठ्या प्रम णात येतात. यात्रा कालावधीत भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली.

यात्रा कालावधीत मंदिर परिसर, महाद्वार घाट, प्रदक्षिणा मार्गावर दिंडी घेऊन जात असताना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून नगरपरिषदेने अर्बन बँक ते नाथ चौक, स्वा. सावरकर पुतळा ते महाद्वार, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट व इतर रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली असून, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. लोखंडी बॅरिकेटिंग करण्यात येत आहेत. वाहनांसाठी १३ ठिकाणी पार्किंग करण्यात आले आहे. भाविकांसह पाण्याचे टँकर, जेटिंग मशीन, आरोग्य विभागाची वाहनांना वाळवंटात जाण्या-येण्यासाठी जुना पुल ते पुंडलिक मंदिरापर्यंत रस्त्याची आखणी करण्यात आली आहे. ९ हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर २०० वॅट एलईडी, कायमस्वरूपी लखुबाई मंदिर घाट, उद्धव घाट, कुंभार घाट व चंद्रभागा घाट, स्टेडियमवर फ्लड लाईट, दर्शन बारी मार्ग, ६५ एकरमध्ये १६० एलईडी दिवे व ६ हायमास्ट बसविण्यात आले आहेत. ६५ एकर भक्तीसागरमधील १२ युनिटमध्ये असलेल्या १४०० शौचालयांमध्ये विजेची व्यवस्था आहे. अनिल नगर येथील पाण्याच्या टाकीवरुन स्वतंत्र पाईप लाईनद्वारे पिण्याचे पाणी देण्यासाठी वाळवंटामध्ये ७४ नळ बसविण्यात आले आहेत. भक्तीसागर येथेही पाण्याची सोय असून, सर्वत्र विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. यासाठी १०० सफाई कर्मचारी तैनात असून, महत्वाच्या ठिकाणी २४ तास अग्निशमन वाहने, मंदिराच्या दक्षिण बाजूस फायर हायड्रेट उभा केला आहे. मंदिर परिसरात दोनवेळा पाणीपुरवठा होणार आहे. शहरात ६५ हातपंप व मंदिर परिसरातील १२ विद्युत पंपाद्वारेपाण्याची सोय करण्यात आली आहे. स्वच्छतेसाठी ७०० सफाई कर्मचारी, ४१ घंटागाडी, चार टिपर, दोन कॉम्पॅक्टर, एक डंपरप्लेसर, चार डंपिंग ट्रॉली, जेसीबी असणार आहेत. गर्दीच्या ठिकाणी ५०० पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उभारण्यात आली आहेत.



### विकासकामांची पाहणी

पंढरपूर शहरामध्ये नगरपरिषदेच्या वतीने केलेल्या विविध कामांची पाहणी प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळूजकर व प्रमुख अधिकाऱ्यांच्या समवेत पाहणी केली.

### बायोकल्चर तंत्राचा वापर

बायोकल्चर तंत्राचा वापर करुन जैविक पद्धतीचे बायोकल्चर नदीच्या पात्रात होणारी घाण, दुर्गंधी, कचरा व घाण नष्ट करण्यासाठी फवारणी करण्यात येत आहे. शौचालय नियोजनामध्ये तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत व सुलभ शौचालयाची २९ ठिकाणी २०५४ सीट्स, नगरपरिषदेची कायमची २५ ठिकाणी १७६ सीट्स, ६५ एकर परिसरातील कायम स्वरुपी १२ ठिकाणी १८६४ सीट्स, प्री फॅब्रिकेटेड (नदी वाळवंट, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी, शहरात विविध ठिकाणी) अशा १४ ठिकाणी ४०० सीट्सचे नियोजन केले आहे.





# वाढत्या गर्दीमुळे जादा पत्राशेडची निर्मिती

**▸ व्यवस्थापक मनोज श्रोत्री, सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज यांनी केली सोयीसुविधांची पाहणी; चहा वाटपासाठी कागदीऐवजी स्टील कपाचा वापर**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ फेब्रुवारी-**

माघ एकादशीचा मुख्य सोहळा दि. ८ फेब्रुवारी रोजी असून, वारकरी भाविकांनी मंदिर परिसरात व दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत.भाविकांसाठी पदस्पर्शदर्शनरांगेत सहा पत्राशेड उभारण्यात आले होते.

मात्र, दर्शनरांगेतील भाविकांची गर्दी वाढली असल्याने येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यासाठी दोन अतिरिक्त पत्राशेड नव्याने उभारण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी गुरुवारी दर्शनरांग व पत्राशेडच्या पाहणी करून आढावा घेतला. त्यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख बलभिम पावले, भिमाशंकर सारवाडकर, राजाराम ढगे, शंकर मदने व राजेंद्र घागरे उपस्थित होते. पदस्पर्शदर्शनरांगेतील वाढती गर्दी विचारात घेऊन, दोन जादा म्हणजे आठ पत्राशेड उभारणे, चहा वाटपासाठी कागदी कपा ऐवजी स्टील कपाचा वापर, मुखदर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौक येथे उड्डाणपूल उभारणे तसेच जलद व सुलभ दर्शनरांग चालविणे कामी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना यावेळी सह अध्यक्ष यांनी दिल्या. पत्राशेड येथे चांगली स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल, आपत्कालिन व्यवस्थापन, दर्शनरांगेत मॅटींग, सार्वजनिक सुचना प्रणाली, स्पिकरवर अभंग आणि भक्तीगीते तसेच आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तसेच दर्शनरांगेतील एकही भाविक उपाशी राहू नये म्हणून खिचडी वाटप व दशमी, एकादशी व द्वादशीला पत्राशेड येथे अन्नछत्र सुरू राहणार आहे. सह अध्यक्ष यांनी नियुक्त प्रशासकीय अधिकारी व दर्शनरांगेतील भाविकांशी चर्चा करून, सोई सुविधांचा आढावा घेतला व दर्शन भाविकांना पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे सांगीतले.

### हे करणार नित्यपूजा

पंढरीत दाखल झालेल्या भाविकांनी सध्या विठुरायाच्या दर्शनरांगेत मोठी गर्दी केली आहे. दर्शन रांगेत हजारो भाविक उभे आहेत. या वारकरी भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास मंदिर प्रशासन सज्ज असून, माघ शुद्ध जया एकादशी दिवशी मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची नित्यपूजा अनुक्रमे मंदिर समितीचे सदस्य हभप प्रकाश जवंजाळ व संभाजी शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न होत असल्याचे यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगीतले.



# पेनूर येथे रंगला माघवारी तिसरा गोल रिंगण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ फेब्रुवारी-**

माघवारीनिमित्त पंढरपूरला सोलापूर-मोहोळमार्गे पायी चालत जाणाऱ्या दिंडीचे रिंगण व्हावे हा संकल्प करून भाविक वारकरी मंडळाच्या माध्यमातून पेनूर येथे तीन वर्ष झाले प्रयत्न सुरु आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखीचे प्रमुख उपस्थितीमध्ये माघ शुद्ध अष्टमीला गुरुवारी स. १०.३० वा. महात्मा गांधी विद्यालय, पेनूर (ता. मोहोळ) येथे तिसरा गोल रिंगण सोहळा पार पडला.

दीपक नरोटे यांचे अश्व रिंगणसाठी आणले होते. भारत चवरे महाराज, नागनाथ शिंदे महाराज, शत्रुघ्न चवरे यांच्या हस्ते अश्व पूजन व सरपंच सुजित अवारे, सागर चवरे, उपसरपंच यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले. भजनामध्ये दंग होऊन वारकरी नाचत होते. त्या सर्वांनी पाऊल खेळले. नंतर रिंगण लाऊन घेतले व ध्वजाधारी रिंगण पूर्ण झाले. तुळशी वृंदावनधारी महिला व मृदंग वादकांचे रिंगण झाले. विणेकरी महाराजांचे रिंगण पूर्ण झाल्यानंतर शेवटी अश्व रिंगाणासाठी धावपट्टी आले आणि मैदानातील वातावरण बदलून गेले. अश्वाचे रिंगण खूपच उत्साहपूर्ण झाले आणि सर्व वारकरी भाविक पंढरीकडे मार्गस्थ झाले. हा सर्व सोहळा सुधाकर इंगळे महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. प्रदेशाध्यक्ष जोतीराम चांगभले, प्रदेश उपाध्यक्ष किसन कापसे, शहराध्यक्ष संजय पवार, महेश चवरे, बळीराम चवरे, पेनूर परिसरातील भाविक, वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळा डोळ्यात साठवला.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जुनी पेन्शन लागू करण्यासाठी शिक्षकांचे आज धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य अंशतः अनुदान प्राप्त (२००५ पूर्वी) शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना १९८२ जूनी पेन्शन योजना अद्याप मान्य न झालेने शुक्रवार दि.७ फेब्रुवारी रोजी एक दिवसीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन तसेच मार्चच्या पहिल्या आठवड्यामध्ये उपोषण करणार असलेचे निवेदन मा. आयुक्त शिक्षण पुणे यांना देण्यात आले असुन पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सर्वच विभागातील १ नोहेंबर २००५ पुर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू केली आहे त्याच आधारे खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना तात्काळ लागू करण्यात येवून शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा अन्यथा मयत कर्मचारी यांचे कुटुंबीय, सेवानिवृत्त शिक्षक बांधव, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी धाराशिव जिल्हा शुक्रवार दि.७ फेब्रुवारी रोजी आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार आहोत, असे आव्हान शिक्षक संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष तथा मुख्याध्यापक निर्मलकुमार गांधले यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### ‘रूपामाता’ शाखेत हळदी-कुंकू संपन्न

**जळकोट, दि.६ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रूपामाता अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्यावतीने महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम पार पडला. जळकोट येथील श्री विठ्ठल रुक्मणी मंदिरात आयोजित केलेल्या कार्यक्रमात महिलांना सोसायटी संदर्भात माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात जवळपास ८०० महिलांना प्रत्येकी एक किलो गूळ पाकीट व हळदी कुंकू देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास पंचायत समिती माजी उपसभापती सुनिता पाटील, रुपामाता अर्बन को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीच्या अश्विनी जमदाडे, शामल कांबळे, हेमा पाटील, जळकोट शाखेच्या कॅशियर शितल गिरमाजी आदि उपस्थित राहून महिलांचा सन्मान केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीचे सागर खोत, जळकोट शाखेचे व्यवस्थापक गौतम वाघमारे, महेश कटोरे, अभिजीत कोळगे यांनी परिश्रम घेतले.



#### विक्रम पाचंगे यांचा सन्मान

**जळकोट, दि.६ फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या जि.प. प्राथमिक शाळा, मानमोडी येथील प्राथमिक पदवीधर शिक्षक विक्रम बलभीम राव पाचंगे यांनी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत खेळातून गणित संबोध व विकास तसेच राज्यस्तरीय ग्रंथ निर्मिती स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यातील प्राचीन मंदिरे या विषयावर पुस्तक निर्मिती केल्याबद्दल जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, धाराशिव यांच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी उमरगा-लोहारा तालुक्याचे आ. प्रवीण स्वामी, प्राचार्य दयानंद जटनुरे, माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती सुधा साळुंखे, मिसाळ, घुगे, भैरवनाथ कानडे, बालाजी इंगळे, जिल्ह्यातील साहित्य क्षेत्रातील अनेक साहित्यिक, शिक्षक बंधू व भगिनी उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिरासमोर पुजाऱ्यांचे लाक्षणिक उपोषण

**मुख्य गाभाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी मंदिर प्रशासन व पुरातत्त्व विभागाकडून गांभीर्य नसल्याने पुजारी आक्रमक... मंदिर संस्थान उदासीन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ फेब्रुवारी -**

श्री देविजींच्या मुख्य गाभा-याबाबत तसेच पुर्वी ठरल्याप्रमाणे गाभाऱ्यात प्रवेश करण्यासाठी व बाहेर पडण्यासाठीचे मार्गाबाबत संबंधी वारंवार विचारणा करूनही मंदिराकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याने दि.६ फेब्रुवारी रोजी तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयाच्या समोर समस्त पुजारी बांधवांच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

श्री तुळजाभवानी देविजींचे मंदिरात मंदिरसंस्थानचे स्वनिधीतुन जिर्णोध्दाराचे काम पुरातत्व विभागामार्फत सुरु आहे. सदर सुरु करण्या आगोदर मंदिरातील चांदी दरवाजाच्या दोन्ही बाजुनी सिंहाच्या






गाभाऱ्यात प्रवेश करण्यासाठी प्रवेशव्दार, पलंगाच्या खोलीतुन बाहेर पडण्यासाठीचा मार्ग व एक्झीट फॅन पासुन बाहेर पडण्याच्या मार्गास पुरातत्वे विभागाने परवानी दिल्याने सदरकामे सुरु केल्याचे प्रत्यक्ष बैठकीत पुजाऱ्यांना सांगीतले होते.

सध्या काम सुरु केलेले असूनसदर प्रवेशव्दारांबाबत वारंवार विचारणा करुनही याबाबत माहिती मिळत नाही.तसेच ज्यावेळी मुख्य गाभाऱ्यातील व चोपदार दरवाजा भिंतीवरील टाईल्सकाढल्यानंतर जे मुळ बांधकाम आहेते अत्यंत जीर्ण झाल्याचे व सदरील बांधकाम सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रथमदर्शनी अत्यंत धोकादायक असल्याचे निदर्शनास आलेले आहे. दोन्ही बाबतीत मंदिर प्रशासनामार्फत अथवा पुरातत्त्व विभागामार्फत काय कार्यवाही अनुसरण्यांत येत आहे.

तसेच मुख्य गाभाऱ्याचे सुरक्षिततेबाबत तातडीने कार्यवाही अपेक्षीत असताना आजपर्यंत कोणतही कार्यवाही अनुसरण्यांत येत नसल्याचे लाक्षणीक उपोषण करण्याचा इशारा पुजारी मंडळांनी दिलेला होता.

तथापि सदर निवेदनाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नसल्याने पुजाऱ्यांनी मंदिरासमोर हे लाक्षणीक उपोषण केले. सदरील मागणीची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही नाही अनुसरल्यास लवकरच मंदिराचे कार्यालया समोर व पुरातत्व कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा सदरी निवेदनात दिला आहे.

मंदिर कर्मचारी जयसिंग पाटील यांनी उपोषणस्थळी पुजाऱ्यांची निवेदन स्वीकारले यावेळी पुजारी विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, धनंजय लोंढे, अण्णासाहेब क्षीरसागर, नागेश साळुंके, विशाल रोचकरी, धनंजय चोपदार, धनंजय लोंढे, अण्णासाहेब रोचकरी, गणेश साळुंके, बाळासाहेब भोसले, लखन शिंदे, सुजित शिंदे, विनोद कदम, अमोल ताकमोघे, विकास मोटे, अजित क्षीरसागर, अक्षय करडे, गणेश दिक्षीत, शुभम क्षीरसागर, सुमित साळुंके, गोपाळ पवार, ओमकार टोले, सुजय हंगरगेकर, सोमनाथ भिसे, अण्णासाहेब खपले, विजय झाडपिडे, सागर कंगले, विशाल मोटे, अमर चोपदार, अनंत गंगणे, दत्ता चोपदार, सचिन टोले, अप्पासाहेब पवार यांच्यासह शेकडो पुजारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जीएसटीच्या धाडीने व्यापाऱ्यात दहशत निर्माण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ फेब्रुवारी -**

शहरात असणाऱ्या काही व्यावसायिकावर सोमवारी दि.३ फेब्रुवारी रोजी जीएसटी विभागाच्या धाडी पडल्याने शहरातील व्यापारी वर्ग भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.




एकाच वेळी दोन ठिकाणी जीएसटी विभागाच्या शहरात एकाच वेळी अचानक धाडसत्र सुरू केल्याने व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील प्रतिष्ठित किराणा व हॉटेल व्यवसायिकांची चौकशी सुरू असून हे धाडसत्र अजून चालू शकते असेल सूत्राकडून समते. यामुळे तुळजापूर शहरात अनेक उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे शहरातील अनेक यावसायिकांचे धाबे दणाणले आहे. हॉटेल, किराणासह इतर-व्यवसायांमध्ये भागीदार असलेल्या शहरातील प्रतिष्ठित व्यापारी समूहावर आयकर विभागाची तसेच सेवा व वस्तू-कर विभागाची धाड पडल्याची चर्चा देखील आहे. सोमवारी दि.३ सायंकाळपासून मंगळवारी दि.४ संध्याकाळपर्यंत सर्व भागीदारांची चौकशी सुरू असल्याचे समजते.

दरम्यान या धाडीमागे कर चुकवेगीरीसह हवाला रॅकेटचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मागील काही काळापासून तुळजापूर शहरात अवैध धंद्यांना ऊत आला असून शहरात प्रतिष्ठित व्यावसायिक म्हणून व्यवसायाच्या आड अवैध धंदे खुलेआम करत असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

## बिल थकवणाऱ्या साखर कारखान्यांवर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.६ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून, अनेक साखर कारखान्यांकडून ऊस बिलाच्या वेळेवर अदा करण्यास टाळाटाळ केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर बबनराव शेळके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

एफआरपी कायद्यानुसार, गळीत हंगाम संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत ऊस बिलाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक खाजगी आणि सहकारी साखर कारखान्यांकडून या नियमांचे उल्लंघन होत असून, शेतकऱ्यांना त्यांचा मेहनतीचा मोबदला मिळत नाही. परिणामी, शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येत आहे. शेतकरी हा ऊस उद्योगाचा कणा आहे.



पण साखर कारखान्यांकडून त्यांच्या हक्काच्या पैशांसाठीच लढावे लागते, हे दुर्दैवी आहे. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले तातडीने अदा करावीत, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेळके यांनी दिला आहे. यावेळी सुहास कानडे, विकास घोडके, रोहित शेंडगे, कृष्णा मोरे हे उपस्थित होते.

या निवेदनाची प्रत विभागीय आयुक्त संभाजीनगर आणि साखर आयुक्त कार्यालय संभाजीनगर यांना सुद्धा पाठवण्यात आली आहे. आता प्रशासन या निवेदनावर काय निर्णय घेते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांच्या पिवळ्या सोन्याची पार चित्तरकथा

**सोयाबीन गेले व्यापाऱ्याला बुस्कट राहिले शेतकऱ्याला शेतमालाच्या भावा बाबत शासन मूग गिळून गप्प...**

**निवडणूक काळात दिली होती मोठमोठी आश्वासने...**

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.६ फेब्रुवारी -**

शेतकऱ्याचं खरं अर्थकारण म्हणजे शेतमाल आणि शेतमालाला जर बाजारात योग्य भाव मिळाला तर चार पैसे येतील व वर्षभराच्या खर्चाच गणित जुळेल. परंतु आता हे शेतकऱ्याच गणित कोलमडलय. मागील दोन वर्षांपासून बहुतांश शेतमालाचे भाव मोठ्या प्रमाणात कोळसले आहेत.

यामुळे शेतकऱ्याला मोठं नुकसान सहन करावं लागत असताना दुसरीकडे खता औषधांचे भाव गगनाला भिडले आहेत. एकीकडे दिवसेंदिवस शेतीमालाच्या भावात घसरण होत असताना दुसरीकडे खता,औषधांचे भाव थांबण्याऐवजी वाढतच चालल्याने शती कशी करावी असावा मोठा सवाल आता शेतकऱ्यांना पडला आहे.

कमी दिवसात शेतकऱ्यांना जास्त उत्पन्न देणारे तसेच शेतकऱ्याचं पिवळं सोनं म्हणून



ओळखले जाणारे एकमेव पीक म्हणजे सोयाबीन आता हे पिवळं सोनं संकटात सापडल आहे.

ना त्याला लोखंडचा भाव, ना प्लास्टिकचा भाव १२ हजार रुपये क्विंटल पार केलेलं सोयाबीन मागील दोन वर्षापासून सतत घसरण होऊन आता चक्क ३ हजार ७०० ते ४ हजारावर येऊन ठेपले आहेत. शेतकऱ्यांच्या पिवळ्या सोन्याची पार आता चित्तरकथा झाली आहे असेच म्हणावे लागेल. कारण सोयाबीन गेले व्यापाऱ्याला आणि बुस्कट राहिले शेतकऱ्याला असे चित्र सद्या पाहायला मिळत आहे.

जरी सरकारने हमीभाव खरेदी केंद्र सुरू केली असली तरी, ती शेतकऱ्यांनी खाजगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावाने विक्री केल्यानंतर सुरू झाली. सरकारने खाजगी व्यापाऱ्यांना देखील शेतमाल हमीभावाने खरेदी करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी आता शेतकरी वर्गातून जोर धरू लागली आहे.

निवडणूक काळात मोठमोठी आश्वासने देणारे आणि शेतकऱ्यांचे पाय धरणारे नेते आता शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून शेतमालाच्या भावा बाबत मूग गिळून गप्प बसले आहेत.

## उमरगा-नळदुर्ग-धाराशिव राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणास गती देण्याची आपची मागणी





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ फेब्रुवारी -**

उमरगा-नळदुर्ग-धाराशिव हा राष्ट्रीय महामार्ग हा मराठवाडा आणि कर्नाटक जोडणारा महत्त्वाचा दळणवळण मार्ग आहे. दिवसेंदिवस या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढत असून, रस्त्याची दुरवस्था व अपुरी रुंदीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

त्यामुळे या महामार्गाच्या तातडीने चौपदरीकरणाची मागणी जोर धरत आहे.

या संदर्भात आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर बबनराव शेळके यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देऊन त्वरित कार्यवाहीची मागणी केली आहे.

रस्ता अरुंद असल्यामुळे वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे अनेकांचे प्राण जात आहेत. तसेच, वाहतूक कोंडीमुळे प्रवासाचा वेळ वाढत आहे, परिणामी या मार्गावरील व्यापार, उद्योग आणि आर्थिक विकासालाही फटका बसत आहे.

## येडशी येथे आज रंगणार कुस्त्यांचा फड

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.६ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील येडशी येथे शिवनेरी तालीम संघ, विजयराज क्रिडा मंडळ, सुनिल शेळके मित्रमंडळ, आणि भवानी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ रोजी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पै. सुनिल शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त बाजार मैदानात होणाऱ्या या कुस्ती स्पर्धेमध्ये भरघोस बक्षिसे ठेवलेली आहेत. त्यामध्ये प्रथम पारितोषिक ५१ हजार रूपये रोख व चांदीची गदा.

व्दितीय क्रमांकासाठी २१ हजार रुपये व तृतीय क्रमांक आणि चतुर्थ क्रमांक मिळविणाऱ्या पैलवानास ११ हजार रुपये रोख तर पाचव्या आणि सहाव्या क्रमांकास ३ हजार रुपये रोख अशा स्वरूपात बक्षिसे दिली जाणार आहेत. या



कुस्ती स्पर्धा दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजेपासुन खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, उपमहाराष्ट्र केसरी मारूती जाधव, विजयकुमार सस्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू होणार आहेत.

पहिल्या सहा क्रमांकाच्या निमंत्रीत पैलवानांच्या कुस्ती होणार आहेत.

त्यामध्ये प्रथम पारितोषिकाची कुस्ती हनुमंत पुरी आणि मनोज माने, व्दितीय क्रमांकासाठी रामा शेळके आणि रवि खैरे यांच्यात लढत होणार आहे. तर तृतीय क्रमांकासाठी धनराज गाडे, गणेश काळे, राहुल शेळके, सागर लोहार या पैलवानांच्यात सामना रंगणार आहे. त्याचबरोबर १०० रुपयांपासुन ३००० रुपयांपर्यंतच्या कुस्त्या सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत खेळवल्या जातील.

या स्पर्धेत जास्तीत जास्त पैलवानांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन वस्ताद आबा शेळके आणि विनोद पवार यांच्यासह आदिंनी केले आहे.

# कचऱ्याची दुर्गंधी; न.प.ने रोडच्या मधोमध ठेवलेल्या कचराकुंडीमुळे बाजारपेठेत घाणीचे साम्राज्य

**शासनाचे कचरा कुंड्या मुक्त गाव धोरण वाऱ्यावर ! भाविक आणि व्यापाऱ्यांचे आरोग्य धोक्यात...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ फेब्रुवारी -**

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भवानी रोड मार्गे दररोज हजारोच्या संख्येने भाविक मंदिरात जातात. मंदिरामुळे भवानी रोडवर आकर्षक आणि सुंदर असे लाईटचे खांब बसवले आहेत.








येणाऱ्या भाविकांना स्वच्छ आणि सुंदर आकर्षक शहर दिसण्याचे सर्वतोपरी प्रयत्न चालू असताना नगर परिषदेचा बेजबाबदारपणा भवानी रोडवर जवाहर गल्ली समोर ठेवलेल्या भल्या मोठ्या कचराकुंडीने उघड झाला आहे. कचराकुंडी मुक्त गाव करून जागोजागी घंटागाडी फिरून नागरिकांचा कचरा गोळा करणे अपेक्षित असताना शासनाचे धोरण वाऱ्यावर सोडून नगरपरिषदेचा मनमानी कारभार चालू असल्याचे समोर आले आहे.

संपूर्ण भवानी रोडवर भाविकांच्या सोयीसाठी २००/३०० मीटर वर छोट्या छोट्या बंद झाकणाच्या कचराकुंड्या बसवल्या आहेत असे असताना देखील जवाहर गल्ली समोर भलीमोठी कचराकुंडी विनानाकारण ठेवण्यात आली आहे. या कचराकुंडीमुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. कचराकुंडी भली मोठी असल्यामुळे याचा सहारा घेऊन भाविकसह नागरिक रात्रीच्या वेळी याचा उपयोग आडोसा घेऊन मुतारी म्हणून करत आहेत.

तर लहान लेकरांना भाविक कचराकुंडीच्या अवतीभवती शौचालयास बसवत आहेत. तसेच नगरपरिषद दररोजच्या दररोज हा कचरा उचलत नसल्याने संपूर्ण बाजारपेठेत दुर्गंधी पसरून येथील व्यापारी आणि भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रोडवर कचराकुंडीमुळे दुर्गंधीयुक्त पाणी पसरले आहे. या दुर्गंधीयुक्त पाण्याला ओलांडून भाविकांना मंदिरात दर्शनासाठी जावे लागते. या कचराकुंडीमुळे या भागात डासाचे प्रमाण वाढले आहे. डासाचे प्रमाण वाढल्यामुळे या भागातील रहिवाशांना डेंग्यू, साथी तापी सारखे गंभीर आजार उद्भवू शकतात.

या मार्गावरून बहुतांश व्हीआयपी भाविक गेट जवळ गाड्या लावून चालत दर्शनासाठी जातात. तुळजाभवानी देवीच्या दर्शना अगोदर भाविकांना या कचराकुंडीमुळे घाणीचे दर्शन होते. छोट्या कचरा कुंड्या असताना रोडच्या मधोमध भलीमोठी कचराकुंडी ठेवण्याचे कारण काय असा प्रश्न येथील व्यापारी आणि रहिवाशातून होत आहे. रस्त्याच्या मधोमध ठेवलेली ही भली मोठी कचराकुंडी नगरपालिकेने काढून टाकावी अशी मागणी येथील व्यापारी नागरिक आणि रहिवाशांतून होत आहे.

**मंदिराकडे जाणारे दिशादर्शक बोर्ड नसल्याने भाविकांची शहरात भटकंती...**

शहरात आलेल्या भाविकांना कार पार्किंगकडे तसेच भक्तनिवासकडे जाण्याचे बोर्ड लावण्यात आले आहेत. पण मंदिराकडे जाण्याचे दिशादर्शक बोर्ड दीपक चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आणि भवानी रोडने लावण्यात आले नसल्याने भाविकांची शहरात विनाकारण भटकंती होत आहे.तर रिक्षा चालक रस्ता चुकलेल्या भाविकांकडून आवाकेसव्वा पैसे घेऊन भाविकांची लूट करत आहेत बस स्टॅन्डपासून मंदिरापर्यंत मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे दिशादर्शक बोर्ड लावल्यास भाविकांची भटकंती आणि पिळवणूक होणार नाही.

- दत्तात्रय डाळे, नुकसान ग्रस्त शेतकरी उपळाई.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २५० लोकसंख्या गृहीत धरून सुधारित आराखडा : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्हा हा आकांक्षीत जिल्हा असून या जिल्ह्यातील लोक वस्त्या निवडताना ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वस्त्या या निकषानुसार पात्र ठरणार असून व सदरील वस्त्याची निवड करताना आकांक्षीत जिल्ह्यातील आकांक्षीत तालुका हा निकष या योजनेत नव्याने समावेश करण्यात आला आहे.



त्यामुळे जिल्ह्यातील इतर सात तालुक्यातील वस्त्या वंचित राहणार आहेत. त्यामुळे या निकषांमध्ये सुधारणा करुन सर्व तालुक्यांचा अंर्तभाव करावा.

२५० लोकसंख्या असलेल्या वस्त्या चा देखील विचार करावा, सदरील वस्त्या बारमाही रस्त्याने जोडाव्या व तसा सविस्तर आराखडा केंद्र सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवावा अशी महत्त्वपूर्ण सूचना या बैठकीत केली.



# भविष्यात लाडक्या बहिणीसाठी विविध उपक्रम राबवून त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील : पालकमंत्री सरनाईक

### सरस-जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे ऑनलाईन उद्घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**

आज विविध क्षेत्रात महिला काम करताना दिसतात. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांसाठी उमेदच्या माध्यमातून आयोजित या सरस- जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनातून उत्पादित केलेल्या वस्तू साहित्य व खाद्यपदार्थाची विक्री करण्याची संधी महिलांना मिळाली आहे.महिलांनी आणखी कोणकोणते साहित्य व वस्तू तयार करता येतात याकडे लक्ष केंद्रित करून दर्जेदार साहित्य व वस्तूंची निर्मिती करावी. जिल्ह्यातील लाडक्या बहिणींसाठी भविष्यात विविध उपक्रम राबवून त्यांच्या विकासासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी केले.

आज ६ फेब्रुवारी रोजी धाराशिव येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला मैदानावर जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या सरस -जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून करताना पालकमंत्री सरनाईक बोलत होते.

यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विलास जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी सचिन इगे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील व उमेदचे जिल्हा व्यवस्थापक जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले की,या विक्री व प्रदर्शन कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व बचतगटातील महिलांचे अभिनंदन करतो. बचत गटातील महिला ह्या उपक्रमशील आहेत.जिल्ह्यात आज १४ हजार ५६३ महिला बचतगट समूहामध्ये १ लाख ४३ हजार कुटुंब सहभागी आहेत.

१४ हजार ३०० स्वयंसहायता समूहांना प्रत्येकी १५ हजार रुपये याप्रमाणे खेळते भांडवल म्हणून २९ कोटी रुपये निधी वाटप केला आहे. १४ हजार १३३ समूहांना बँकांकडून ५३२ कोटी ६७ लाख रुपये इतके भांडवल कर्ज स्वरूपात पुरवण्यात आल्याचे सांगून सरनाईक म्हणाले,महिलांनी भांडवलाच्या माध्यमातून स्वावलंबी होऊन विविध व्यवसायाला सुरुवात करावी, असे त्यांनी सांगितले. डॉ. घोष म्हणाले, ६ ते १० फेब्रुवारी दरम्यान आयोजित या विक्री व प्रदर्शनातून २० लक्ष रुपयांच्या वस्तू व साहित्याची विक्री अपेक्षित आहे.

बचत गटातील उत्पादित वस्तू व साहित्याची खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी तसेच नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट दयावी. त्यामुळे बचत गटातील महिलांना प्रोत्साहन मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

साळुंखे म्हणाल्या, प्रत्येक महिलेने आज प्रत्येक क्षेत्रात जिद्दीने काम केले पाहिजे. राजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांचा आदर्श पुढे ठेवून महिलांनी वाटचाल केली पाहिजे.

उमेदने महिलांना पुढे जाण्याचे बळ दिले आहे. ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून प्रगती करावी. महिलांना कौतुकाची थाप दिली तर त्यांना प्रोत्साहन मिळते. घरातील प्रत्येक महिलेला तिच्या आयुष्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्यास ती आपले कर्तृत्व सिद्ध करेल, असे त्यावेळी म्हणाल्या.



या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनात १६० स्वयंसहायता समूहांनी सहभाग घेतला असून यामध्ये २२ समूहांचे खाद्यपदार्थाचे स्टॉल आहे. लातूर, बीड, जालना, सोलापूर, बुलढाणा व पुणे येथील १० समूहांनी देखील सहभाग नोंदवला आहे.

यावेळी पत्रकार देविदास पाठक तसेच विविध बचत गटांच्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपस्थितांचे आभार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विलास जाधव यांनी मानले.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील उमेदच्या बचतगटातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ऊर्जा मंत्री अतुल सावे यांचा माळी समाजाच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ फेब्रुवारी -**

बहुजन कल्याण, दुधव्यवसाय, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुलजी सावे यांचा लोहारा शहरात आगमन होताच शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल लोहारा तालुका माळी समाजाच्या वतीने दि.६ फेब्रुवारी रोजी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



यावेळी नगरसेवक अविनाश माळी, राजेंद्र माळी, उपसरपंच बबन फुलसुंदर, विजय क्षीरसागर, नारायण क्षीरसागर, सरपंच विष्णु माळी, ज्ञानेश्वर माळी, बाळासाहेब वाडकर, नंदकुमार माळी, शरद पेठकर, ज्योतिराम कोरे, मारुती रोकडे, राजेंद्र क्षीरसागर, श्रीशैल्य स्वामी, गोपाळ आदटराव, अमोल माळी, शशीकांत माळी, सचिन माळी, सोमनाथ माळी, सोमनाथ भोजणे, दिनेश माळी, शुभम माळी, गहिनाथ क्षीरसागर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## बोरीचे पाणी शेतकऱ्यांना मिळण्यासाठी पाटबंधारे विभागाचे शर्तीचे प्रयत्न सुरू

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.६ फेब्रुवारी -**

नळदुर्ग बोरी धरणातील पाणी शेतकऱ्यांना शेती पिकासाठी कॅनलद्वारे सोडण्यात आले असून शेतकऱ्यांना सुरळीत पाणी मिळावं. यासाठी प्रशासन युद्ध पातळीवर काम करीत पाटबंधारे अधिकारी व कर्मचारी शर्तीचे प्रयत्न करीत आहेत.

बोगद्यातील अडकलेले चिंध्या पालापाचोळा यंत्राच्या साह्याने युद्ध पातळीवर काढून शेतकऱ्यांना शेती पिकासाठी वेळेत पाणी पोहच करण्यासाठी पाटबंधारे विभागाचे सहाय्यक अभियंता आर.व्ही. टोकलवड, कनिष्ठ अभियंता एस.सी. जगताप, डी. एन. घोंगडे, मोजणीदार, आर.बी. डोईफोडे, ए.डी. डावरे, तुळशीराम मोरेव त्यांच्या टीमने परिश्रम घेतल्यामुळेच २८६ व शहापुर फाट्यास कॅनल द्वारे पाणी उशिरा का होईना सोडण्यात आले.

## पुरस्कार प्राप्त रकमेतून १११ जेष्ठ नागरीकांना रेडिओ वाटप

### तुळजाई सांस्कृतिक व क्रीडा मंडळालाचा कौतुकास्पद उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ फेब्रुवारी -**

तुळजाई सांस्कृतिक व क्रीडा मंडळास महाराष्ट्र राज्य शासन आयोजित लोकमान्य टिळक उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धेत यावर्षीचा धाराशिव जिल्हयाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला असून सदर पुरस्कार स्वरुपात मिळालेल्या पुरस्कार रकमेतून समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास जेष्ठ १११ नागरिकांना रेडिओचे वाटप सामजिक बांधिलकीच्या भावनेतून दि.३ फेब्रुवारी रोजी तुळजापूर खुर्द येथे करण्यात आले.

मनोरंजन व ज्ञान वृद्धी करीता रेडिओ हे एक स्वस्त व प्रभावी माध्यम असून आकाशवाणीव्दारे प्रसारीत होणाऱ्या विविध कार्यक्रमातून मनोरंजनाबरोबरच केंद्र व राज्य शासनाच्या वतीने सूरू असलेल्या विविध योजना, सवलतींची परीपूर्ण माहीती मिळते. आजच्या स्मार्टफोन व इंटरनेटच्या आधुनिक काळात रेडिओ कालबाह्य झाला असला तरी शहरी भागाबरोबरच देशाच्या ग्रामीण दुर्गम, तळागाळातील लोकांपर्यंत पोहचण्याचे रेडिओ हे एकमेव माध्यम आहे.



यामुळेच कदाचित आपल्या देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या 'मन की बात' या कार्यक्रमाकरीता रेडिओ/आकाशवाणीची निवड केली असावी.

अनेक विविध समाज उपयोगी सामाजिक उपक्रम तुळजाई सांस्कृतिक व क्रीडा मंडळा मार्फत राबविले गेले असून मंडळाच्या या सामाजिक कामाची दखल घेवून जिल्हा पोलिस दल, रोटरी क्लब यांच्याकडून दिले जाणारे विविध पुरस्कार मंडळास मिळाले आहेत.

पुरस्कार स्वरुपात मिळालेल्या रकमेचा मंडळाकडून यापूर्वी वयोवृद्ध नागरीकांना सन्मान ज्येष्ठांचा आधार काठीचा या विशेष उपक्रमांतर्गत चालताना आधार घेता येईल आशा काठ्यांचे वाटप, तुळजापूर खुर्द येथील नगर परिषद शाळेस आवश्यक साहित्य खरेदी आशा विविध समाजोपयोगी उपक्रमांकरीता मंडळाकडून पुरस्काराच्या रकमा खर्च करण्यात आलेल्या आहेत.

कार्यक्रमावेळी व्यासपीठावर आकाशवाणी धाराशिवचे प्रमुख किरण पवार, रेडिओ तेरणाचे संजय मैंदग्रीकर, तुळजाई पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र देशमाने, व्हा. चेअरमन खंडू ताटे, पंडीतराव जगदाळे, तुळजाई गणेश मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. बालाजी देशमाने, उपाध्यक्ष नानासाहेब भोजने, तुळजाई पतसंस्थेचे संचालक आदिनाथ ठेले, संजय देशमाने, प्रा. निलेश एकदंते, रामहरी भोजने, आमीर शेख, धनंजय कुंभार, भिकू कुंभार रमेश भोजने, महेश व्हटकर, मकसूद शेख संजय ढवळे, जेष्ठ नागरिक भगवान जाधव, काकासाहेब देशमुख नारायण हजारे खाजाभाई शेख बाबूराव मार्डे व इतर जेष्ठ नागरीक व तुळजाई मंडळांचे सभासद उपस्थित होते.

## कुंभारी येथे विभागीय महिला मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.६ फेब्रुवारी -**

सोमवार ३ फेब्रुवारी रोजी तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथे आयबिल बँक यांच्या अर्थसहाय्यातून व वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट धाराशिव व ग्रामीण समुदाय समग्र विकास कार्यक्रम अंतर्गत विभागीय महिला मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

तुळजापूर तालुक्यातील कुंभारी, कोरेवाडी, कदमवाडी, सारोळा, धनेगाव, गोंधळवाडी, पिंपळा खुर्द, पिंपळा बु, यमगरवाडी, चिंचोली, कसई, येवती, काळेगाव, दिंडेगाव, चिवरी, उमरगा, शिरगापूर, आरबळी, हिप्पारगा ताड, फुलवाडी अशा २० गावातील ७३० महिला या विभागीय महिला मेळाव्यासाठी उपस्थित होत्या.

या मेळाव्यामध्ये शेती व पाणी, आरोग्य व पोषण, शिक्षण, पायाभूत सुविधा व कौशल्य विकास आदी विषयावर महिलांनी व शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तसेच या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांनी शासनाकडून मिळणाऱ्या योजना, महिलांचे अधिकार, महिलांचे शेती क्षेत्रातील योगदान, बालविवाह, गृहउद्योग, महिलांचे आरोग्य शाश्वत शेती, पाणलोटची गरज अशा विविध विषयावर मार्गदर्शन केले.

मेळाव्यास उपस्थित सर्व महिलांना महिला ग्रामसंघ कुंभारी यांनी लोकसहभागातून १००० शेवग्याच्या रोपाचे वाटप केले.

यावेळी तुळजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खांडेकर, तालुका कृषी अधिकारी देवकते, सामाजिक कार्यकर्त्यां बालसंरक्षण कक्ष धाराशिवच्या प्रज्ञा बनसोडे, इंदू राठोड, माया जाधव, कुंभारी सरपंच संगीता कोळी, ग्रा.पं. सदस्या वर्षाराणी वडणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.६ फेब्रुवारी -**

डॉ. मामासाहेब जगदाळे यांची १२२ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बाल संस्कार, छत्रपती शिवाजी विद्यालय व डॉ. मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या मिरवणुकीत हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. टाळ-मृदंग, लेझीम, टिपऱ्या, विविध कवायती व अन्य आकर्षक कार्यक्रमांनी मिरवणुकीला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या शेवटी उन्हाचा त्रास व उशीर झाल्याने विद्यार्थी व स्टाफला थकवा जाणवू लागला. या स्थितीत वाशी येथील शिवाजीनगरमधील शिवछत्रपती ग्रुपच्या युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत त्वरित २०० पाण्याच्या बाटल्या वाटल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला. या स्तुत्य उपक्रमात अनिकेत पाठक, तैय्यब तांबोळी, ऋतुराज पवार, अजय कुशवाह, अभिषेक गायकवाड, शंभू उंदरे, दिनेश चौधरी, अमरदीप कुशवाह, गणेश ढेंगळे, इसाक तांबोळी, विकास कवडे, विश्वजीत मोळवणे या युवकांचा पुढाकार होता.

## भाजप सदस्य नोंदणीत इच्छाशक्ती प्रबळ ठेवा : ना. सावे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका पावसाळ्या पूर्वीच होतील, तेव्हा स्वबळावर निवडणूका लढवायच्या असतील तर प्रत्येकांनी इच्छा शक्ती प्रबळ ठेवून भाजप सदस्य नोदणीत सक्रियता ठेवून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन राज्याचे दुग्ध विकास मंत्री ना. अतुल सावे यांनी भूम येथे केले

गुरुवार दि.६ फेब्रुवारी २०२५ रोजी येथील यश मंगल कार्यालयात भाजपच्या महासदस्य नोदणी अभियानची आढावा बैठक राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक ऊर्जामंत्री ना. अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.


## चौकशीची जाहिर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक: SLP/14766/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : १८४३/२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- श्री ज्योतिर्लिंग देवस्थानबाबत
न्यासाचा पत्ता :- भुमापन ६३ सपतणे, भोसे, माढा, सोलापूर, माढा, भोसरे
अर्जदार :- सौ. शांताबाई गणपत गिद्दे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेतः-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | पूजेचे साहित्य २३ नग | २५००.०० |
| २ | घंटा (जुनी) घंटी २ नग | १५००.०० |
| ३ | साउंड स्पीकर व इतर साहित्य ७ नग | १५,०००.०० |
| ४ | सतरंजी बैठक पट्टी १० नग | २,०००.०० |
| ५ | खुर्ची प्लास्टिक १० नग | ५,०००.०० |
| ६ | टेबल २ नग | १४,०००.०० |
| ७ | इलेक्ट्रिक साहित्य व डेकोरेशन | ७,०००.०० |
| ८ | प्रसादाची भांडी कढई पातेले वगैरे ८ नग | १०,०००.०० |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. ५७०००/- मात्र (अक्षरी रुपये सत्तावन्न हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन)

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/ कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Sapanate bhose | Gat no 63 | 5 hector 66 R | Grampanchayat | NA | 1500000.00 |

(ब) स्थावर मिळकतः रोख रु. १५०००००/- मात्र (अक्षरी रुपये पंधरा लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी दिली.

शिक्का

सही/-
एस.एस. कुमठेकर
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर


## कुरनूर जलसिंचन शाखेचा गलथान कारभार; शेतकारी पाण्यापासून वंचित

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथील महाराष्ट्र शासनाच्या कुरनुर जलसिंचन शाखेच्या ढिसाळ व गलथान कारभारामुळे वागदरी व गुजनुर येथील शेतकऱ्यांना बोरीधरणाच्या कालव्यातुन मिळणारे पाणी अद्याप मिळाले नसल्याने या गावांतील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असुन कुरनुर जलसिंचन शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ वागदरी व गुजनुर येथील शेतकऱ्यांना कालव्याद्वारे पाणी उपलब्ध करुन दिले नाही तर याविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी दिला आहे.

नळदुर्ग येथील कुरनुर जलसिंचन शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ व गलथान कारभारामुळे वागदरी आणि गुजनुर या दोन गावांतील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी बोरी धरणाच्या कालव्याद्वारे देण्यात येणारे पाणी अद्याप मिळाले नाही. ३ जानेवारी २०२५ रोजी धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील पिकांसह ऊसाला पाणी मिळावे यासाठी बोरी धरणाच्या कालव्यातुन पाणी सुरु करण्यात आले होते. आज एक महिना उलटुन गेला तरी वागदरी आणि गुजनुर च्या शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही.

यामुळे रब्बी हंगामातील ज्वारीसह अन्य पिके अक्षरशा वाळुन गेली आहेत. यावर्षी बोरी धरण भरले असल्यामुळे उन्हाळ्यात धरणाच्या कालव्याद्वारे पाणी मिळणार म्हणुन वागदरी व गुजनुर येथील शेतकऱ्यांनी मोठ्याप्रमाणात ऊसाची लागवड केली आहे. मात्र सध्या ऊसाला पाण्याची नितांत गरज असतांना केवळ नळदुर्ग येथील कुरनुर जलसिंचन शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ व गलथान कारभारामुळे या दोन गावांतील शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस अक्षरशा आज वाळुन चालला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांच्या या नुकसानीला जे अधिकारी आणि कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडुन या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडुन शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करुन घेणार असल्याचे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी म्हटले आहे.

हे अधिकारी आणि कर्मचारी निगरगट्ट झाले असुन शेतकरी पाणी कधी मिळणार असे विचारायला गेल्यानंतर हे अधिकारी आणि कर्मचारी आम्ही पाणी तुम्हाला मिळावे यासाठी नियोजन करीत आहोत असे सांगत आहेत.

मात्र कालवा सुरु होऊन एक महिण्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी वागदरी आणि गुजनुरच्या शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही.

पंख्याखाली खुर्चीवर बसुन झोपा काढणाऱ्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे आज वागदरी आणि गुजनुरच्या शेतकऱ्यांवर आत्महत्त्या करण्याची वेळ आली असल्याचे ज्ञानेश्वर घोडके यांनी म्हटले आहे.

वातावरण चिघळण्यापुर्वी व शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान कमी करण्यासाठी कुरनुर जलसिंचन शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ वागदरी आणि गुजनुर येथील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ज्ञानेश्वर घोडके यांनी केली आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कचरा विघटन प्रकल्पातून होणार खत निर्मिती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
मागील चार महिन्यांपासून शहरातील कचऱ्याला आता शिस्त लागल्याचे दिसत आहे. महापालिकेनेही कचरा विषय चांगलाच मनावर घेतल्याचे दिसून येत आहे. शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प पूर्ण झाला आहे. गुत्तेदाराने त्याचे महापालिकेकडे हस्तांतरण केले की, पालिकेच्यावतीने कचरा विघटन करून कचऱ्यापासून खतनिर्मिती करण्यात येणार आहे. पालिकेचा हा महत्वकांक्षी प्रकल्प सुरू होण्याची लातूरकरांना प्रतीक्षा आहे.

शहरातील सुमारे सव्वा लाख घरांतून महापालिकेच्या गुत्तेदारामार्फत कचऱ्याचे संकलन करण्यात येते. यातून दररोज दोनशे ते अडीचशे टन कचरा उचलला जातो. घरोघरी घंटागाडी जात असल्याने नागरिकही आपला कचरा रस्त्यावर टाकण्याऐवजी घंटागाडीत टाकत आहेत. जमा झालेला कचरा डेपोवर टाकण्यात येत आहे. परंतु, कचरा डेपोला डोंगराचे स्वरूप आल्याने कचऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा त्रास शेजारील ग्रामस्थांना होत आहे. कचरा डेपोवर कोणत्याही प्रकारचा कचरा जात असल्याने तेथे मोकाट कुत्र्यांची संख्या भरमसाठ वाढली आहे. त्यांचा त्रास ग्रामस्थांसह शेतकऱ्यांना होत आहे.

यामुळे शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खत निर्मितीचा महत्वकांक्षी प्रकल्प पालिका प्रशासनाने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. लवकरच गुत्तेदाराकडून महापालिकेकडे त्याचे हस्तांतरण होणार आहे. त्यानंतर मात्र कचरा ठेकेदाराने आणलेल्या कचऱ्यावर पालिका प्रशासन प्रक्रिया करून त्यापासून खत निर्मितीचा महत्वकांक्षी प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पातून दररोज दीडशे टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### विविध स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ २५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मंगळवारी स्कूलमध्ये आयोजित विशेष समारंभात करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील कौशल्य विकसित व्हावे म्हणून प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, अभंग गायन, वादविवाद, उत्कृष्ट भाषण, काव्यवाचन, कथाकथन आधी स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्षांमध्ये करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना प्राचार्य कर्नल एस श्रीनिवासूलू यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले याप्रसंगी मनोहर कबाडे, विनोद चव्हाण, भूषण बोरगावकर, मनीषा नाडे, स्नेहा गोमारे, अपर्णा राजुरे, देवयानी देशपांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### स्मार्ट कार्ड बंधनकारक झाल्यास नोंदणी वाढणार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
महापालिकेच्या परिवहन विभागाकडून लातूर शहर बस प्रवासासाठी महिलांसाठी स्मार्ट कार्ड दिले जात आहे. प्रारंभी गेल्या दीड-दोन महिन्यांपासून स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली जात होती. आता नोंदणी झाल्यानंतर स्मार्ट कार्ड वाटपाला प्रारंभ झाला आहे. पहिल्या टप्प्यात साडेतीन हजार स्मार्ट कार्ड वाटप होत आहे.
पाच ते सात ठिकाणी स्मार्ट कार्ड देण्यासाठी नोंदणी केंद्र होते. मात्र नोंदणीसाठी महिलांकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे केंद्र बंद झाले. आठ हजारांच्या आसपास महिलांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी साडेतीन हजार महिलांचे स्मार्ट कार्ड तयार झाले आहेत. त्यांना गांधी चौक येथील झोन कार्यालयातून तसेच मनपाच्या मुख्य कार्यालयातून वाटप केले जात आहे. शहरातील सर्व महिलांना मनपाच्या बस सेवेचा लाभ घ्यायचा असेल तर स्मार्ट कार्ड काढावे, असे प्रशासनाकडून दबक्या आवाजात सांगितले जात आहे.

### कर्करोगाच्या लक्षणांकडे महिलांनी दुर्लक्ष करु नये

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
कर्करोग हा दुर्धर आणि गंभीर आजार आहे. लक्षणे दिसताच महिलांनी तात्काळ तपासणी करुन घ्यावी. वेळीच निदान झाल्यास उपचाराने कर्करोगावर मात करता येते, असे प्रतिपादन स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांनी केले.
जागतिक कर्करोग दिनानिमित्त शहरातील स्त्री रुग्णालय, नवजात अर्भक केंद्र येथे आयोजित जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. रविंद्र भालेराव होते. यावेळी कर्करोग तज्ज्ञ डॉ. प्रियंका राठोड, सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ. बालकुंदे, डॉ. कापसे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रियंका राठोड यांनी कर्करोगाच्या लक्षणांची माहिती दिली. बाभळगाव येथील शासकीय नर्सिंग स्कूलच्या द्वितीय वर्षातील मुलींनी पथनाट्यातून कर्करोगाची जनजागृती केली. वैद्यकीय अधीक्षक डॉ. भालेराव यांनी कर्करोगाची लक्षणे दिसताच तपासणी करुन घेण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक अधिपरिचारिका लहाने यांनी केले.

### अखिल महाराष्ट्र शिक्षक संघातर्फे अनमोल सागर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद अंतर्गत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली पारदर्शक पद्धतीने पार पडले. तसेच उमंग सेंटरला मिळालेला पुरस्कार, बंजारा भाषेसाठी राबवलेला उपक्रम, जोधपूर शैक्षणिक सहल, गुणवत्ता वाढीसाठी राबविलेल्या उपक्रमाबद्दल अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघातर्फे सीईओ अनमोल सागर यांचा जि.प.मध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## ज्येष्ठांचा अवमान हा समाजाबरोबरच राष्ट्राशीही द्रोह : डॉ. श्रीपाल सबनीस

### ज्येष्ठांच्या पहिल्या साहित्य संमेलनाचे लातूरमध्ये थाटात उद्घाटन : मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
ज्येष्ठांचा अवमान हा समाजाबरोबरच राष्ट्रद्रोही समजला पाहिजे, असे रोखठोक प्रतिपादन सुप्रसिध्द विचारवंत, समीक्षक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी बुधवारी येथे केले.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ लातूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार होते. मंचावर ज्येष्ठ नागरिक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अण्णासाहेब टेंकाळे, समतावादी सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष डॉ. माधव गादेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी, लातूरचे अध्यक्ष ॲड. एस. एन. बोडके, साहित्यिक विलास सिंदगीकर, साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर. बी. जोशी, संमेलनाचे सचिव प्रकाश घादगिने यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. सबनीस म्हणाले, वृध्द ही घरातील अडगळ नसून ती समाजाची आणि राष्ट्राची संपत्ती आहे. ज्येष्ठ ही सर्वकालीन आदरणीय व्यक्ती आहे. ज्ञानपणाचा वसा आणि वारसा पुढील पिढीला देण्याचे काम ज्येष्ठांचे असते. माणसातील देवत्व पूजले तर घराघरात कुटुंब गाथा निर्माण होतील.

अध्यक्षीय समारोपात डॉ. कुंभार म्हणाले, म्हातारपणाचा खरा अर्थ समर्पणात आणि सेवेमध्येच असतो. महात्मा फुलेंना अभिप्रेत असलेले आणि त्यांची स्वप्नपूर्ती करणारे हे साहित्य संमेलन आहे.

आयुष्याच्या संध्याकाळी आपण साहित्याचे जे चिंतन करत आहात ते महत्त्वाचे आहे. साहित्य मानवी जीवनाचा तोल सांभाळण्याचे काम करते. साहित्यातून उपेक्षितांचे चित्र प्रतिबिंबित झाले पाहिजे. साहित्याने



समाजाला दिशा देण्याचे काम केले पाहिजे. समाजाला सावध करण्याचे कामही साहित्याचेच आहे. साहित्याच्या देवाण-घेवाणीतूनच संवाद निर्माण होतो आणि त्यामुळे आपल्याला वैचारिक आधार आणि मूल्यदृष्टी मिळते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील पीसीबी डिझाईन कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर व सूवी इन्स्टुमेंट संस्था,सोलापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या करारा अंतर्गत विद्यार्थ्यांना पीसीबी डिझाईनविषयी ज्ञान अवगत व्हावे म्हणून या दरम्यान दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य सिद्धेश्वर बेल्लाळे व प्रमुख पाहुणे ट्रेनर आणि एचआर मॅनेजर सुवी इन्स्टुमेंट,सोलापूरचे डॉ. प्रसन्न गव्हाणे व सीटीओ सुवी इन्स्टुमेंट,सोलापूरचे डॉ.वैभव बच्चुवार या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते झाले.



याप्रसंगी साधन व्यक्ती डॉ.प्रसन्न गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत असताना पीसीबी म्हणजे काय आणि त्याची आजच्या काळात गरज पटवून सांगितले.यावेळी ते असेही म्हणाले की,आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात,सानुकूल पीसीबी (मुद्रित सर्किट बोर्ड) इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या डिझाइन आणि विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.हे वैयक्तिकृत सर्किट बोर्ड हे आवश्यक घटक आहेत जे स्मार्टफोन आणि लॅपटॉपपासून वैद्यकीय उपकरणे आणि औद्योगिक यंत्रसामग्रीपर्यंत इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या विस्तृत श्रेणीची कार्यक्षमता सक्षम करतात.

प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी आपल्या भाषणातून बदलत्या तंत्रज्ञानात नवीन ज्ञान घ्यायचे असेल आणि अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर ज्ञान मिळवण्यासाठी अशा कार्यशाळेचे आयोजन करणे गरजेचे आहे.कारण इलेक्ट्रॉनिकसारख्या विषयात सातत्याने बदल होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी सतर्क असणे आवश्यक आहे,असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक आणि इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. टी.एच.मुजावर यांनी केले.या कार्यशाळेकरीता भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,कार्यशाळा सह-समन्वयक डॉ.महादेव पंडगे आणि डॉ.शंकर बिराजदार तसेच डॉ.विश्वनाथ मोटे, डॉ.श्वेता लोखंडे, प्रा.मेघा आत्राम, प्रा.मंगेश आवाळे,डॉ.लहू काथवटे,नागटिळक यांचेही सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्षातील वैष्णवी साठे आणि श्रेया जाधव विद्यार्थिनींनी संयुक्तरित्या केले.

## लायन्स क्लब लातूर हेल्पिंग हॅण्डसच्या वतीने उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
लायन्स क्लब लातूर हेल्पिंग हॅण्ड्स, लायन्स क्लब लातूर वुई केअर आणि लायन्स क्लब लातूर मेन यांच्या वतीने हरंगुळ बु येथील संवेदना प्रकल्प सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र येथे विविध उपक्रम सोमवारी घेण्यात आले.

अध्यक्षस्थानी लायन्स क्लब लातूर हेल्पिंग हॅण्ड्सचे अध्यक्ष डॉ. अजय नारायणकर होते. याप्रसंगी अजय गोजमगुंडे, सुनील लोहिया, प्राचार्या दीपा पाटील, प्रकल्प व्यवस्थापक व्यंकट लामजने, लायन्स डिस्ट्रिक्टचे झोन चेअरमन पी. विवेकानंद, पी. विजयालक्ष्मी, अशोक पांचाळ, सुदर्शन कंजे, सौरभ सुतार, विशाल गिरी, नितीन शिंदे, पंकज तेरकर, अर्चना कुंभार, महादेव हुमनाबादे, गाडेकर, आनंद शेंद्रे आदी उपस्थित होते.

प्रारंभी लामजने यांनी प्रकल्पाची माहिती दिली. दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध वस्तू, फॅशनेबल कपडे, पिशव्या, ग्रीटिंग काईस आदी दाखविल्या. अर्चना कुंभार यांचा पिलर ऑफ लॉयन्स क्लब लातूर हेल्पिंग हॅण्ड्स सन्मानपत्राने सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन अशोक पांचाळ, अर्चना कुंभार यांनी केले. आभार व्यंकट लामजने यांनी मानले. यावेळी डॉ. अजय नारायणकर यांनी लॉयन्स क्लबच्या उपक्रमांची माहिती दिली. आरोग्य शिबीरही घेतले जात असल्याचे सांगितले.

## रांगोळी, पोस्टर प्रदर्शनातून क्षयरोगाची केली जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर आणि जिल्हा क्षयरोग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तीळगूळ व क्षयरोग जनजागृती कार्यक्रम शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मंगळवारी घेण्यात आला. रांगोळी, पोस्टर प्रदर्शनातून क्षयरोगाची जनजागृती करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, प्रा. डॉ. विमल होळंबे-डोळे, अधिसेविका अमृता पोहरे, डॉ. अलका बांगर, प्रा. डॉ. आचार्य यांची उपस्थिती होती. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. तांबारे यांनी शंभर दिवसीय टीबी मोहिमेचे उद्दिष्ट, अतिजोखमीच्या व्यक्तींची तपासणी, निदान, उपचार, प्रतिबंधात्मक उपचाराबाबत माहिती दिली. प्रा. डॉ. विमल होळंबे डोळे यांनी आहार, आरोग्य व व्यायामाचे महत्त्व सांगून समाजात टीबीविषयी गैरसमज आहेत. ते दूर होणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी अमृता पोहरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास छाया चव्हाण, किरण निकम, सुमित्रा तोटे, एस. एस. तोरणेकर, हेमलता चोरघडे आदिंची उपस्थिती होती.

## संगमेश्वर विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
शहरापासून जवळच असलेल्या आर्वीच्या सोमवंशीनगरातील संगमेश्वर युवक मंडळ संचलित संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरचे 'जल्लोष-२०२५' वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी उत्साहात पार पडले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अधिकारी एन. एम. जाधव उपस्थित होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. मंचावर राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेचे सहसचिव प्राचार्य राजेंद्र जायेभाये व संस्थेच्या



कोषाध्यक्ष मुख्याध्यापिका कविता केंद्रे यांची उपस्थिती होती.

यावेळी गटशिक्षणाधिकारी जाधव म्हणाले, शिक्षणामुळे लोक साक्षर होतात. गरिबी आणि बेरोजगारी दूर करण्यासाठी शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे साधन असून, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील या शाळेने नामांकित शाळांना मागे टाकत शैक्षणिक क्षेत्रात प्रगती केली आहे, ही बाब कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य केंद्रे म्हणाले, या परिसरातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी ही शाळा उभारण्यात आली आहे. येथे विद्यार्थ्यांना मराठीसह सेमी इंग्लिशचेही धडे दिले जातात. शिक्षक समर्पणाच्या भावनेतून जादा तासिका घेतात. या वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेचा शंभर टक्के निकाल लागला असून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना संस्कारही शिकवले जातात.यावेळी विद्यार्थ्यांनी समूह नृत्य, एकांकिका व विविध देशभक्तीपर गीतांसह 'चिन्न दो', 'मैं कोल्हापूर से आयी हूँ' आदी दाक्षिणात्य व महाराष्ट्रीयन गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. प्रास्ताविक मुख्याध्यापक ए. बी. पवार यांनी तर सूत्रसंचालन ए. व्ही. माने यांनी केले. यशस्वितेसाठी जी. बी. मोरे, जे. जी. कावळे, डी. पी. दिवटे, एन. आर. मुंडे, आर. व्ही. डुकरे, डी. एस. भदभदे आदींनी परिश्रम घेतले.

## प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये खासगी दवाखान्यांचा सहभाग आवश्यक

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
जिल्ह्यातील गरजू, गरीब रुग्णांना आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्यासाठी जास्तीत जास्त खासगी दवाखाने या योजनेसाठी अंगीकृत होणे आवश्यक आहे. याकरिता जिल्ह्यातील पात्र दवाखान्यांनी पुढाकार घेवून योजनेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केले. योजनेत सहभागी असलेल्या खासगी रुग्णालयांच्या समस्याही जाणून घेवून या समस्यांचा निपटारा करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील खासगी डॉक्टर आणि इंडियन मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी यांच्याशी जिल्हाधिकारी कार्यालयात संवाद साधताना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. बालाजी गोरे यांच्यासह जिल्ह्यातील खासगी डॉक्टर या बैठकीमध्ये प्रत्यक्ष, दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

जिल्ह्यात महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये सद्यस्थितीत १८ खासगी रुग्णालये आणि १६ शासकीय रुग्णालयांचा समावेश आहे. यामाध्यमातून गरीब आणि गरजू कुटुंबातील रुग्णांवर ५ लाख रुपयेपर्यंत मोफत उपचार केले जात आहेत. जिल्ह्यातील इतर शहरातील खासगी रुग्णालयांनी या योजनेत सहभागी होवून जास्तीत जास्त रुग्णांना सेवा देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच सध्या योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांनी आपल्याकडे आलेल्या रुग्णांना चांगली सेवा द्यावी. त्यांच्यावर उपचार करण्यास टाळाटाळ न करता या गरीब रुग्णांना सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले.

आयुष्मान भारत कार्ड तयार करण्याच्या कामाला गती द्यावी

जिल्ह्यातील जास्तीत जास्त रुग्णांना आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी जिल्ह्यात पुढील १५ दिवसात विशेष मोहीम राबवून आयुष्मान भारत कार्ड तयार करण्यात येणार आहेत. या योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांनीही यामध्ये पुढाकार घेवून जास्तीत जास्त नागरिकांचे आयुष्मान भारत कार्ड तयार करण्यासाठी सहकार्य करावे. जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी याअनुषंगाने समन्वय करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. आभा कार्ड वितराणाचाही त्यांनी यावेळी आढावा घेतला. तसेच नोंदणी पूर्ण झालेल्या नागरिकांचे आभा कार्ड वितरण तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

## दिव्यांगांना सहानुभूतीपेक्षा अनुभूतीची आवश्यकताः प्राचार्य डॉ. संजय गवई



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**
आज समाजातील दिव्यांगाना सर्वसामान्य व्यक्ती म्हणून जीवन जगण्यासाठी सहानुभूतिपेक्षा अनुभूतीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, उपकेंद्र लातूर आणि समाजकार्य विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी २१ प्रकारच्या दिव्यांगासंबंधी चित्रप्रदर्शन महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारमंचावर व्यवस्थापक जिल्हा दिव्यांग पुनर्सन केंद्र, लातूरचे विशेष शिक्षक बसवराज पैके, आकाश जोशी, वैष्णवी तावरे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. नयन राजमाने, प्रा. आशिष स्वामी आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, आज आपण सर्वांनी दिव्यांग बंधू-भगिनींना सहकार्य केले पाहिजे, त्यांच्या गरजा, समस्या, भावना समजून घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी सहकार्य केले पाहिजे. आज दिव्यांग हे विविध क्षेत्रांमध्ये आपल्या दिव्यांगावर मात करून उच्च विद्या विभूषित झाले आहेत. तसेच शासकीय आणि खाजगी व्यवसाय सुद्धा करीत आहे, यासाठी त्याचे आपण अभिनंदन केले पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सायकलिंग ग्रुपच्या सदस्यांचा भाजपच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ फेब्रुवारी -**

उदगीर ते अयोध्या असा सायकलवर प्रवास करून येणाऱ्या उदगीर येथील सायकलिंग ग्रुपच्या सर्व सदस्यांचा उदगीर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बस्वराज बागबंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलताना बस्वराज बागबंदे यांनी उदगीर ते अयोध्यापर्यंत सायकलवर प्रवास करून येणाऱ्या सर्व सायकलस्वारांचे कौतुक करीत दरवर्षी नवीन संकल्पना घेऊन हे सायकलस्वार देशाच्या विविध भागात जाऊन येतात हे उल्लेखनीय असल्याचे सांगितले. या सायकलस्वारांमुळे उदगीरचे नाव देशभरात जात असल्याचे गौरवोद्गार यावेळी बागबंदे यांनी काढले.

यावेळी दत्ता पाटील, आनंद बुंदे, अमोल अनक्ले, मोती डोईजोडे, रामचंद्र भोसले, सुनील गुडमेवार, सतीश धोंगडे, चेतन सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, केशव रंगवाळ, विजय मामुलवार, सुशील आपटे, साई आपटे, मारुती श्रीनिवास, सायकलिंग क्लबच्या सर्व सदस्यांसह आदींची उपस्थिती होती.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### वेताळेश्वर संकुलात खेळ भरारी क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**औसा, दि.६ फेब्रुवारी -**

श्री वेताळेश्वर शिक्षण संकुल अंतर्गत राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी,लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग,लातूर कॉलेज ऑफ सायन्स, लातूर कॉलेज ऑफ आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित खेळभरारी क्रीडा महोत्सवाची लाल फीत कापून व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत मराठवाड्यातील संघ व स्पर्धकांनी भाग घेतला आहे. यावेळी वेताळेश्वर संकुलाच्या वतीने यांचे स्वागत करण्यात आले. या खेळ भरारी क्रीडा महोत्सवा अंतर्गत कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. लातूर येथील श्री गणेश माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यु.एस बनसोडे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालिका माधुरी बावगे, योगिता बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्य वीरेंद्र मेश्राम, प्रा. अतुल कदम, प्राचार्य माधव सोनवरे उपस्थित होते. प्राचार्य संतोष मेदगे यांनी प्रास्ताविक केले. वेताळेश्वर शिक्षण संकुल मधील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

### निलंगा येथे आज ‘मी रमाई बोलते’ एकपात्री प्रयोगाचे आयोजन

**निलंगा, दि.६ फेब्रुवारी -**

त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती ७ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात येत आहे. या निमित्ताने निलंगा येथील माता रमाई जयंती उत्सव समितीने मी रमाई बोलते या एकपात्री प्रयोगाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सादरकर्त्या डॉ. वैभवी कांबळे यांचा हा माता रमाई यांच्या जीवन व कार्यावर आधारित एकपात्री प्रयोग निलंगावासीयांसाठी मेजवानी ठरणार आहे. कार्यक्रमाचे आयोजक कत्तीकार विलास माने, रजनीकांत कांबळे, अंकुश ढेरे, प्रा. रोहित बनसोडे, रमेश कांबळे, प्रा.डॉ.बी. आर. गायकवाड, प्रा.डॉ.एस.आर. वाकळे हे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सांस्कृतिक सभागृहात शुक्रवार दि.७ फेब्रुवारी रोजी सायं. ७ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमासाठी परिसरातील माता रमाई यांच्या कार्यावर प्रेम करणाऱ्या तमाम नागरिकांनी, महिलांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

## दिव्यांगांना सहानुभूतीपेक्षा अनुभूतीची आवश्यकता : डॉ. संजय गवई

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**

आज समाजातील दिव्यांगाना सर्वसामान्य व्यक्ती म्हणून जीवन जगण्यासाठी सहानुभूतिपेक्षा अनुभूतीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, उपकेंद्र लातूर आणि समाजकार्य विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी २१ प्रकारच्या दिव्यांगासंबंधी चित्रप्रदर्शन महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारमंचावर व्यवस्थापक जिल्हा दिव्यांग पुनर्सन केंद्र, लातूरचे विशेष शिक्षक बसवराज पैके, आकाश जोशी, वैष्णवी तावरे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. नयन राजमाने, प्रा. आशिष स्वामी आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, आज आपण सर्वांनी दिव्यांग बंधू-भगिनींना सहकार्य केले पाहिजे, त्यांच्या गरजा, समस्या, भावना समजून घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी सहकार्य केले पाहिजे. आज दिव्यांग हे विविध क्षेत्रांमध्ये आपल्या दिव्यांगावर मात करून उच्च विद्या विभूषित झाले आहेत. तसेच शासकीय आणि खाजगी व्यवसाय सुद्धा करीत आहे, यासाठी त्याचे आपण अभिनंदन केले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी बसवराज पैके म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड उपकेंद्र, लातूर आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांनी या कार्यक्रमाला महाविद्यालयात परवानगी दिली त्याबद्दल सर्वांचे त्यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. आशिष स्वामी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाजकार्य विभागप्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. काशीनाथ पवार, डॉ. दत्ता करंडे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, कृष्णा कोळी, प्रांजली शेळके, नेहा मद्रूळे, शुभांगी राठोड, अजय गुंटे, आदित्य शिरसाठ व राजनंदनी गायकवाड यांनी सहकार्य केले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पानगाव येथे मराठवाडा स्तरीय समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गांधी चौक पानगाव येथे मराठवाडा स्तरीय समूह नृत्य स्पर्धेचे १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत १ लाख ५० हजार रुपयांची विजेत्यांना पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.




१७ फेब्रुवारी रोजी महात्मा गांधी चौकामध्ये या स्पर्धेची सुरुवात होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यासाठी समूह नृत्य मोठ्या गटासाठी प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये ठेवण्यात आले आहे. द्वितीय पारितोषिक ३१ हजार रुपये. तृतीय पारितोषिक ३१ हजार रुपये ठेवण्यात आले आहे.

लहान गटासाठी प्रथम पारितोषिक २१ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक १५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ११ हजार रुपये ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी मोठ्या गटासाठी ५०० रुपये प्रवेश फि ठेवण्यात आली आहे.

तर लहान गटासाठी प्रवेश फीस २५० रुपये ठेवण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी ज्यांना आपली नोंदणी करावयाची आहे. त्यांनी आपली नोंदणी अभिजीत चव्हाण, सिद्धेश्वर व्यवहारे, संदेश हरिदास, परमेश्वर कापसे यांच्याकडे १२ फेब्रुवारी पर्यंत करावी असे आवाहन संयोजन समितीतर्फे करण्यात आले आहे.

या स्पर्धेतील गीतांचा वेळ ७ मिनिटांचा असेल. स्पर्धेचा निकाल परीक्षकांच्या निर्णय हा अंतिम असेल तरी या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संघाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज जयंती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## निलंगा तालुका अंतर्गत अंगणवाडी सेविका मदतनीस पद भरतीला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ फेब्रुवारी -**

एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजना निलंगा अंतर्गत सेविका मदतनीसची एकूण ६८ पदे रिक्त आहे.

सदर रिक्त पदासाठी शासन निर्णय महिला व बालविकास विभाग दि.३० जानेवारी नुसार भरती प्रक्रिया काढण्यात आलेली आहे. ज्या गावात रिक्त जागा आहे. त्या गावातील अंगणवाडी केंद्र व ग्रामपंचायत येथे सदर जाहिरात लावण्यात आलेली आहे. संबंधित गावातील पात्र महिला यांना एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय निलंगा येथे अर्ज सादर करावा लागेल. अर्ज सादर करण्याची मुदत ही ६ ते २० फेब्रुवारी अशी आहे. पं.स. निलंगा येथे लावण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये भरती प्रक्रियाबाबत सविस्तर तपशील नमूद करण्यात आलेला आहे.

## राष्ट्रीय सेवा योजनाचे बोरोळ येथील शाळेत उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.६ फेब्रुवारी -**

पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी येथील राष्ट्रीय सेवा योजना चे उद्घाटन कै यशवंतराव चव्हाण मा. व उच्च माध्यमिक शाळा बोरोळ येथे डॉ नारायण कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवनागरी बहुउद्देशीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्यामप्रसाद धनुरे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश प्रवक्ता भाजपाचे ॲड. शिवानंद हैबतापुरे, जिल्हा समन्वयक रा.से.यो. डॉ. केशव अलगुले, नाथ शिक्षण प्रसारक चे सचिव शिवाजीराव शेंडगे, दे.ब.शि.प्र. सचिव रामभाऊ धनुरे, बोरोळ गावचे लोकनियुक्त सरपंच कृष्णा पाटील, उपसरपंच प्रमोद पाटील, प्राचार्य सतीश शेंडगेसह अदिंची उपस्थिती होती.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे शिक्षण क्षेत्राद्वारे होत असताना दिसत आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. तरुणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय. राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगताना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्त्व विशद करतात. विशेषत: शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा, या हेतूने शिक्षण क्षेत्रात विविध योजना वेगवेगळ्या स्तरावर राबविल्या जातात. शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमापर्यंत राष्ट्रसेवेची व्याप्ती वाढताना दिसून येते. २४ सप्टेंबर हा ‘राष्ट्रीय सेवा योजना दिन’ म्हणून साजरा केला जातो.

आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो असे याप्रसंगी वक्ते ॲड. शिवानंद हैबतापुरे आणि डॉ नारायण कांबळे यांनी विद्यार्थीनां संबोधित केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ संजय हैबतापुरे, सुत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ कांत जाधव तर आभार डॉ. कोंडीबा कांदे यांनी मांडले.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी उपस्थित होते.

## कैवल्य पांचाळ व गणेश शिंदे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६ फेब्रुवारी -**



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गणेश शिंदे व कैवल्य पांचाळ या विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय युवक महोत्सवात सर्वद्वितीय क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. बाळासाहेब गोडबोले, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत बिराजदार, मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आणि प्रा. शिवेश्वर मुचाटे आदी उपस्थित होते. गणेश शिंदे व कैवल्य पांचाळ या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय युवक महोत्सवात लोकसंगीत या कलाप्रकारात घवघवीत असे यश संपादन करणाऱ्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संघात सहभागी होते. विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून विद्यापीठातर्फे त्यांचा गौरव करण्यात आला. यापूर्वी त्यांनी अनेक स्पर्धा, युवक महोत्सव यात भरीव योगदान दिले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांच्यासह इतर मान्यवर पदाधिकारी, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील आदींसह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी त्यांचे अभिनंदन केले.

## स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते : अमोल निडवदे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ फेब्रुवारी -**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात २६ जानेवारी पासून सुरू झालेल्या स्नेहसंमेलनाची सांगता बक्षीस वितरणाने व स्नेहभोजनाने झाली.

या बक्षीस वितरण सोहळ्याला अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे अमोल निडवदे, सुनील वसमतकर, चंद्रशेखर पाटील माजी विद्यार्थी प्रसाद नाईकवाडे, विद्यार्थी प्रतिनिधी श्रेया सुनील कुलकर्णी, विश्वजीत गोपाळकृष्ण घोडके, स्नेह संमेलन प्रमुख किरण नेमट, सहप्रमुख आशा मोरे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले उपस्थिती होते. प्रमुख पाहुणे अमोल निडवदे यांनी आपल्या मनोगतातून स्नेहसंमेलन म्हणजे विविध कलागुणांचे सादरीकरण असे वक्तव्य केले. प्रमुख पाहुणे सुनील वसमतकर यांनी शालेय अभ्यासक्रमासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांमधून विविध कला, क्रीडा, भाषण यात भाग घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे वक्तव्य केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. चंद्रशेखर पाटील यांनी समाजामध्ये जीवन जगत असताना स्वतःमुळेच स्वतःची ओळख निर्माण करा असा मोलाचा संदेश दिला. अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे




मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट काम करून नावलौकिक मिळवला पाहिजे आपली विशेष ओळख निर्माण केली पाहिजे सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. ज्ञानोपासक, कलोपासक, बलोपासक संस्कार व विज्ञान मंडळाअंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे याप्रसंगी कौतुक करण्यात आले व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप बोधनकर, स्वागत व परिचय मयूर कुलकर्णी, आशा मोरे यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची एकूणच रूपरेखा प्रास्ताविकातून सांगितली. निकाल वाचन आठवी ते दहावी विभाग संतोष कोले पाचवी ते सातवी विभाग संदीप जाधव यांनी केले.

या कार्यक्रमाचे दाते दीपक देविदास मदने व चंद्रशेखर पाटील यांनी विद्यार्थ्यांना भेटवस्तू व स्वीट देऊन या सोहळ्याचा आनंद द्विगुणीत केला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## कनि महिला मंच यांचा हळदी-कुंकू कार्यक्रम धाराशिवमध्ये उत्साहात

### समृद्धी महिला गृह उद्योग धाराशिव व राज ज्वेलर्स धाराशिव यांच्या सहकार्याने साजरा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**

कनि महिला मंच यांचा हळदी-कुंकू कार्यक्रम धाराशिवमध्ये उत्साहात संपन्न झाला. समृद्धी महिला गृह उद्योग व राज ज्वेलर्स धाराशिव यांच्या सहकार्याने साजरा झाला.



कनि महिला मंचाच्या वतीने महिलांसाठी खास स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतून सोन्याची नथ व इतर आकर्षक बक्षीस देण्यात आली. समृद्धी महिला उद्योग यांच्या गिफ्ट सुद्धा याप्रसंगी देण्यात आल्या. अनेक महिलांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल सूर्यवंशी यांनी केली तर महिलांचे गेम अनुजा पानसरे यांनी घेतल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समृद्धी महिला गृह उद्योग यांनी परिश्रम घेतले. कनि महिला मंचची सुरुवात कल्याणी उल्हास कदम यांनी पुण्यापासून केली आहे. आज त्याच्या जवळपास दहा ते पंधरा हजार सभासद आहेत व त्याची मूर्तमेढ शितल इंदापूरकर यांनी धाराशिवमध्ये लावली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्रेमा पाटील, माधुरी जगदाळे, शितल इंदापूरकर, रोहिणी अडसुळ, मुग्धा दिपक कुलकर्णी, शबाना उपस्थित होत्या. या स्पर्धेची सोन्याच्या नथची मानकरी भाग्यश्री लाड या ठरल्या. तर ही सोन्याची नथ राज ज्वेलर्स यांनी दिली होती. तसेच उपविजेत्या ठरल्या शुभांगी तीर्थकर व भाग्यश्री भोईटे यांचे गिफ्ट देऊन अभिनंदन केले.

या कार्यक्रमात सोन्याच्या नथची मानकरी ठरली भाग्यश्री लाड यांना सोन्याची नथ बक्षीस देवून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## डॉ. प्रीती माने यांच्या इन्स्ट्रुमेंटल नालीसिस या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ फेब्रुवारी -**

येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या फार्मसी विभागात विभागप्रमुख म्हणून कार्यरत असणाऱ्या डॉ. प्रीती माने यांच्या इन्स्ट्रुमेंटल नालिसिस या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले होते.

या प्रकाशन समारंभासाठी तेरणा ट्रस्टचे विश्वस्त बाळासाहेब वाघ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभाग प्रमुख आणि अकॅडमिक डिन डॉ.डी. डी. दाते, प्रा. सुजाता गायकवाड, प्रा. श्रीकांत अघोर, प्रा. बालाजी चव्हाण, प्रा. संदीप टेकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## चित्रकार देवसाळे यांचे मुंबईत नेचर्स प्राईड चित्र प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ फेब्रुवारी -**

तालुक्यातील नणंद येथील चित्रकार संजय देवसाळे यांचे ‘नेचर्स प्राईड’ हे चित्र प्रदर्शन मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरी येथे दि.११ ते १७ फेब्रुवारी या कालावधीत भरविण्यात येणार आहे.निसर्ग हा सर्व सौंदर्याचा जनक सौंदर्याचे धडे आपणास निसर्गाकडूनच मिळतात.

चित्रकार संजय देवसाळे यांचे ‘नेचर्स प्राईड’ हे चित्र प्रदर्शन मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरी येथे दि. ११ ते १७ फेब्रुवारी या कालावधीत भरविण्यात येणार आहे. देवसाळे यांचे जहांगीर मधील हे तिसरे चित्र प्रदर्शन आहे. प्रदर्शनात कॅनव्हास वर विविध आकारांचे अनेक चित्रे मांडण्यात आली आहेत.श्री देवसाळे यांच्या निसर्गचित्राची एक खास शैली आहे. रंगकाम करताना ब्रशच्या माध्यमातून रंगांचे ठिपके-ठिपक्यांनी चित्र पूर्ण करण्याची एक खास शैली त्यांनी अवगत केली आहे. म्हणूनच त्यांची कलाकृती प्रत्येकाच्या मनाला आनंद देते.



चित्रात झाडे-झुडपे, घनदाट जंगल, गवताळ जमीन, झाडांचे खोड, डोंगर इत्यादींची आपल्या चित्रात सुसंगत मांडणी केलेली दिसते. त्यामुळे चित्र पाहताच प्रेक्षकांची नजर चित्रात खिळवून ठेवते. त्याप्रमाणे चित्रकाम करताना त्यांची एक स्वतंत्र चित्रशैली दिसून येते.

चित्रकार संजय देवसाळे यांनी शिक्षण लातूरच्या चित्रकला महाविद्यालय आणि पुढे पुण्याच्या अभिनव कला महाविद्यालय येथे पूर्ण केले. त्यांचे मुंबई, दिल्ली, कलकत्ता, येथे स्वतंत्र चित्र प्रदर्शने झालेली आहेत. अनेक चित्रे देश-विदेशातील चित्ररसिकांच्या संग्रहात दिमाखात झळकत आहेत.

संजय देवसाळे पुढे म्हणाले की, निसर्ग चित्रण हा माझा आवडीचा विषय असून निसर्गाच्या अथक निरीक्षणातून नवनवीन संकल्पना गवतात. त्यातूनच वास्तव दृष्टीला कल्पकतेची जोड मिळाल्याने चित्र रेखाटताना प्रत्येक वेळी नाविन्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो, असे ते म्हणाले.